
लोकराज्य

ऑगस्ट २०१८/पाने ६८/किंमत ₹१०



# ॥ वारी ॥


घेई माझे वाचे । गोड नाम विठोबाचें ॥
संकल्पना : अच्युत पालव । सुलेखन : मनिषा सागर खांडके

# अंतरंग



छाया: शिरीष शेटे

### ।। दुजा नको भाव होऊं देऊं..।। ६

विठ्ठल ही संकल्पना देवांच्या व्याख्येत मोडत नाही. एखाद्या चित्रात त्याला अधिक आकर्षक दाखवायचे असेल तरी त्या रुपड्यात अधिकाधिक कभिन्नता दाखवण्याकडे, चेहऱ्यात गडदपणा साकारण्याकडेच कल दिसून येतो. ते अगणित लावण्य डोळ्यांत साठवून घेण्यासाठी अठरापगड समाजातील लोक धडपडत असतात.

### ।। वारी एक आनंदयात्रा ।। १६

इतिहासात राजाश्रयाने अनेक संप्रदाय मोठे झालेले पाहायला मिळातात, पण वारकरी संपद्राय हा लोकाश्रयानेच मोठा झाला आहे. आषाढी एकादशीच्या निमित्ताने दुथडी भरून वाहणाऱ्या नदीसारखा वारकऱ्यांचा जनसमूह, दरवर्षी 'ज्ञानबा तुकाराम'च्या जयघोषात व टाळ-मृदंगाच्या गजरात पंढरपूरकडे जातो.

### ।। नमामि चंद्रभागा अभियान ।। ६२

चंद्रभागेतील स्नानाने पावन झालेली वारकऱ्यांची मने विठुरायाच्या दर्शनाने तृप्त होतात. हा तृप्तीचा दरवळ महाराष्ट्रभर पसरला आहे. म्हणूनच नद्या स्वच्छतेच्या मोहिमेत चंद्रभागेला नमन करणारे 'नमामि चंद्रभागा' हे अभियान राज्य सरकारने हाती घेतले आहे.


।। दुजा नको भाव होऊं देऊं..।। ६
।। बहुता सुकृताची जोडी । म्हणुनी विठ्ठली आवडी ।। १०
।। पालखी सोहळा ।। १२
।। वारी एक आनंदयात्रा ।। १६
।। पालखी सोहळ्याचे व्यवस्थापन ।। २३
।। ज्ञानदेवें रचिला पाया ।। २६
।। तुका झालासे कळस ।। २८
।। स्वच्छतेची वारी ।। ३०
।। पसायदान : ज्ञानेश्वरीचे अमृतमधुर फळ ।। ४०
।। विठुरायाची समता ।। ४३
।। आमुचा देव तो पांडुरंग । रंगले हे चित्त माझे तयापायी ।। ४६
।। आध्यात्मिक लोकशाहीचा आविष्कार ।। ४८
।। समचरणीं विठ्ठल उभा ।। ५०
।। श्री विठ्ठलाचे राजोपचार ।। ५२
।। एक समृद्ध पाऊलवाट ।। ५५
।। भक्तांसाठी सोयीसुविधा ।। ५७
।। समन्वयाची दिशा ।। ५८
।। सुसज्ज प्रशासन ।। ६०
।। नमामि चंद्रभागा अभियान ।। ६२
।। विदर्भाची माउली ।। ६४
।। नोंदी ।। ६६
।। होऊ या, माहिती दूत ।। ६७

वर्ष ७० वे | अंक २ | ऑगस्ट २०१८

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**महाराष्ट्र शासन**

**लोकराज्य**

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संपादक मंडळ — अजय अंबेकर, शिवाजी मानकर
- संपादक — सुरेश वांदिले
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर
- प्रशासन — मीनल जोगळेकर
- वितरण — मनीषा पिंगळे, मंगेश वरकड, अश्विनी पुजारी
- साहाय्य — स्वप्नाली जाधव, भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा. लि. महापे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारण: ०२२ - २२८१८३१२
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.

# ॥ संवादवारी : पंढरीच्या दारी ॥

**माहिती** व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने यंदा आषाढी वारीनिमित्त 'संवादवारी' हा अभिनव उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमामध्ये चित्रप्रदर्शन, पथनाट्य, एलईडी व्हॅन या बाबींचा उपयोग करून, शासनाच्या महत्त्वाच्या योजनांची माहिती वारकऱ्यांना दिली जात आहे.

देहू आणि आळंदी येथील दोन्ही पालख्या पुण्यात आल्यानंतर संवादवारी सुरू झाली. पुण्यातील दोन्ही प्रदर्शनांना वारकऱ्यांचा उदंड प्रतिसाद मिळला. चौकाचौकात लावले गेलेले चित्ररथ व एलईडी व्हॅनवरील प्रसारण, यामुळे वारकरी आकर्षित झाले. कलापथकातील कलाकारांनी शासनाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला.
श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांच्या रथापुढील दिंडी क्र. १ चे प्रमुख राणोजी वासकर महाराज यांनी चित्रप्रदर्शनाला भेट दिल्यानंतर 'संवादवारी' चे तोंडभरून कौतुक केले. 'वारकरी हाच शेतकरी असतो.. शेतकरी हाच वारकरी असतो.. या ठिकाणी लावले गेलेले चित्रप्रदर्शन खऱ्या अर्थाने आमच्या जिव्हाळ्याचे आहे. हा उपक्रम आमचे वारकरी निश्चितच पसंत करतील.'

दोन्ही पालख्यांबरोबर प्रारंभ ते शेवटपर्यंत प्रत्येकी दोन चित्ररथ राहतील. एलईडी व्हॅन, कलापथक व्हॅन, चित्रप्रदर्शन, पथनाट्य या माध्यमांसाठी या मार्गावरील पुढील महत्त्वाच्या गावांची निवड केली गेली. देहू मार्गावरील देहू - पुणे - लोणीकाळभोर - यवत - बारामती - निमगाव केतकी - बेलवंडी - इंदापूर - अकलूज- वाखरी- पंढरपूर तर आळंदी मार्गावरील आळंदी - पुणे - सासवड - जेजूरी - लोणंद - तरडगाव - फलटण - नातेपुते- माळशिरस- वेळापूर - भंडीशेगाव- बाजीराव विहीर- पंढरपूर अशी एकूण २४ ठिकाणे आहेत.

**प्रदर्शन संच:** प्रदर्शन संचामध्ये मुख्यमंत्री सहायता निधी, महात्मा फुले जनआरोग्य योजना, मागेल त्याला शेततळे, उन्नत शेती-समृद्ध शेतकरी, ठिबक सिंचन, मातीपरीक्षण कार्ड, गाळमुक्त धरण-गाळयुक्त शिवार, डिजिटल स्वाक्षरीचा सातबारा, प्रधानमंत्री पीक विमा योजना, बाजार समित्यांमध्ये सुधारणा आदी विषयांची माहिती देण्यात आली आहे. या प्रदर्शनात लावण्यात आलेली छायाचित्रे बोलकी असून, या छायाचित्रांमुळे प्रदर्शन आकर्षक बनले आहे. एक छायाचित्र एक हजार शब्दांचे काम करते, ते यानिमित्ताने पाहायला मिळत आहे. **पथनाट्य:** पथनाट्याच्या पथकात एक महिला व पाच पुरुष अशा एकूण सहा कलाकारांचा सहभाग आहे. सर्वच कलाकार मनापासून आपल्या अभिनयाची झलक पथनाट्यामध्ये दाखवत आहेत. **एलईडी व्हॅन:** एलईडी व्हॅनच्या स्क्रिनद्वारे विविध शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांवर आधारित चित्रफिती दाखवल्या जात आहेत. शासकीय योजनांतून नागरिकांना झालेला लाभ मांडण्यात आला आहे. तसेच लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.





# ।। रंगले हे चित्त माझे विठुपायी ।।



चंद्रकांत (दादा) पाटील, महसूल मंत्री

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक वैभवाचा सर्वश्रेष्ठ आविष्कार म्हणजे पंढरपूरची वारी होय. शेकडो वर्षांपासून अव्याहत सुरू असलेली ही वारी महाराष्ट्राच्या चैतन्याचा खरा स्रोत आहे. संतमहात्म्यांनी सुरू केलेल्या या वारीमध्ये आता लक्षावधी सामान्यजन सामील होऊन, पंढरीच्या वाटेने चालू लागतात. पंढरीचा विठुराया, विठोबा, विठुमाउली, पांडुरंग त्यांना अमाप उत्साह आणि ऊर्जा प्रदान करतो. त्यामुळेच शेकडो मैल अनवाणी चालूनही, या विठुभक्तांना थकवा जाणवत नाही, की त्यांना कोणतेही दु:ख आणि वेदना होत नाही.

पंढरीच्या वारीत महाराष्ट्रातील अठरापगड जातिधर्मातील लहान थोर सर्व जण सहभागी होतात. सामाजिक ऐक्य, बंधुभाव, समता यांचे मूर्तिमंत स्वरूप म्हणजे ही वारी होय. महाराष्ट्राला एकसूत्रात आणि एका धाग्यात बांधून ठेवण्याचे, अद्वितीय कार्य या वारीने शतकानुशतके केले आहे. महाराष्ट्रावर नैसर्गिक आणि मानवनिर्मित अनेक संकटे आली. परकीय आक्रमणे झाली. मात्र वारकऱ्यांच्या शक्तीने एकरूप आणि एकस्वरूप झालेला महाराष्ट्र या सर्व संकटांना पुरून उरला. आतासुद्धा ही शक्ती सामंजस्य, सर्वधर्म समभाव आणि सामाजिक ऐक्याचा महाराष्ट्रीय धर्म अधिकाधिक बळकट करण्याची भूमिका बजावत आहे.



'पंढरीची वारी' हे शिस्त कशी असावी याचे आपल्या देशातीलच नव्हे तर जगातील सुद्धा एकमेव उदाहरण असावे. लाखो माणसे एकत्र येतात आणि गुण्यागोविंदाने चालत चालत, ठिकठिकाणी मुक्काम करत, पंढरपूरला पोहोचतात. हा सर्व प्रवास विठ्ठलभक्तीने जसा भारून गेलेला असतो तसाच परस्परांतील स्नेह, प्रेम, वात्सल्य आणि आदरानेही भारून गेलेला असतो. त्यामुळे वारी निष्कलंक आणि निष्कपटरीत्या एका लयीत पुढे जात राहते.

विठुराया हा खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांचा देव. पंढरपुरात त्याची प्रत्यक्ष भेट घेताना कोणीही मध्ये येऊ शकत नाही. देवाच्या पावलावर डोके ठेवून आशीर्वाद मागण्याची संधी देणारा विठोबा हा एकमेव देव असावा. ज्याच्या चरणांवर संतश्रेष्ठ तुकाराम, नामदेव, छत्रपती शिवाजी महाराज यांनी डोके ठेवले त्या चरणांवर आपणासही डोके टेकवायला मिळते हे आपले किती मोठे भाग्य. या भाग्याच्या आड कुणीही येऊ शकत नाही, ही या पंढरीच्या विठुरायाची आपल्यावर मोठी कृपाच आहे.

पंढरपूरची वारी चंद्रभागेतील पवित्र स्नानाने पूर्णत्वास जाते. ही चंद्रभागा म्हणजे माउलीचे प्रतिरूपच होय. लाखो नागरिक चंद्रभागेमध्ये डुबकी मारून, पावित्र्याचा आनंद अनुभवतात. अशा या चंद्रभागेचे पावित्र्य अबाधित राहावे, यासाठी तसेच ही नदी प्रदूषणमुक्त व्हावी, यासाठी महाराष्ट्र शासन 'नमामि चंद्रभागा' ही महत्त्वाकांक्षी योजना राबवत आहे. आपले मुख्यमंत्री आणि वित्तमंत्री या प्रकल्पाकडे जातीने लक्ष देत आहेत. पुरेशा निधीची सोय करण्यात आली आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून नदी स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त करण्यासाठी मोठे घाट बांधले जातील, स्नानाच्या सुविधा केल्या जातील व वनश्री लावली जाईल.

पंढरपूर तीर्थक्षेत्राचे महत्त्व लक्षात घेऊन, शासनाने पंढरपूर परिसरचा सर्वांगीण आणि परिपूर्ण विकास करण्याचा निर्धार केला आहे. विविध विकास कामांसाठी पुरेशा निधीची तरतूद करण्यात आली आहे. अनेक कामे सुरू झाली असून, काही कामे पूर्णत्वास गेली आहेत. कॅनडा सरकारच्या सहकार्याने पंढरपूरचा स्मार्टसिटी म्हणून विकास केला जाणार आहे. पंढरपूरला येणाऱ्या भक्तांना सर्व प्रकारच्या उत्तमोत्तम सोईसुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

पंढरपूरवारीनिमित्त लोकराज्यचा विशेषांक आम्ही प्रकाशित करत आहोत. या अंकात विठुराया, वारीचे महात्म्य, वारीची परंपरा आदी विषयांवर अभ्यासकांचे लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. हा अंक आपणास आवडेल अशी आशा आहे. या वारीनिमित्त सर्व वारकऱ्यांना राज्य शासनाकडून मन:पूर्वक शुभेच्छा.विठुरायाने महाराष्ट्राला सुजलाम सुफलाम बनवण्यासाठी आशीर्वाद द्यावेत ही त्याच्या चरणी मन:पूर्वक प्रार्थना.

*तुका म्हणे करा जयजयकार आनंदे ।*
*गायीन ओवीया पंढरीचा देव ।।*
*आमुचा देव तो पांडुरंग ।*
*रंगले हे चित्त माझे तयापायी ।*
*म्हणवुनी घेई हाची लाहो ।।*

**चंद्रकांत (दादा) पाटील**
**(अतिथी संपादक)**

**श्रीपाद अपराजित**

पंढरीच्या विठ्ठलाचे एक बरे असते. तो कधी कोपत नाही. त्याला प्रसन्न करण्यासाठी सोळा पोस्टकार्ड पाठवा असे निरोप भूतकाळात कधी आलेले नसतात. अमुक इतक्या जणांना मेसेज फॉरवर्ड केले नाही तर तुमच्या संततीला अपघात होईल, अशी धमकीही पंढरीनाथाच्या नावाने सोशल मीडियावरून कुणी दिल्याचे ऐकिवात नाही. विठुरायाला असे स्वार्थासाठी अडकवून आपले सुप्त हेतू पूर्ण करण्याचे धाडस कोणातच नाही.

विठ्ठल लोकदैवत बनला तो त्याच्या पूर्वेतिहासातून. त्याने संतांना जवळ केले तसे तळागाळातील लोकांनाही. त्याच्यावर अधिकार गाजवताना कुणी त्याला शिव्यांची लाखोली वाहलीय, तर कुणी त्याला चक्क पंढरीचा चोर समजून मोकळा झाला. वर्णव्यवस्थेच्या चटक्यांनी पोळलेल्या संतांनी विठ्ठलाशी अक्षरश: भांडण उकरून काढलेले दिसते. 'बा विठ्ठला, तुला लाज कशी रे वाटत नाही,' असा वर्णव्यवस्थेबद्दलचा संताप व्यक्त करण्यासही संत कचरलेले नाहीत. 'आमुची केली हीन याती, तुज कां न कळे श्रीपती, जन्म गेला उष्टे खाता, लाज न ये तुमचे चित्ता' या चोखामेळ्याच्या अभंगांतून विठ्ठलासोबतचा जेवढा आक्रमक तेवढाच अधिकारवाणीतील संतसंवाद पारदर्शीपणे पुढे येतो. 'अरे विठ्या, अरे विठ्या, माझ्या मायेच्या कारट्या, अरे काळतोंड्या' या जनाबाईच्या रोषातही अंतस्थ ममता प्रकर्षाने जाणवते.

**विठ्ठल ही संकल्पना देवांच्या व्याख्येत मोडत नाही. तो लेकुरवाळा असल्याने त्याच्या अंगाखांद्यावर वारकरी बसलेले छायाचित्र आपण बघितलेले असते. त्याचे कॅलेंडर कुठेही का असेना, ते देखणे भासते. त्याची प्रसन्नता चेहऱ्यावरून ओसंडून वाहत असते. त्याचा काळा रंगदेखील शुभ्र फुलांसारखा टवटवीत भासतो. त्याची रंगसंगती कुणाला त्याज्य ठरवाविशी वाटत नाही. पांडुरंगकांतीला अकारण घासून गोरे करण्याचा खटाटोप कलावंतांनी केल्याचेही स्मरणात नाही. एखाद्या चित्रात त्याला अधिक आकर्षक दाखवायचे असेल तरी त्या रुपड्यात अधिकाधिक कभिन्नता दाखवण्याकडे, चेहऱ्यात गडदपणा साकारण्याकडेच कल दिसून येतो. ते अगणित लावण्य डोळ्यांत साठवून घेण्यासाठी अठरापगड समाजातील लोक धडपडत असतात. विठ्ठलाच्या मार्गाला भक्तीचा लोकरंग लगडला आहे.**



नामाचा गजर गर्जे भीमातीर । महिमा साजे थोर तुज एक ।।

# ।। दुजा नको भाव होऊं देऊं ।।

## मनोवस्थांचे हवे आकलन

अशा रागावलेल्या भक्तांच्या स्वप्नात येऊन विठुरायाने दृष्टान्त दिला आणि माझ्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करावी, असा आदेश दिल्याचे कुठेही लिहिलेले नाही. साध्या नामस्मरणातून नेत्री ओघळ दाटून येण्याची किमया तो करतो. गाभाऱ्यात येऊनच दर्शन घ्या असे निकषही त्याने बिंबवलेले नाहीत. कळसाकडे बघून परतलात तरी त्याच्या शापवाणीने कुणाची नौका बुडाल्याचे दाखले नाहीत. विठ्ठलाचा अमुकच वार असतो असेही नाही. तसे नीतिनियम एकाही वारकऱ्याने आखलेले नाहीत. त्याच्या नावाने उपवास करायलाच हवा असा कुठलाही दंडक नाही. उपवास न करणाऱ्यांना विठुरायाने पाप दिले अशा नोंदी ग्रंथात नाहीत. माझ्या नावाने व्रतवैकल्ये करा असे विठू सांगत नाही. कर्मकांडांची किंवा नकारघंटांची कुठलीही लांबलचक यादी न देता, विठोबाने आपल्या विनासायास भक्तीने लोकमानस जखडून ठेवले आहे. या भक्तिमार्गात स्वत:ला असे उत्स्फूर्त, स्वयंस्फूर्त जखडू देणे हाच मोठा संशोधनाचा आणि मानवी मनोवस्थांच्या बारीकसारीक आकलनाचा विषय आहे.

काळ बदलतो. लोकही बदलतात. आधीचा काळ वेगळा होता. आधी घरच्या लग्नसमारंभात बायामाणसांचे रस्त्यांवरील नृत्य कालसुसंगत नव्हते. आता मुक्त वातावरण आहे. महिला स्वातंत्र्याचा फारसा संकोच राहिलेला नाही. कुटुंबाच्या मुक्त आनंदाकडे लोकांचा कल वाढला आहे. आधी अमूक नाही, तमूक नाही अशी नाहीचीच जंत्री असायची. आता अमूक का करायचे नाही, तसे केल्याने नक्की काय होईल असे प्रश्न नव्या पिढीला पडायला लागले आहेत. काळानुसार दैवतांची आणि संतांची व्याख्या बदलली. दैवतांना सोनेरी सिंहासनांचा गाभारा लाभला. सुवर्णांकित मुकुटांचा सोस देवतांना नव्हे तर भक्तांच्याच अंतरंगाला खुणावत असतो. माणसाच्या हव्यासाचा अंत ही भक्तिमार्गाची खरी सुरुवात असते. आजकाल संत आणि साधूंच्याही भाषा आणि भूषेत बदल झालेत. कडक पोशाखात वावरणारे संत आढळतात. उसंत काढून ते राजकीय भाष्यही करताना दिसतात. अशा कुठल्याही मोहात न अडकण्याचा रिवाज पंढरीच्या रायाने सामान्य वारकऱ्यांमध्ये रुजवला आहे.

पंढरपूरच्या वारीची सुरुवातच मोह, माया आणि सांपत्तिक आस्थेच्या त्यागातून होते. पारमार्थिक सुखाची ओढ असली तरी समाजाच्या सामूहिक अस्तित्वाचा एक देखणा आणि तेवढाच शिस्तबद्ध उपक्रम म्हणून वारीकडे बघायला हवे. स्वअस्तित्वासाठी झगडणे ही नैसर्गिक प्रक्रिया असते. सहअस्तित्व ही त्याच मार्गातील उन्नतावस्था आहे. आपल्यासोबत दुसरेही जगावेत ही भावना



सहअस्तित्वातून विस्तारते. पंढरपूरची वारी ही सुपंथाकडे जाणाऱ्या सामूहिक अस्तित्वाचा अविष्कार आहे. वारकऱ्यांच्या वार्षिक एकत्रीकरणाविषयीची असोशी आणि त्याबद्दलची नित्यसिद्धता हा कमालीच्या औत्सुक्याचा भाग आहे. वारीतील शिस्तीने अनेक देशीविदेशी अभ्यासकांना चकित केले आहे. पायी चालणाऱ्या दर्शनाभिलाषी पावलांनी, आपल्या प्रेरणेला उच्चासनावर बसवलेले नाही. याउलट, भवसागर तारून नेण्याची आस ज्याच्या दर्शनाने फिटते; अशी श्रद्धा बाळगणाऱ्या भक्तांनी, देदीप्यमान मूर्तीला साध्या विटेवर प्रतिक्षेत उभे ठेवले आहे.

## लोकश्रद्धेचा महिमा

वारीची परंपरा माउलींच्या पूर्वीपासून चालत आली आहे. १२६० पूर्वीही पंढरपूरची ख्याती आणि भक्त पुंडलिकाच्या अख्यायिकेला जनमानसात स्थान होते. वारीचे अस्तित्व तेव्हापासून होते असे मानले तर ज्ञानदेवांच्या काळापासून वारीची लोकश्रद्धा अधिक प्रमाणात तळागाळात झिरपली असे समजावे लागेल. पालखी सोहळ्याची परंपरा मात्र जगद्गुरू तुकोबारायांचे पुत्र नारायण महाराज देहुकर यांनी तुकोबांच्या निर्वाणानंतर ३६ वर्षांनी म्हणजेच १६८५ मध्ये सुरू केली; असे संदर्भ सापडतात. वारीतील ज्ञानबा तुकारामाच्या गजराचे श्रेयही त्यांचेच. गुरू हैबतबाबा यांनी वारीत खरी शिस्त आणली. आळंदीतील विरक्त सेवामार्गाला लागण्यापूर्वी, श्रीमंत शिंदे सरकारांकडे ते सरदार होते. त्यांच्या संकल्पनेतून वारीत तेव्हा रुजलेली शिस्त आजतागायत कायम आहे. १८३१ पासून भजनपद्धती तसेच दिंडीक्रमाची नियमितता कोणतीही आडकाठी न येता सुरू आहे. एवढ्या दीर्घकाळ भक्तिमहिमेचे दृश्यस्वरूप तेवत ठेवण्यामागे विठ्ठलभक्तीसोबतच, वारीतील सहपथिकांविषयीच्या विश्वासाचाही वाटा मोठा असल्याची वास्तविकता लक्षात येते. या सर्व उपक्रमांत नियमांच्या सक्तीपेक्षाही स्वेच्छानिर्णयाचे स्थान महत्त्वाचे आहे. त्यात आसक्तीला नव्हे तर परस्पर सहकार्याला आदराचे स्थान आहे. एकादशी दुप्पट खाशी अशी विनोदी म्हण नंतरच्या काळात प्रचलित झाली असली तरी विठ्ठलभक्तांमध्ये उपासतापासांचे फार माहात्म्य नाही. गोपालकाला प्रसाद म्हणून मिळाला की, सुटला उपवास अशी त्यांची धारणा असते. हा कालादेखील श्रद्धेच्या सामूहिक संकल्पनेतील महत्त्वाचे प्रतिक आहे. तो केवळ एका घरून आलेला नसतो. सर्व भक्तांनी आपापल्या शिदोरीतून एकत्र केलेले पोहे, लाह्या, आणि दहीलोणच्याची सरमिसळ केली; की झाला काला. वारीतील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मीपणाचा अंत. एरवी दंभाची, अहंकाराची अनुभूती समाजात वावरताना सतत येते. वारकऱ्यांनी एकदा तुळशीची माळ घातली की, फक्त व्यसनाधीनता नव्हे तर मीपणाही सोडायचा असे संकेत आहेत. त्यामुळेच वारकऱ्यांमध्ये परस्परांच्या पाया पडण्याची प्रथा आहे. 'खेळ मांडियेला वाळवंटी घाई, नाचती वैष्णव भाई रे, क्रोध अभिमान गेला पावटणी, एक एका लागतील पायी रे' ही तुकोबांची रचना त्याच आत्मीयतेतून आली आहे. नामदेवांच्या ओवीत तर चक्क 'पायीं संतांच्या लागत, पाचारितो पंढरीनाथ' अशी ओळ येते. 'कानडाऊ विठ्ठलू' अशी आळवणी केली जाणारा विठ्ठल मूळ कर्नाटकी असला तरी नव्या काळानेदेखील त्याला प्रांतभेदांचा स्पर्श होऊ दिलेला नाही.

संतचळवळ सर्वसमावेशक होती. त्या काळात वर्णव्यवस्था घट्ट असतानाही, वारकरी संप्रदायातील परस्परांविषयीची ऐक्यभावना किती प्रबळ होती याची कल्पना येते. ज्ञानेश्वर, नामदेव, चोखामळा, सोयराबाई, बंकामेळा, कर्ममेळा, जनाबाई, कान्होपात्रा, गोरा कुंभार, शेख महंमद, सावतामाळी, सेनान्हावी, नरहरी सोनार, एकनाथ, तुकाराम यासारख्या संतांकडून वर्णव्यवस्था नाकारून; सामान्यांचा भक्तिपथ समृद्ध करण्याचे काम विठ्ठलनादाने करवून घेतले. मुख्य म्हणजे डोईवर तुळस घेऊन वारीला निघालेल्या पथिकांना स्त्री-पुरुष भेदाभेदही अमान्य होता. 'डोईचा पदर आला




माझे माहेर पंढरी, आहे भीवरेच्या तीरी ।

खांद्यावरी, भरल्या बाजारी जाईन मी', हे जनाबाईंचे मनोगत होते. 'अवघा रंग एकची झाला, रंगी रंगला श्रीरंग', असा धावा होता सोयराबाईंचा. स्त्री स्वातंत्र्य ही संकल्पना अस्तित्वात नसल्याच्या काळातील, या संतांच्या रचना लक्षात घेतल्या तर भक्तिपंथ किती भेदांच्या पल्याड पोहचला होता हे लक्षात येते. प्रतिष्ठित व्यवसाय नसलेल्या कान्होपात्रेलाही याच भक्तिमार्गाने उच्च स्थान दिले. तथाकथित प्रतिष्ठेच्या पार जाऊन, सर्वांना एका कवेत घेण्याची किमया वारीने घडवून आणली. याच संतवचनांचा जयघोष अजूनही प्रतिवर्षीच्या वारीत उच्चारवाने केला जातो. समकालिक आणि पूर्वसुरींच्या आदराची संतपरंपरा अबाधित ठेवण्याच्या कार्यात वारीचे योगदान अनन्यसाधारण आहे. वारीची सुरुवात झाली तो काळ गावोगाव पसरलेल्या जाखाई, जोखाई, मेसाबाई यासारख्या दैवतांना शरण जाण्याचा होता. अशी सर्व दैवते नाकारून सावळ्या, साजिऱ्या सहजभक्तीचा पर्याय उभा करण्याचे काम विठ्ठल वारीने केले.

## सहअस्तित्वाची जाणीव

पंढरीच्या वारीला हिंसाचार मान्य नाही. सर्व दैवते शस्त्रसज्ज असताना विठ्ठलमूर्तीसोबत साधी काठीही नाही. अशा नि:शस्त्र, अहिंसक दैवताच्या चरणी लीन होण्याची आणि तोच पंथ आयुष्यात अंगीकारण्याची प्रेरणा वारीने जिवंत ठेवली आहे. वारी हा फक्त भक्तीचा मार्ग आहे असेही नाही. तो कष्टकरी समाजाच्या खेळण्याचा, मनोरंजनाचाही मार्ग आहे. वारीच्या रिंगणातील तादात्म्यता, दिंडीतील भावविभोरता, भजनांमधील एकतानता या सर्व ब्रह्मानंदी टाळी लागण्याच्या अवस्था आहेत. जगातील करुणेचा जागर वारीच्या प्रवचनांमधून होतो. मैलोनगणती वारीत चालण्याचे बळ समस्त भूतसृष्टीची चेतना आणि वेदना अंतरंगात एकवटल्यानंतर, वारकऱ्यांच्या अंगी एकवटते. सांसारिक शीण घालवण्यासाठी कष्टकरी समाज पायी चालत पंढरी गाठतो. 'झुरोनी पांजरा होऊं पाहें आतां' अशी अनावर आस घेऊन चंद्रभागेकाठी आलेला वारकरी अनन्यभावाने विठ्ठलाच्या पायावर डोके ठेवतो. त्या दिव्य तेजामुळे सर्व चिंता दूर होतील असा भाव त्या पथिकांमध्ये असतो. भक्तिरसात चिंब झालेला वारकरी 'तुझे पायीं सुख सर्व आहे' या अवस्थेत गेल्यावरही साक्षात विठ्ठल दर्शनाच्या वेळी मात्र बावरून जातो. 'पाया पडू गेले तव पाऊलची न दिसे', अशी त्याची स्थिती होते. या मनोवस्थांची आणि एकूणच वारीची मानसिकता खोलवर जाऊन समजून घेण्याची गरज आहे. इरावती कर्वे म्हणजे बुद्धिप्रामाण्यवादी, निरीश्वरवादी विदुषी. त्यांनी आपल्या अभ्यास असोशीतून गुजरातचे वाळवंट तुडवले. डोंगरकपारींची वनभूमीही पालथी घातली. जनतेच्या मानसिक आंदोलनांचा अभ्यास करण्यासाठी, या महत्तम उंचीच्या लेखिकेला पांडित्याची झूल सोडून; पंढरीच्या वारीत रंगून जावेसे वाटले. मानववंश आणि समाजशास्त्राच्या आकलनातूनच त्यांचा बहिष्कृत, विजनवासी समाजाशी स्नेह जुळला, असे मत पु. ल. देशपांडे यांनी गुण गाईन आवडीमध्ये नोंदवले आहे. विठ्ठल हे इरावतीबाईंचे व्यसन होतेच, पण पंढरीचा विठू त्यांचा बॉयफ्रेन्ड होता,असे पुलं म्हणतात तेव्हा तुलनेने अशिक्षित समाजासोबत इरावतीबाई वारीत बेभान होऊन का नाचायच्या याची कल्पना आल्याखेरीज राहत नाही. आजच्या विज्ञानवादी युगातही पाच-सातशे उच्चशिक्षित युवकयुवती आयटी दिंडी काढतात. मागील काही वर्षांपासून विठोबा रखुमाईचा गजर करीत वारीत सहभागी होतात. जगण्याचे अध्यात्म जाणून घेण्याचा हा प्रयत्न असल्याचे मत अनुराधा ढेरे, श्रीहरी गादेवार, अभिजित फाळकेंसारख्या अभियंत्यांची पिढी व्यक्त करते तेव्हा त्यांच्या वारकरी सेवेचे कौतुक वाटते.

## जातीअंताच्या दिशेने

खेळाडूला पुरस्कार मिळताच गुगलवर जात शोधण्याच्या काळात आपण पोहचलो आहोत. वारीने मात्र जातिअंताच्या दिशेन भक्कम पाऊल टाकले असल्याचे लक्षात येते. भेदाभेदाला पूर्वापार स्थान नसलेली वारी, आधुनिक भारतातील जातविरहित समाजाचे प्रातिनिधिक रूप आहे. केवळ ओव्या वाचून हे सामाजिक अभिसरण साधले जाईल असे नाही. कर्मकांडात न अडकता मानवतेतच खरे हित दडले असल्याचे संकेत वारीने दिले आहेत. ती माणुसकी शोधणारे नेत्र समाजात विकसित करायला हवेत. प्रत्येक मोरपिसावर डोळे असले तरी, मोराच्या दोन डोळ्यांच्या दृष्टीने नेमके दृश्य बघितले नाही तर त्याला अर्थ नसतो; असे एक वचन भगवद्गीतेत आले आहे. त्याचा रसाळ अर्थ ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत समजावून सांगितला आहे. अगदी त्याच पद्धतीने वारीच्या मनोभूमिकांकडे सांगोपांगी वा ऐकीव माहितीवरून नव्हे तर पुरेशा डोळसपणे बघण्याची गरज आहे. वारी माहात्म्याची निव्वळ उजळणी करण्यापेक्षा प्रत्यक्ष जीवनात वारीतील सार्थकता अंगीकारणे आवश्यक आहे. 'पावलें पावलें तुझें आम्हां सर्व, दुजा नको भाव होऊं देऊं' हा जगद्गुरू तुकोबारायांनी विठ्ठलासाठी लिहिलेला अभंग समाजाने परोपकाराच्या भावनेतून आचरणात आणला तर भेदाभेदरहित समाज अस्तित्वात येऊ शकेल. सहअस्तित्वाची ती जाणीव निर्माण करण्याचे कार्य पंढरीच्या वारीमार्फत सातत्याने होते आहे. साक्षात पंढरपूरच्या गाभाऱ्यात कधीही न जाता, गाडगे महाराजांनी वारीतील नेमकी हीच सामूहिक भक्ती समाजसुधारणेकडे प्रवाहित केली.

सावळ्यासाठी बावळे झालेल्यांच्या देहीचा निर्मळ झळाळ, आम्हा बापुड्यांना टिपता आला तर सोन्याहून पिवळे. अन्यथा वारकऱ्यांची निर्वैर मानसिकता अभ्यासण्याचे परिश्रमदेखील वारीची अनुभूती नक्कीच देऊन जाईल. त्यासाठी जमेल तसा पंढरीच्या वारकऱ्यांशी संवाद साधायला हवा. एरवी शेगावच्या सेवेकऱ्यांचा निकोप, स्वच्छ वावरसुद्धा सूक्ष्म अवलोकनाचा वेगळा विषय आहे. या सर्व खटाटोपांत 'देवळीचा देव मेला, अंतरीचा जागवा हो' हे तुकोबांचे मानवीय श्रद्धा अभंग राखणारे वचन विसरू नये. 'दुजा नको भाव होऊं देऊं' या सामाजिक तन्मयतेत वारीच्या येरझारीचे कालसापेक्ष यशापयश दडले असेल, हे म्हणायचे ते तेवढ्यासाठीच.

**लेखक दै. महाराष्ट्र टाइम्सच्या नागपूर आवृत्तीचे संपादक आहेत.**
**संपर्क : ०९९२२२०८८२२**


राजस सुकुमार मदनाचा पुतळा

डॉ. द. ता. भोसले

विठ्ठल हे महाराष्ट्राचे आद्य दैवत आहे. मराठी मनाचा तो लाडका देव आहे. स्त्री आणि पुरुष, आबाल आणि वृद्ध, गरीब आणि श्रीमंत, साक्षर आणि निरक्षर, शेतकरी आणि नोकरदार, या सर्वांच्या रक्तामध्ये तो पूर्णपणे एकरूप झालेला आहे. देहाचं दुखणं सहन करताना एखादा वृद्ध म्हणून जातो, 'विठ्ठल विठ्ठल'. तेही अगदी अजाणता आणि सहजपणे. कडेवर घेतलेल्या बाळाला टाळी वाजवताना, आई शिकविते 'विठ्ठल विठ्ठल' म्हणायला. दळणाचे श्रम विसरण्यासाठी घामानं चिंब झालेली माउली म्हणते,'विठाई विठाई' आणि शेतात राबणारा बळीराजा विसावा घेताना सहजपणे म्हणतो, 'विठ्ठल विठ्ठल'.

### सुगंधाची पखरण

संतश्रेष्ठ तुकारामाच्या शब्दांत 'राजस सुकुमार मदनाचा पुतळा' असणाऱ्या विठोबाच्या नामस्मरणाने मलिन झालेले अंतरंग स्वच्छ होते. भक्तिरंगाने ते पूर्ण उमलते. मनाचा गाभारा प्रकाशाने अजळून निघतो. मनोभावे उत्कट हाक मारणाऱ्या भक्ताच्या हाकेला हा विठोबा धावून येतो, असा सर्वांचा अनुभव आहे. अंतरीची अनुभूती आली की, मनाला गाढ शांतीचा अनुभव येतो. आयुष्याच्या वाटेवर सुगंधाची पखरण होते. संसारी ताप, जाच पार विसरले जातात, पचेंद्रियांची गुलामी कमी होते. मन मुक्त होते, उन्नत बनते अशी अनुभूती या वारीत सहभागी झालेल्या भाविकांना येत असते. विठोबाची ही क्षमता इतर कोणत्या देवतेमध्ये असेल असे वाटत नाही. त्यामुळे या २१व्या शतकातही सुखसाधनांची समृद्धी असतानाही, वारीला जाणाऱ्या भक्तांची संख्या वाढतेच आहे. हे एक नवलच म्हणायला हवे.

विठुरायाचे हे वेड आणि पायी केली जाणारी पंढरीची वारी हे जगातले एक महान आश्चर्य आहे. लाखो वारकरी ऊन, वारा, पाऊस आणि गैरसोयी यांचा विचार न करता दरवर्षी एका अमानिक ओढीने २०-२१ दिवस पंढरीच्या दिशेने भजन-कीर्तन व नामाचा गजर करीत चालत राहतात. यात कुठलाही लौकिक स्वार्थ साधावयाचा नसतो. महापुराचे पाणी नदीबाहेर ओसंडून जावे तसा हा भक्तांचा महापूर रस्त्यावरून वाहत असतो. या महापुरातला प्रत्येकजण फक्त 'वारकरी' असतो. वतनदार आणि रोजगारी असला कसलाही भेद उरत नाही.

# ॥ बहुता सुकृताची जोडी । म्हणुनी विठ्ठली आवडी ॥

**विठोबा समाजाच्या संसारात, भक्तांच्या अंत:करणात आणि भजनाच्या प्रारंभी आणि मंदिराच्या गाभाऱ्यात विसावला आहे. त्यामुळेच पंढरीला जाऊन त्याचे गोजिरे रूप डोळ्यात साठवण्यासाठी देशातील पाच राज्यांतून सुमारे बारा लाखांपेक्षाही अधिक भाविक, आषाढीवारीच्या निमित्ताने संतांचे माहेर आणि महाराष्ट्राची आध्यात्मिक राजधानी असलेल्या या भक्तिपीठाला येत असतात. विठोबा या भक्तिपीठाचा कुलपती आहे.**

विठुरायाच्या वेडात केलेली ही आध्यात्मिक क्षेत्रापुरती फार मोठी सामाजिक क्रांती म्हणावी लागेल.

### समन्वयाचे रूप

इतर देवादिकांच्या तुलनेने या विठुरायाचे वेगळेपण असे की, मुळात हा भूमिपुत्र आणि गोपालन करणाऱ्या लोकांचा देव होता. या मंडळींची जनावरे चोरून नेणाऱ्या टोळीला विरोध करताना, ज्या वीराला हौतात्म्य लाभले, त्याचे वीरगळाच्या रूपात स्मारक करून पूजला जाणारा हा देव मानला जातो. म्हणजे हा मूळचा लोकदेव आहे. पुढे पुढे या लोकदेवाचे उन्नयन होत गेले. त्याला व्यापक आणि समन्वयाचे रूप प्राप्त होत गेले. जो गोकुळात भक्तीच्या सुखाने खेळला-बागडला आणि पुढे द्वारकेचा राजा म्हणून मिरविला, तो घनश्याम कृष्ण विठ्ठलरूपाने विराजत आहे; अशी लोकमानसाची धारणा झाली आणि ही धारणा, ही भावना साऱ्या मराठी भक्तिसाहित्यातून उसळते आहे.

संतांच्या दृष्टीने कटीवर कर ठेवून विटेवर उभ्या राहिलेल्या विठ्ठलाचे वर्णन करतात, तेव्हा त्यांच्या दृष्टीने तो गोकुळीचा घननीळाच भरून राहिलेला असतो. त्यानंतर त्याला आमच्या साऱ्या संतमंडळींनी 'विष्णूसहित शीव' मानले आहे. हरिहरांचा हा झालेला संगम धार्मिक क्षेत्रात ऐक्य निर्माण करणारा व या दोन दैवतांमध्ये असणारी दरी कमी करणारा ठरला आहे. इतर राज्यात या दोन दैवतांच्या भक्तांमध्ये जी कटुता जाणवते, जो दुरावा जाणवतो; तो महाराष्ट्रात जाणवत नाही. याचे कारण म्हणजे विठुरायाच्या रूपाने या दोन दैवतांचे झालेले अद्वैत म्हणावे लागेल. एवढेच नव्हे तर आणखी काही संशोधकांनी विठुराया हे बुद्धाचे रूप आहे, असे दाखवून दिले आहे. त्याला 'जिनपुत्र' बुद्ध असे म्हटले जाते. काहींनी त्याला 'दिगंबर' असे म्हटलेले आहे. या साऱ्यांचा अर्थ असा की, संतांनी आपल्या उदार आणि उन्नत दृष्टीतून शैव, वैष्णव, बौद्ध, जैन, इ.धर्मधारांचा विठ्ठलाच्या ठायी मधुर संगम साधला आहे. असा संगम इतर दैवतांमध्ये पाहावयास मिळत नाही, हे या विठु माउलीचे वेगळेपण आहे. अनेक संप्रदाय या भूमीत उदय पावले, नांदले आणि क्षीणही झाले; परंतु विठ्ठलभक्तीची धारा मात्र, अजूनही उभ्या महाराष्ट्राची भावभूमी भिजवत आहे.

### भक्तांना अभयदान

हा विठुराया कोट्यवधी भाविकांना वेड लावतो, त्याचे कारण हातात कुठलेही शस्त्र नाही. कुणाच्या हातात त्रिशूल आहे. कुणाच्या हातात धनुष्यबाण आहे. कुणाच्या हातात कुऱ्हाडीसारखे शस्त्र आहे. कुणाच्या हातात चाबूक आहे. कुणाच्या हातात तलवार आहे. विठोबा असा देव आहे की, कमरेवर हात ठेवून स्नेहपूर्ण नजरेने भक्तांना अभयदान देतो. एवढेच नव्हे तर विठोबाला कुठलेही वाहन नाही. मोर, गरूड, हत्ती, वाघ, घोडा, उंदीर अशा वाहनावर आरूढ असणारे देव आपण पाहतो; पण याच्या पायांखाली फक्त भाजलेली वीट आहे. त्याच्या पायाखाली असलेल्या विटेलाही सूचक अर्थ असावा असे वाटते. ही वीट दुहेरी काम करते. ती भिजते आणि आपल्या मनाचे बांधकाम करते. संसाराचा वीट आला तरी हरिनामाचा वीट ती येऊ देत नाही. विठुरायाच्या पायाखालची वीट आपणाला असा भावार्थ सूचित करते की, आपला देह हा मातीपासून निर्माण झाला आहे आणि तो शेवटी मातीत विसावला जाणार आहे, म्हणून या मातीचे विस्मरण होता कामा नये. जीवनाचे क्षणभंगुरत्व विसरता कामा नये. फार तर ती भाजून घ्यावी, म्हणजे काम, क्रोध, मद, मोह, आसक्ती, भोग या विकारांना काबूत ठेवून जगावे. हा संदेश ती वीट देत असावी. याची उपासना करताना कुठलाही डामडौल लागत नाही. या आपल्या विठुरायाला कोंबडा कापावा लागत नाही. बोकडाची हत्या करावी लागत नाही. त्यांच्या रक्ताचा अभिषेक करावा लागत नाही. या देवाला भांग, गांजा लागत नाही, त्याला नवस बोलावा लागत नाही. नवस न फेडणाऱ्या भक्तांवर तो सूड उगवत नाही, म्हणजे भक्तीच्या नावाखाली कर्मकांडांचे स्तोम माजविणारा हा देव नाही. त्याला साधा तुळशीचा हार घातला तरी तो प्रसन्न होतो. एखादे फूल पायाशी ठेवले तरी तो भक्ताला कृपाशीर्वाद देतो. त्याच्या उपासनेसाठी गळ्याइतक्या पाण्यात उभे राहावे लागत नाही. कायाक्लेश करत स्वत:चे हाल करावे लागत नाही. विशिष्ट कपडे आणि विशिष्ट पदार्थ खाल्ले पाहिजेत असा त्याचा दंडक नाही. एका पायावर उभे राहून नामस्मरण करणे, फक्त एकच वेळ जेवणे, फक्त पांढरा पदार्थ खाणे वा वर्ज्य करणे, असली व्रते करायलाही तो सांगत नाही. हा देव इतका सामान्य माणसाच्या पातळीवर उतरला आहे व त्याला भाजी-भाकरीचा नैवेद्यही चालतो. त्यात त्याचे समाधान होते. अलीकडच्या काळात त्याच्या सेवकांनी इतर काही गोष्टी केलेल्या असल्या तरी ती विठुरायाची मागणी नाही.

### सोपी आचारसंहिता

विठुरायाच्या भक्तिसंप्रदायाची आचारसंहिता खूप वेगळी आहे आणि सोपी आहे. चंद्रभागेचे स्नान, तुळशीची गळ्यात माळ, कपाळी गंध, विठ्ठल मंदिराला प्रदक्षिणा आणि विठुरायाचे नामस्मरण करणे या गोष्टी केल्या तरी हा विठोबा असा एकमेव देव आहे की, ज्याच्या चरणावर माथा टेकवून त्याचे तृप्त दर्शन होते. शिर्डीच्या साईबाबांचे दर्शन दहा फुटांवरून घ्यावे लागते. बालाजीचे दर्शनही जवळ जाऊन मूर्तीला स्पर्श करून घेता येत नाही. इतर देवदेवतांचे दर्शनही दूर अंतरावरूनच घेता येते. असे दर्शन झाले नाही तर अनेक वारकरी त्याच्या मंदिराच्या कळसाचे दर्शन घेऊन समाधान पावतात. पण आपल्याप्रमाणेच विठ्ठलासाठी आलेल्या कुणी अपरिचित वारकरी समोर आला तर त्याच्यामध्येच विठ्ठलास पाहून, ते दोघेही एकमेकांच्या चरणांना स्पर्श करून भक्तिभावाने नमस्कार करतात. वारकऱ्यांमध्येच विठ्ठल पाहणे ही किमया फक्त पंढरीमध्येच आपणास पाहावयास मिळते. विठुरायाचे हे वेगळेपण म्हणावे लागेल.

### जगण्याची ऊर्जा

या विठुरायाने गेल्या नऊशे वर्षांपासून सामान्य माणसाला जगण्याची ऊर्जा पुरवली आहेच, पण त्याबरोबरच एक फार मोठा

संदेश सर्व संतांच्या साहित्यातून आपल्या मनावर कोरलेला आहे. तो संदेश म्हणजे परमेश्वराच्या प्राप्तीसाठी संसारी माणसाला संसाराचा त्याग करण्याची गरज नाही. हिमालयात जाऊन आणि गुहेमध्ये बसून तपश्चर्या करण्याची गरज नाही. प्रपंचाला परमार्थाची जोड देता येते. प्रपंचाला डोळे नसतात आणि परमार्थाला पाय नसतात. म्हणून जीवनाची अंतिम यात्रा सुखासमाधानाची व्हावयाची असेल तर प्रपंचाने परमार्थाला आपल्या खांद्यावर घेऊन, त्याने दाखवलेल्या दिशेने वाटचाल केली तर जीवनाला पूर्णत्व प्राप्त होते, हा संदेश विठुरायाच्या थोर संतांनी आपल्या साहित्यातून समाजासमोर ठेवला. आपला विहित व्यवसाय करतानासुद्धा मुखाने नामस्मरण केले तरी तो प्रपंच बाधत नाही. म्हणूनच सावतामाळ्याला पिका-पाण्यात विठोबा दिसला. जनाबाईच्या दळणाला तो भावला. गोरोबा कुंभाराला मातीची मडकी करताना उभा असलेला दिसला. म्हणून प्रत्येक संसारी माणसाने आपला उद्योग करीत असताना, परमार्थ साधला तर विकृतीने आणि आसक्तीने गढूळ झालेला प्रपंच माणसाला बद्ध करीत नाही; या चिरंतन सत्याचा साक्षात्कार घडविणारा विठुराया आहे. म्हणून संसारी माणूस आषाढी वारीच्या निमित्ताने या संसाराकडे पाठ फिरवतो.

### मूल्यांची उपासना

केवळ प्रपंच आणि परमार्थ यांच्या अद्वैत रूपासाठीच विठोबा आठवावा असे नाही. मानवी जीवनाला श्रीमंत आणि समृद्ध करणारी जी चिरंतन मूल्ये आहेत, त्याचे अनुसरण व्हावे, ती आचरणात आणावीत यासाठीही आज विठोबा आवश्यक आहे. आपल्या ज्ञानोबापासून तो विठोबापर्यंतच्या साऱ्या संतांनी या जीवनमूल्यांचा उद्घोष केला आहे. त्यांचे श्रेष्ठत्व पुन्हापुन्हा विशद केले आहे. सदाचार, सद्‌विचार, पावित्र्य, चारित्र्य, नीतिमत्ता, औदार्य, सेवा, करुणा, अनासक्ती आणि समर्पण यांसारख्या मूल्यांच्या उपासनेतूनच व्यक्तीचे कल्याण होऊ शकते, हा संदेश आपणाला संतसाहित्य देत आहे. पैशाला परमेश्वर मानणाऱ्या, शरीर सुखोपभोगांना शरण गेलेल्या, चंगळवादाची शिकार बनलेल्या आणि दुसऱ्याचे शोषण करून; त्याच्या जिवावर राजविलास भोगणाऱ्या आजच्या समाजाला या चिरंतन मूल्यांची अधिकच गरज आहे. आज माणसातला पशू हिंस्त्र झाला आहे आणि त्याच्यातले देवत्व विझत चालले आहे. अशा शरीरसुखाने तृप्त आणि आत्मिक सुखाने अतृप्त असलेल्या समाजासाठी, विठुराया भक्तीसाठी नसला तरी या शाश्वत मूल्यांसाठी खूप गरजेचा आहे, यात शंका नाही.

ही सारी वैशिष्ट्ये केवळ विठुरायाच्या ठिकाणी सामावलेली असल्याने श्री ज्ञानदेव म्हणतात-


*बहुता सुकृताची जोडी । म्हणुनी विठ्ठली आवडी ।*
*सर्व सुखाचे आगर । बापरखुमादेविवर*

संपर्क: ०९४२२६४६८५५

*संपत्ती सोहळा नावडे मनाला । लागला टकळा पंढरीचा ।।*
*जावे पंढरीशी आवडी मनाशी । कै एकादशी आषाढी ये ।।*
*(श्री तुकाराम महाराज)*
*माझे जीवीची आवडी । पंढरपुरा नेईन गुढी ।।*
*पांडुरंगी मन रंगले । गोविंदाचे गुणी वेधीले ।।*
*(श्री ज्ञानेश्वर महाराज)*

**श्रीतुकाराम महाराजांची पालखी आषाढी वारीला श्रीक्षेत्र देहू गावाहून निघून पंढरपूरला प्रतिवर्षी जात असते. हा पालखी सोहळा महाराजांचे सुपुत्र नारायण महाराज यांनी सुरू केला.**

# ।। पालखी सोहळा ।।



**श्रीधरबुवा देहूकर**

श्रीनारायण महाराज हे श्रीतुकाराम महाराजांच्या पादुका व श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका एकाच पालखीत ठेवून, ती पालखी समारंभपूर्वक मोठ्या सोहळ्याने दिंड्या, पताका, गरुड टक्के टाळमृदंगांच्या घोषात वैष्णव मंडळीसह; ज्ञानोबा–तुकाराम भजन करत आषाढी वारीला देहूहून पंढरपूरला नेत असत. हा पालखी सोहळा सुमारे तीनशे वर्षांपूर्वी सुरू झाला. तो आजतागायत अखंड चालू आहे. त्यापूर्वी कोणाही संतांची पालखी त्याच्या जन्मगावाहून आषाढी वारीला पंढरीला नेली जात नव्हती. श्रीनारायण महाराजांनी पालखीच्या सोहळ्याची आणि ज्ञानोबा–तुकाराम भजनांची प्रथा सुरू केली. तशी पंढरीची वारीही श्रीतुकाराम महाराजांच्या घराण्यात पिढ्यान्‌पिढ्या चालू होती. तुकाराम महाराज सांगतात की, *पंढरीची वारी आहे माझे घरी । आणि न करी तिर्थव्रत ।। (तु.अ.)* या घराण्याचे मूळ पुरुष विश्वंभरबाबा (तुकाराम महाराज त्यांच्यापासून आठव्या पिढीचे वंशज), त्यांना त्यांची आई जाणीव करून देते की–

*तुझ्या वडीलो वडीली निर्धारी । चालविली पंढरीची वारी ।।*
*त्यासी सर्वथा अंतर न करी । तरीच संसारी सुफळपणा ।।*
*(महिपती, तुकारामचरित्र)*

'तुझ्या वाडवडिलांनी पंढरीची वारी निर्धाराने चालवली, आता



छाया : शिरीष शेटे

जाऊ म्हणती पंढरीची वाटे, कळीकाळा भय वाटे ।।

तू चालीव' मातेची आज्ञा शिरसावंद्य मानून विश्वंभरबाबा दर पंधरा दिवसांच्या एकादशीला पंढरपूरला जाऊ लागले.

विश्वंभरबाबानंतर त्यांचे पुत्र हरी व मुकुंद हे क्षात्रवृत्तीने राहू लागले. देहू सोडून राजाश्रयाला गेले. पुढे त्या राज्यावर इस्लामी परचक्र आले. त्यामध्ये धारातीर्थी पडले. धाकट्या मुलाची पत्नी पतीबरोबर सती गेली.

थोरल्या मुलाची पत्नी गरोदर होती. पुढे तिला मुलगा झाला. त्याचे नाव विठ्ठल ठेवले. त्याने श्रीविठ्ठलाची सेवा परत सुरू केली.

बोल्होबानंतर पंढरीची वारी श्रीतुकाराम महाराज करू लागले. त्यांची दिंडी मोठी होती. दिंडीत १४०० टाळकरी होते. ही सर्व टाळकरी मंडळी वारीच्या वेळी देहूला जमत असत. तुकाराम महाराज दर वद्य एकादशीला दिंडीसहवर्तमान आळंदीसही जात व कीर्तन करत. ती परंपरा अजूनही चालू आहे. इतकेच नव्हे तर त्यांनी आळंदीला श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांचे मंदिर बांधले, असा उल्लेख Bombay Presidency Volume-Part 3, Poona gazetteer 1885, Page 102 to 104 मध्ये केलेला आहे.

नंतर तुकोबा सर्वांसह मोठ्या सोहळ्याने निघत. तुकोबांचा वारीचा नेम कधी चुकला नाही. पण एकदा ते वारीच्या वेळेला आजारी पडले. तशाही स्थितीत ते वारीला निघाले. पण पाऊल उचलेना. वारीला अंत पडल्याचे दु:ख श्रीतुकोबांना अनिवार झाले. ते शोक करू लागले. वारीला जाण्याकरिता आलेल्या वारकऱ्यांबरोबर त्यांनी एक २४ अभंगांचे पत्र देवाला दिले. ते मुळातच गाथेमध्ये पाहावे. प्रसंग फारच हृदयद्रावक व अंत:करणाला पीळ पाडणारा आहे.

नंतर वारकरी पंढरीहून वारी करून संत तुकाराम महाराजांच्या भेटीस आले, त्यांना भेटले. त्या वेळी त्यांना ब्रह्मांड ठेंगणे झाले.

श्री तुकोबा वैकुंठाला जाईपर्यंत हा वारीचा सोहळा प्रतिवर्षी पार पाडीत असत. ते वैकुंठाला गेले त्या वेळी त्यांची मुले लहान होती. तेव्हा पंढरीच्या वारीची परंपरा तुकोबांचे धाकटे बंधू कान्होबा यांनी चालू ठेवली.

निळोबा संतनामावलीत कान्होबांविषयी लिहितात – कान्होबा तुकोबांचे अनुग्रहित होते, तुकोबांबरोबर असणाऱ्या वैष्णवजनांत निधडे आणि श्रेष्ठ होते. ते प्रेमळ हरिभक्त होते. कीर्तनकार होते. त्यांची अंभगवाणी प्रासादिक आहे.

विश्वंभरबाबांच्या पूर्वजांपासून तुकयाबंधू कान्होबापर्यंत घराण्यात अखंड चालू असलेल्या पंढरपूरच्या आषाढी वारीचा उगम, विकास, वारकरी संप्रदाय, श्री क्षेत्र पंढरपूर व विठ्ठल देवता यांचा धांडोळा घेऊ या.

## आषाढी वारीचा उगम–विकास

आषाढी कार्तिकी वारीचा उगम, श्रीविठ्ठल अवताराच्या उगमांबरोबर आहे. जशी भगीरथ राजाने महत्प्रयासाने स्वर्गातून गंगा पृथ्वीतलावर पूर्वजांच्या उद्धाराकरिता आणली, तसे भक्त पुंडलिकाने महत्प्रयासाने परम सत्तेला जगाच्या उद्धाराकरिता निराकारातून, निर्गुणातून, सगुणासाकारतेला आणले. त्याची कथा अशी आहे –

भक्त पुंडलिक शिवाचे भक्त होते. त्यांनी शिवाची आराधना केली. त्या आराधनेने महादेव प्रसन्न झाले आणि विचारले, काय मागणे आहे ते मागा. 'आपण स्मशानात बसून त्याचे रात्रंदिवस चिंतन करता ते दैवत कोठे आहे?' शिवाने पुंडलिकाला एक लोहदंड दिला आणि सांगितले, हा लोहदंड जेथे तरेल त्या ठिकाणी ते आहे. पंढरीतीर्थात तो लोहदंड तरला. पुंडलिकाने त्या ठिकाणी तो प्रगट व्हावा म्हणून लोळण घेतली. आपला हट्ट पुरवावा याकरिता लहान मूल जशी लोळणी घालते.

वोळला सहज म्हणजे प्रगट झाला. सगुण स्वरूप धारण केले, आकाराला आल्यानंतर विचारले, 'काय मागणे आहे? काय इच्छा आहे?' पुंडलिकाने काय मागितले – तो काय म्हणाला?

*म्हणे पुंडलिक देवा शिरोमणी ।*
*परीसावी विनवणी एक माझी ।।*
*संसार बंधने तोडावी दर्शने । हे मागणे तुजप्रती ।।*

संसारबंधने तोडावीत, पंचमहापातक्यांचा, जडजिवांचा–महादोषीयांचा उद्धार करावा, पतितांना सनाथ करावे ही माझी उत्कट इच्छा आहे. ती पुरवावी – नारायणाने पुंडलिकाला वर दिला. हे सर्वजण विठ्ठलदर्शनाने मुक्त होतील, त्यांचा उद्धार होईल.

भक्त पुंडलिकाने जसे देवाला आपले हृदयीचे गुज–रहस्य सांगितले, तसे देवानेही पुंडलिकाला आपल्या अंत:करणाचे गुज सांगितले. कोणते ते?

*देव गुज सांगणे पंढरीस । जारे प्रेम सुख घ्यारे नाम माझे ।।*
*(श्रीनामदेव महाराज)*
*आषाढी कार्तिकी विसरू नका मज । सांगतसे गुज पांडुरंग ।।*
*(श्रीतुकाराम महाराज)*

गीतेत भगवान श्रीकृष्ण अर्जुनाची इच्छा पुरविण्याकरिता विश्वरूप झाला आणि परत विश्वरुपाला कृष्णरूप. तोच विटेवर उभा राहिला.

*गीता जेणे उपदेशिली । तेची विटेवरी माउली ।।*
*(श्रीतुकाराम महाराज)*

पंढरीला जायचं कसं तर गात. नाचत आणि मागायचं काय, तर प्रेम!

*नाचत जाऊ त्याच्या गावा रे । खेळीया सुख देईल विसावा रे ।।*
*गात जागा गात जागा । प्रेम मागा विठ्ठली । (श्रीतुकाराम महाराज)*

संतांचा संदेश जनतेने ऐकला. संतवचनानुसार वारीचा सोहळा सुरू झाला. येथपर्यंत सांप्रदायिक पारंपरिक दृष्टिकोनातून आषाढी–कार्तिकीची वारी, श्रीक्षेत्र पंढरपूर, भक्त पुंडलिक व श्रीविठ्ठल देव यांचा धांडोळा घेतला.

आता शिलालेख–ताम्रपटांतून या विषयावर काय प्रकाश पडतो व इतिहास संशोधक काय म्हणतात ते पाहू.

पंढरपुरात आतापर्यंत जे शिलालेख उपलब्ध झालेले आहेत ते –

- त्यामध्ये शके ११५९ (इ.स. १२३७) होयरसाळ राजाच्या कारकिर्दीतील शिलालेख आहे. तो सोळा खांबी मंडपाच्या तुळईवर तिन्ही बाजूने लिहिलेला आहे. तो संस्कृत आणि कानडी अशा संमिश्र भाषेत, देवनागरी लिपीत आहे. त्याच्यात पुंडलिक मुनींचा व विठ्ठल देवाचा उल्लेख आहे. तसेच तुळईच्या पूर्वभागातील ७१व्या ओळीत वारीचा उल्लेख आहे. पंढरीच्या वारीचा हा सर्वात प्राचीन उल्लेख होय.



विठ्ठल विठ्ठल गजरी । अवघी दुमदुमली पंढरी ।। छाया : सुनील उंबरे

■ तसाच दुसरा महत्त्वाचा शिलालेख शके ११९५ (सन १२७३) मधील. याला चौऱ्यांशीचा शिलालेख म्हणतात. या शिलालेखात पंढरपुरास फागनीपूर व विठोबास विठ्ठल असे म्हटले आहे. याच्यात रामचंद्रदेव यादवाचा उल्लेख आहे. त्यात त्यांना पांढरीफडमुख्य म्हणून संबोधले आहे.

■ शालिवाहन शके ११९० मधील हा एक प्राचीन शिलालेख आहे. त्यात विठ्ठल देवाचा उल्लेख आलेला आहे. हे देऊळ बांधले याविषयी आहे. त्यात देवालय बांधणाऱ्यांची नावे आली आहेत. पंढरपूर येथे सापडलेल्या शिलालेखातून विठ्ठलाचे उल्लेख आले आहेत. पण ताम्रपटात पंढरपूरचे पांडुरंगपल्ली असे नाव आहे हे त्याचे वैशिष्ट्य आहे. हा ताम्रपट शके ४३८ म्हणजे इ.स. ५१६चा आहे.

पंढरी गाव शालीवाहन शकाच्या प्रारंभापासून वसलेले आहे. विठ्ठल मंदिरही त्या वेळेपासून आहे असे मालू सोनाराने मालूतारण ग्रंथात म्हटले आहे. पण ग्रंथ अलीकडील असून ऐतिहासिक कसोटीला उतरलेला नाही.

वरील सर्व गोष्टी लक्षात घेता श्रीपुंडलिक महामुनींच्या कालासंबंधी व श्रीविठ्ठल देवाच्या कालासंबंधी निश्चित ऐतिहासिक पुरावा हाती आला नाही.

डॉ. भांडारकर, डॉ. डेलरी, डॉ. शोभना गोखले, डॉ. वा.ल.मंजूळ वगैरे इतिहास संशोधकांनी श्रीविठ्ठल देवाचा, पंढरी क्षेत्राचा, पुंडलिक मुनिराजाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. हा शोध चालू आहे. पण अद्याप संशोधन पूर्णतेला पोहोचले नाही. मान्यवर इतिहास संशोधक डॉ. ढेरे यांनी संशोधनाकरिता पंढरपूर प्रकल्प हाती घेतला. त्यांच्या संशोधनानुसार त्यांनी हल्लीची मूर्ती ही आद्य नसून, माढ्याची विठ्ठलमूर्ती आद्य आहे असे ठरवले. तथाकथित आद्य माढ्याच्या मूर्तीच्या दर्शनाला यात्रा सुरू झाली. माढ्याची विठ्ठलमूर्ती आद्य नाही व हल्ली विटेवर असलेली श्रीविठ्ठलमूर्तीच आद्य आहे, असे डॉ. सदानंद देहूकर यांनी सप्रमाण सिद्ध केल्यावर व देहूकर यांच्या मताचे डॉ. ढेरे यांना खंडन न करता आल्यामुळे, त्यांनी पवित्रा बदलून कोण्या एका संन्याशाने आद्य विठ्ठलमूर्तीला इजा केल्यामुळे; बडव्यांनी मूर्ती बदलली व तिच्या जागी सांप्रतच्या नव्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली अशी भूमिका घेतली. त्यावर भारत इतिहास संशोधक मंडळात चर्चासत्र होऊन त्यात, डॉ.देहूकर यांनी सप्रमाण सिद्ध केलेली, सांप्रत विटेवर असलेली मूर्ती हीच आद्य मूर्ती आहे. इजा झालेल्या भागाला टेकू देऊन तीच पुन्हा प्रस्थापित केली, असे मान्य झाले.

महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र या प्रांतात यादवकालापासून जे संप्रदाय-उपासना मार्ग चालू आहेत, त्यांमधील वारकरी संप्रदाय हा सर्वात प्राचीन असा आहे. त्याला आदी संप्रदाय म्हटले असता वावगे होणार नाही. रामानुजाचार्य, वल्लभाचार्य, मध्वाचार्य, निंबार्क यांचे वैष्णव संप्रदाय आहेत. वारकरी संप्रदाय सर्वांगीण-संपूर्ण आहे. वारी हा या संप्रदायाचा प्राण आहे. त्याचा तो पारिभाषिक शब्द आहे. विठ्ठलाची वारी करणारा तो वारीकर - वारकरी

*'बाप रखुमादेवीवर विठ्ठलाचा वारीकर'*

मराठी संस्कृतीतील सर्वात प्रभावी प्रवाह संतांच्या मार्गाचा अर्थात वारकरी पंथाचा आहे याबद्दल दुमत होण्याचे कारण नाही. हा प्रभाव केवळ सामाजिक किंवा धार्मिक नसून नैतिकही आहे. वारकरी संप्रदाय हा जनसामान्यात ज्याची पाळेमुळे खोलवर रुजली आहेत असा पंथ आहे. पंढरपूरची वारी हा वारकरी संप्रदायाचा मुख्य आचारधर्म होय. वारी ही ज्ञानदेवपूर्वकालीन प्रथा आहे. किंबहुना वारकरी हे नावच वारीमुळे पडले आहे.

संदेश भंडारे

छायाचित्रामध्ये एखादा प्रसंग गोठवून ठेवण्याची क्षमता मला छायाचित्रण करायला प्रवृत्त करते. असाच एक प्रसंग गेली अनेक वर्षे माझ्या डोळ्यासमोरून जात नाही. पुंडलिकाने जशी आपल्या आईवडिलांना बरोबर घेऊन वारी केली व त्यांना चंद्रभागेत स्नान घातले. वारकरी आज आपल्या आईवडिलांची तशीच सेवा करताना दिसतात. २००१ साली आषाढी एकादशीला गेलो असताना हे दृष्य दिसले. वारी परंपरेमध्ये असणारी सेवाभावी वृत्ती या छायाचित्रात पकडता आली याचा आनंद वाटला. त्यात ज्येष्ठ वारकरी पाणी अंगावर पडताना शांत चित्ताने डोळे मिटून समाधान अनुभवत होता. पायी वारी केल्यानंतरच्या या स्नानाने त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते. आठशे वर्षाच्या या वारी पंरपरेचा छायाचित्रात्मक शोध घेण्याची प्रेरणा त्या छायाचित्राने मिळाली.

'वारी एक आनंदयात्रा' हे पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर छायाचित्रातील शंकर भैरू गाडे या गडहिंग्लज तालुक्यातील वारकऱ्याची भेट झाली. त्यांना स्नान घालणारी ती माणसे त्यांच्या कुटुंबातील नव्हती एवढेच नाही तर ते त्यांच्या ओळखीचेदेखील नव्हते, ना ते एका दिंडीतील होते. हे त्यांच्याकडून समजले. वडीलधारी व्यक्ती एकटीच स्नान करताना पाहून त्यांनी ती व्यक्ती आपल्याच कुटुंबातील असे समजून स्नान घालणे, या मिळालेल्या माहितीमुळे टिपलेला प्रसंग एका वेगळ्याच पातळीवर पोहोचला.

**इतिहासात राजाश्रयाने अनेक संप्रदाय मोठे झालेले आपल्याला पाहायला मिळातात, पण वारकरी संपद्राय हा लोकाश्रयानेच मोठा झाला आहे. आषाढी एकादशीच्या निमित्ताने दुथडी भरून वाहणाऱ्या नदीसारखा वारकऱ्यांचा जनसमूह, दरवर्षी ज्ञानबातुकारामच्या जयघोषात व टाळ-मृदंगाच्या गजरात पंढरपूरकडे जातो. ५०-६० वर्षांपूर्वी काही हजारात मोजता येईल, अशी संख्या असणारा वारकरी समुदाय आज लाखोंच्या संख्येने पंढरपूर मार्गावर पायी चालताना दिसतो.**

# ॥ वारी एक आनंदयात्रा ॥



पंढरपूरच्या वारीला वारकरी कोणत्या प्रेरणेने जातात? दोन-अडीचशे किलोमीटर, ऊनपावसाची पर्वा न करता कसे काय चालत जातात? चंद्रभागेतील स्नानाने काय मिळते? अशा प्रश्नांची उत्तरे या प्रसंगाने मिळाली. वारकऱ्यांना कोणत्या प्रकारचे आत्मिक समाधान मिळत असेल हे त्या प्रसंगातून दिसत होते.

वारीची प्रथा कधी सुरू झाली याबद्दल निश्चित माहिती उपलब्ध नाही, परंतु ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत हे आषाढी व कार्तिकी वारीत पंढरपूरला गेल्याचा उल्लेख संत नामदेवांनी केलेला आहे. म्हणजे किमान आठशे वर्षांपासून वारीची परंपरा महाराष्ट्रात होती असे म्हणता येईल. वारीची प्रथा तुकाराम महाराजांच्या घरातही होती. त्यांच्याबरोबर चौदाशे टाळकरी होते असे सांगतात. तुकाराम महाराज


ऐसा नामघोष, ऐसे पताकांचे भार । ऐसे वैष्णव दिगंबर, दावा कोठे ।।

ज्येष्ठ वद्य अष्टमीला आळंदीला जायचे. ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचे दर्शन घ्यायचे आणि नवमीला पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान करायचे.

गेली सात-आठशे वर्षे ऊनपावसाची पर्वा न करता ज्ञानोबा-तुकारामचा जयघोष करत लाखो वारकरी देहू-आळंदीपासून पंढरपूरपर्यंत आषाढी-कार्तिकी पायी वारी करतात. वारीला कोणी आयोजक नाही ना प्रायोजक. त्यासाठी कुणी जाहिरात करत नाही.

वारीमध्ये उच्चशिक्षितांपासून ते निरक्षरांपर्यंत, श्रीमंतांपासून ते गरिबांपर्यंत सर्वजण एकोप्याने प्रवास करतात. खेड्यातील शेतकरी, देवळातला पुजारी, गावचा जमीनदार आणि त्याच्याकडे असलेला गडी, वाड्याचा मालक आणि वाडा झाडणारा घरगडी, कीर्तन-प्रवचन करणारे महाराज ते स्वयंपाक करणारे आचारी हे सारे तितक्याच भक्तिभावाने आणि श्रद्धेने वारीच्या जनसमुदायात एकरूप झालेले असतात. विठोबाच्या भेटीच्या निमित्ताने झालेल्या प्रवासामुळे अनेक फायदे होतात. आपले गाव सोडून इतर भू-प्रदेशाचे निरीक्षण होते. पीक-पाण्याची स्थिती समजते. समाजजीवनातील बदल, स्थित्यंतरे समजतात. कमीत कमी गरजांमध्ये दिवस काढण्याचा अनुभव मिळतो.

सांसारिक दु:खांमध्ये गळ्यापर्यंत बुडलेल्या माणसाला वारीत सामील झाल्याने, तत्कालीन संसारमुक्ती प्राप्त होते. विठ्ठलाच्या समोर सारे एक आहेत. फक्त विठ्ठल-भक्त आहेत. अन्य कुणीही नाही. ही समता आणि माणुसकीची शिकवण या वारीच्या निमित्ताने रुजविली जाते. आज भौतिक सुखांची रेलचेल असलेल्या काळातसुद्धा, हजारो भक्तगण प्रखर उन्हातान्हात पायी वारीत मोठ्या प्रमाणावर सहभागी होताना दिसतात. हरिनामाचा नि संतांचा जयघोष करीत सुमारे २५० किलोमीटर चालत गेल्यावर पंढरपुरातील पांडुरंगाच्या दर्शनाने वारकरी धन्य होतो. वारी करून परतलेला वारकरी, जीवनात एक नवचैतन्य घेऊनच परततो. सर्वसामान्यपणे प्रापंचिक माणसाला हठयोग, कठीण व्रतवैकल्य, गहन तत्त्वज्ञान, ग्रंथाचे पारायण, तत्वचर्चा अशा गोष्टी अवघड वाटणे स्वाभाविक आहे. यासाठी सुलभ भक्तिमार्ग वारकरी संप्रदायाने निर्माण केला. भक्ती व उपासना करणे ही तपस्वी, योगी, तत्त्वचर्चा करणारे पंडित यांनाच फक्त शक्य असलेली बाब नाही, तर आपणही संसार करता करता भक्ती करू शकतो, असा दिलासा संप्रदायाने समाजाला दिला. त्यामुळे प्रपंची भक्तिमार्गाकडे मोठ्या प्रमाणात वळले. संप्रदायातील संतांच्या अनेक अभंगामध्ये देव हा माता, पिता, बंधू, सखा आहे, या संकल्पना आढळतात.

### भेदाभेद नाही

ईश्वराने सर्व प्राणिमात्रांना निर्माण केले. मग तो उच्चनीच असा भेदाभेद करणार नाही, हा विचार संप्रदायाने मांडला. श्रेष्ठत्व-कनिष्ठत्व किंवा जातिभेद यांना थारा दिला नाही. परमेश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे, हा विचार वारकरी संप्रदायाने मांडला. वारकरी संप्रदायांच्या संतांची नावे पाहिली तरी त्यामध्ये सर्व समावेशकता दिसते. वारकरी संप्रदायात ज्ञानदेव, नामदेव शिंपी, चोखोबा, बंका महाराज, नरहरी सोनार, सावता माळी, गोरा कुंभार,



आम्हा राग विठ्ठलु, रंग विठ्ठलु, संग विठ्ठलु वैष्णवांचा ।

सेना न्हावी, तुकोबा वाणी, एकनाथ आदी संत झाले. त्याचप्रमाणे मुक्ताबाई, जनाबाई, निर्मळा, कान्होपात्रा, बहिणाबाई या संत–कवयित्रीही आहेत. या नावांना सांप्रदायिक महत्त्व आहे, तसेच सामाजिक महत्त्वही आहे. त्या काळी स्त्री–शुद्रांना भक्ती करण्याचा किंवा मोक्ष मिळविण्याचा अधिकार नाही असे मानणाऱ्या प्रस्थापितांवर वारकरी संप्रदायाने कठोर प्रहार केलेला आपणास दिसतो. ज्या काळात स्त्रीस्वातंत्र, स्त्रियांचे हक्क अशा कल्पनाही सुचणे शक्य नव्हते अशा काळात संप्रदायाचे हे कार्य फारच मोठे ठरते. ज्ञानेश्वर भावंडापैकी मुक्ताबाई (१२७९–१२९७), नामदेवाची दासी जनाबाई (१२६० ते १३५३), तुकारामाची शिष्या बहिणाबाई (१६२८–१७०८) या समर्थ कवयित्री होऊन गेल्या. त्यांनी भक्तिपंथात आपले स्थान निश्चित केले. परमार्थकारणात स्त्रियाही उच्चपदाला पोहोचू शकतात हे त्यांनी दाखवून दिले आणि म्हणून स्त्रियाही माळकरी बनून, पंढरपूरची वारी करू लागल्या.

### कर्तव्य सोडू नका

संत ज्ञानेश्वर, आपली कर्तव्ये सोडू नका असे सांगत, ज्ञानेश्वरीत कर्म, ज्ञान, भक्ती अशा तीन योगांबद्दल सांगितले आहे. संस्कृत भाषेत असलेली गीता ही त्यांनी मराठी भाषेत आणली. त्यामुळेच ज्ञानेश्वरांना वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञ व अध्यात्मिक गुरू मानतात. संत एकनाथांच्या भारुडामध्ये लोकांचे प्रबोधन करायचे आहे. भेदरहित वारीत जायचे आहे. अशी वर्णन मिळतात. त्यांच्या रचनांमध्ये कर्मकांड, अंधश्रद्धा यांच्या विरोधात भाष्ये आहेत. लोकांच्या रंजनाबरोबर भक्तिमार्गाची शिकवण द्यायची ही गोष्ट त्यांनी भारुडांमधून साधली होती. त्यांनी गोंधळी, भराडी, वासुदेव, डोंबारी, महार आदीमध्ये विठ्ठलभक्तीचे लोण पसरवले. विशेषत: भटक्या जमातीतील लोकांना त्यांनी भक्तिमार्गाची दिशा दाखविली.

तुकाराम महाराज हे ज्ञानदेवांच्या परंपरेतील एक संत होते. त्यांच्यामध्ये ज्ञान, भक्ती आणि वैराग्य यांचा सुरेख संगम झाला आहे. उच्च–नीच भावना समाजाने टाकून देण्याबाबत ते उपदेश करतात. धर्माच्या नावाखाली माजलेल्या अनाचाराबद्दल तुकाराम महाराजांनी आपल्या अंभगात कोरडे ओढले आहेत. भुतेखेते, क्षुद्र देवतांची उपासना, मंत्रतंत्र, जादूटोणा आणि दांभिकपणा यापासून त्यांना समाजाला दूर न्यायचे होते. तुकाराम महाराज खऱ्या अर्थाने लोककवी होते. पूर्ण हयात ते सामान्य लोकांत वावरले. त्यांचे अभंग म्हणिसारखे लोकांच्या तोंडात बसले. त्या काळातील जनजीवन त्यांच्या अभंगामुळे आपल्याला आज कळते.

पालखी निघाली की, तिच्या पुढे–मागे दिंड्या क्रमाने उभ्या राहतात. हा क्रमांक पालखीपासून पुढे आणि मागे अशा पद्धतीने असतो. प्रत्येक दिंडीच्या अग्रभागी भगव्या पताका घेतलेले त्या दिंडीचे झेंडेकरी असतात. हा रंगही ठरलेला असतो. हा भगवा, चकचकीत भगवा नसून मातकट रंगाचा असतो. काहीसे मातकट रंगाचे मांजरपाटाचे कापड कावेत बुडवल्यावर जो रंग तयार होतो तो या पताकीचा रंग असतो. झेंडेकऱ्यांच्या मागे टाळकरी व वारकरी चौघांच्या रेषेत चालत असतात. मध्यभागी मृदंग असतो, तर

दिंडीच्या शेवटी विणेकरी असतो. हे विणेकरी दिंडी नियंत्रित करतात. विणेकऱ्यांच्या पाठीमागे महिला वारकरी असतात. त्यापैकी काहींच्या डोक्यावर तुळशी वृंदावन तर काहींच्या डोक्यावर पाण्याने भरलेला हंडा असतो. भजन करीत वाटचाल करणाऱ्या वारकऱ्यांची तहान या हंड्यातील पाण्याने भागवली जाते. दिंड्या नसलेले अनेक वारकरी डोक्यावर बोचकी घेऊन, सोहळ्यात पुढे चालत असतात. कोणत्याही दिंडीत नसलेल्या वारकऱ्यांची संख्या मोठी असते. दिंडीकरी त्यांचा मोकळा समाज असा उल्लेख करतात. हा मोकळा समाज वाटेत येणाऱ्या गावकऱ्यांच्या सेवेवर सर्वस्वी अवलंबून असतो. त्यांचे राहणे, खाणे वारीमार्गातील गावकरी करतात.

### अभंग म्हणण्याचा क्रम

दिंड्यांमध्ये अभंग म्हणण्याचा निश्चित क्रम ठरलेला असतो. या क्रमानुसार अंभग असणारी पुस्तके उपलब्ध असतात. वारीमध्ये नवीन सामील होणारे वारकरी हे पुस्तक हातात धरून अभंग म्हणताना वारीमध्ये दिसतात. जय जय रामकृष्ण हरी या भजनाने सुरुवात करून अभंग म्हणत, दिवस संपला की, सायंकाळी नित्यनेमाने हरिपाठ व प्रवचनाचा कार्यक्रम होतो व या भजन कीर्तनाच्या कार्यक्रमामुळे दिवसभर चालणाऱ्यांचा शीण निघून जातो. अठरा ते एकवीस दिवसांची ही आनंदयात्रा पंढरपूर मुक्कामी आषाढी एकादशीला पोहोचली, की चंद्रभागेच्या डोहामध्ये स्नान करून पांडुरंगाचे दर्शन घेऊन वारकरी तृप्त होतो. पंढरपूरमध्ये येणाऱ्या प्रत्येक वारकऱ्याला पांडुरंगाचे दर्शन घेता येत नाही. विठोबाचे दर्शन घ्यायला दर्शनबारीमध्ये सुमारे अठ्ठेचाळीस ते पन्नास तास वारकरी रांगेत उभे असतात. सेकंदाला सुमारे आठ ते सत्तर याप्रमाणे चोवीस तासात सुमारे नव्वद हजार भाविकांना दर्शन घडू शकते. तीन दिवसात जास्तीत जास्त सुमारे तीन लाख भाविकांना दर्शन मिळते. बाकीच्या भाविकांना कळसदर्शन घ्यावे लागते. एकादशीच्या दिवशी प्रचंड चेंगराचेंगरी, उलटसुलट दिशेने जाणारे वारकरी यांनी एकच गर्दी उडालेली असते. पंढरपूरची लोकसंख्या सुमारे पंच्याहत्तर हजार आहे. तेवीस हजार उंबरे असलेल्या या गावात आठ ते दहा लाख लोकांच्या नित्य–कर्माची सोय होऊच शकत नाही. त्यामुळे सर्व नागरी सुविधांचा बोजवारा उडतो यात नवल नाही.

### ग्रामरचनेचे घटक

महाराष्ट्रात ज्या काळात संत निर्माण झाले आणि संप्रदाय वाढला, त्याला त्या काळातील सामाजिक, राजकीय परिस्थिती कारणीभूत होती. त्या काळी संतांचा गावगाड्याशी जवळचा संबंध होता. ते बलुतेदार–अलुतेदार या वर्गातून आलेले होते.त्या काळाची ग्रामरचना ही स्थानिक गणराज्याच्या स्वरूपाची होती. ही गणराज्येच गावाचे नियोजन करीत होती. पाटील गावाचा प्रमुख होता. गावाच्या भौतिक आणि नैतिक प्रगतीची जबाबदारी त्यांच्यावर असे. कुलकर्णी हा गावाचा महसूल सांभाळणारा अधिकारी त्याचा दुय्यम अधिकारी असे. बलुतेदार–अलुतेदार हा वर्ग प्रामुख्याने कारागीर वर्ग होता. हा वर्ग गावाचे दैनंदिन व्यवहार आणि शेतीच्या कामांना उपयोगी पडणारे व्यवसाय सांभाळणारा होता. कुणबी हा संख्येने जास्त, त्यामुळे महत्त्वाचा घटक होता. गावातील हे घटक जातिव्यवस्थेचा पाया होते तसेच ते सामाजिक, आर्थिक रचनेचाही पाया होते. जात आणि आर्थिक रचना ही परंपरात गुंतलेली होती. बलुतेदार हा वर्ग समाजाच्या पाठीचा कणा होता. ही ग्रामव्यवस्था जसे गावाचे नियमन करीत असे, तसेच भटक्या जमातींना तिचा आधार होता. ही व्यवस्था जातिबद्ध होती. प्रत्येक जातीने आपापली कामे करावयाची अशी श्रमविभागणी होती.

महाराष्ट्र राज्यातील जातींची यादी पाहिली, की या संमिश्र जनसमूहाची कल्पना यायला हरकत नाही. हे जनसमूह येताना आपापल्या बोली, आपले देव, रांगड्या धर्मकल्पना, संस्कार, आचारविचार, श्रद्धा, रुढी आणि परंपरा घेऊन आलेले होते. त्यांच्या विविध जातिजमाती आपापली जात व संस्कार सांभाळून समाजातच, पण वेगळेपणाने राहत असत. हे सर्व समाज जसे एकत्र राहू लागले



कन्या सासुऱ्यासी जाये, मागे परतोनि पाहे
तैसे झाले माझ्या जीवा, केव्हा भेटसी केशवा ।

तसे त्यांच्या बोलीभाषांचे व्यवहारात मिश्रण होऊ लागले. पूर्वीच्या महाराष्ट्री आणि प्राकृत भाषांचे राहिलेले अवशेष आणि या विविध बोलीभाषांचे मिश्रण यांमधून या मूळ लोकांच्या बोलीच्या पायावर जी सामान्य भाषा तयार झाली, तीच मराठी भाषा. या सर्व बोलीभाषांमध्ये मराठी बोलीला महत्त्व प्राप्त झाले आणि बाकीच्या बोलीभाषा मागे पडल्या किंवा त्या त्या समूहापुरत्या मर्यादित राहिल्या. मराठी भाषेच्या घडणीमध्ये या विविध बोलीभाषांमधून असंख्य शब्दांचा भरणा होत गेला. त्यामुळे मराठी ही एक शब्दसंपन्न भाषा झाली व त्याचे अत्युच्च स्वरूप ज्ञानेश्वरीमध्ये दिसते. संतकवी, पुढच्या काळातील पंतकवी आणि तंतकवी (शाहीर) यांच्या भाषाप्रभुत्वामागे



आम्हा ताल विठ्ठलु, मेळ विठ्ठलु ।



रंग भरे कीर्तनात । प्रेमें हरिदास नाचत ।।

मराठी भाषेचे शब्दसामर्थ्य आहे हे विसरून चालणार नाही.

## जनसमूहांचे एकत्रीकरण

विविध जनसमूहांमध्ये विसंवाद होऊ नये, संघर्ष उद्‌भवू नये, यासाठी सर्वांना एकत्रित करणे आवश्यक होते. जे विविध जनसमूह एकत्र आहे, त्यात वेताळ, जोखाई, मरीआई अशा देवतांची उपासना, भुते–खेते, जंतरमंतर, जादूटोणा इत्यादी प्रकार तसेच त्यांच्या अंधश्रद्धा, पशूबळी, नरबळी इत्यादी आपापल्या क्रूर प्रथाही सर्व लोक घेऊन आलेले होते. या सर्वातून बाहेर काढून त्यांना आचरणात आणायला साधा–सोपा धर्म शिकविणे आवश्यक होते. हे काम संतांनी केले. अशा परिस्थितीत भागवत धर्माचा आधार घेऊन, संतांनी समाजाला नेतृत्व देण्याचे कार्य केले. नामभक्तीचा उपदेश देऊन पंढरपूरच्या विठ्ठलाचे चिंतन करा, अशी शिकवण दिली. भारतात अनेक देवतावाद आणि सर्वेश्वरवाद प्रचलित होते. त्याचा अव्हेर न करता विठ्ठलाभोवती सर्वांना एका पायरीवर आणण्याचे काम संतांनी केले.

## एकमेव देव

ज्याच्या पायाला स्पर्श करता येतो, असा विठ्ठल हा एकमेव देव आहे. वारकरी संतांनी भक्तिमार्गामधल्या दलालाचे अथवा पुरोहितशाहीचे उच्चाटन करून, देव थेट भक्तापर्यंत आणला. आपल्या नावाचा स्पष्ट निर्देश करून विविध जातीतील आणि विविध थरातील माणसे अभंगरचना करू लागली. नामा म्हणे, म्हणे गोरा कुंभार, सावता म्हणे, जनी म्हणे, एका जनार्दनी. असा स्पष्ट नामोच्चार संत करू लागले. बा. रं. सुंठणकर यांच्या म्हणण्यानुसार आपल्या कृतीवर स्वत:चा नामनिर्देश करणे म्हणजे मानवातील व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार होणे होय. मानवातील अस्मिता जागी झाल्याचे ते लक्षण आहे.

त्या काळी धार्मिक वाङमय संकृतात होते. सामान्य जनांना त्यात स्थान नव्हते. एवढेच नव्हे, तर ते श्रवण करण्याचा अधिकारदेखील नव्हता. धर्माचा, विद्येचा, संकृतीचा मक्ता ब्राह्मण वर्गाने स्वत:करिता राखून ठेवला होता. इह–परलोकाची मक्तेदारी या वर्गाने आपल्याकडे राखून ठवेली होती. त्या काळी पैठण येथील पुरोहित वर्ग समाजाच्या सर्व धार्मिक बाबींवर घट्ट नियंत्रण ठेवून होता. या सर्व पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील संतांनी वैष्णवांपासून स्फूर्ती घेतली व येथील परिस्थितीला अनुसरून स्वत:चा संप्रदाय निर्माण केला. मराठी संतांनी तत्कालीन समाज, विशेषत: शूद्र–अतिशूद्र वर्गाला धर्माची व ईश्वराची कल्पना दिली. जगामध्ये ईश्वर एकच आहे. हे सांगून जनतेला अगदी साधा व सुटसुटीत धर्माचा आणि मोक्षाचा मार्ग सांगितला. भागवत संप्रदायातील कोणाही संताने संन्यासाचा पुरस्कार केला नाही. घरदार आणि प्रपंचा सोडून रानावनात किंवा मठात जा आणि मोक्ष मिळवा असा उपदेश त्यांनी कधीही केला नाही. नामजपाने तुमची भक्ती ईश्वरापर्यंत पोहोचते अशी शिकवण दिली. मूर्ती, पूजाअर्चा नको, विधी

जाता पंढरीस सुख वाटे जीवा ।



नकोत, होम–हवने, मंत्र–तंत्र नको तर साधे आचरण, निर्मळ अंत:करण आणि निष्ठायुक्त भक्ती हवी, असे थोडक्यात संताच्या शिकवणुकीचे सार होते, मूर्तिपूजा, कर्मठपणा आणि दांभिकता यावर संतांनी चौफेर हल्ले चढविलेले दिसतात.

### संतांचा भक्तिमार्ग

संतांच्या या भक्तिमार्गात पुरोहित वर्गाला मुळीच स्थान नव्हते. सनातन्यांच्या पैठण येथील धर्मपीठांविरुद्ध चंद्रभागेच्या वाळवंटात त्यांनी स्वत:चे केंद्र उभे केले. पैठणकडे डोळे लावून बसणाऱ्या समाजाला त्यांनी पंढरपूरकडे कळविले. पंढरपूर महाराष्ट्राचे नवे स्फूर्तिकेंद्र बनले. येथे महाराष्ट्र, कर्नाटकातील कानाकोपऱ्यांतल्या गावातील सामान्य जनता वारी करू लागली. एकेश्वरवादाची कास धरून, भक्तिमार्गाचा पूर्णपणे अवलंब करणारा वारकरी पंथ संतांनी निर्माण केला. पुढे कित्येक शतके हा पंथ फोफावत गेला. पंढरीच्या झेंड्याखाली बहुजनसमाज गोळा होत होता. धार्मिक आघाडीवरील सामान्य जनांचे बंड संतांच्या नेतृत्वाखाली यशस्वी होत होते.

पूर्वी वारकऱ्यांमधून नवनवे तेजस्वी संत निर्माण होत होते. संतांनी स्वत: चमत्कार केल्याचे उल्लेख कोठेच दिसत नाहीत. पुढील परंपरेतील कवी, जुन्या संतांची चरित्रे, चमत्काराने भरलेली गुणवर्णन लिहू लागले. त्यात संप्रदायात नसलेल्या व्रताचे माहात्म्य गोवले गेले. मूळ संप्रदायात व्रतांना स्थान नव्हते. त्यामुळे या संतभक्तांनी संतांच्या जीवनातील मनुष्यपण घालवून टाकले.

### आधुनिक शिक्षणाचा प्रभाव

इंग्रजी राजवटीमध्ये आधुनिक शिक्षणाच्या प्रभावातून शिकलेल्या विद्वानांनी वारकरी परंपरेकडे आस्थेने पाहिलेले आपल्याला दिसते. वारकरी संप्रदायाला योग्य नेतृत्व मिळाले तर सामाजिक परिवर्तनाची प्रभावी शक्ती बनू शकेल, असे लोकहितवादींना वाटत होते; तर तुकोबामधला शेतकरीपणा महात्मा फुल्यांना जाणवला. त्यांनी तुकोबाचे वर्णन 'शेतकऱ्यांचा संत' असे केले आहे. सत्यशोधक समाजाला सुरुवातीला जे अनुयायी मिळाले ते वारकऱ्यांच्या प्रभावक्षेत्रातले आणि पुष्कळदा वारकरी कुटुंबातून आलेले होते. सत्यशोधकांनी अभंग, दिंड्या आणि कीर्तन यांचा उपयोग केला होता. तुकोबा तर प्रार्थना समाजाचा प्राण होते, असे म्हटले तरी चालेले. प्रार्थनासमाजातील भांडारकर, चंदावरकर, रानडे तर तुकोबांच्या हाताला धरून चालले होत असे दिसते.

विठ्ठल रामजी शिंदे यांच्या डिप्रेस्ड क्लास मिशनद्वारे जातिनिर्मूलन करताना, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दलितांमध्ये चेतना निर्माण करताना आणि गांधीजींना हरिजनांना जवळ घेताना; तुकोबांसारख्या वारकरी परंपरेतल्या संतांचा आधार होता. पुढे हरिजनांना विठ्ठल मंदिर प्रवेशाकरिता साने गुरुजींनी बडव्यांना आवाहन केले. त्याच्याकडे बडव्यांनी दुर्लक्ष केले. शेवटी, १ मे १९४७ रोजी चंद्रभागेमध्ये स्नान करून त्यांनी आपल्या उपोषणाला सुरुवात केली. सनातन्यांनी विरोध केला, पण शेवटी बडव्यांना माघार घ्यावी लागली.



या सुखाची उपमा नाही त्रिभुवनी।

### साधेपणाचा फायदा

भोळ्याभाबड्या वारकऱ्यांच्या साधेपणाचा फायदा घेऊन त्यांची दिशाभूल करणारी माणसे आजही आहेत. मी वारीतून जात असताना अनुभवलेला एक प्रसंग. विश्रांतीच्या ठिकाणी परंपरेने रूपकावर आधारित भारुडे सादर केली जात होती. त्यामुळे विश्रांतीबरोबर थोडे–फार मनोरंजन होते. भवानीनगर या विश्रांतीच्या ठिकाणी एक वारकरी, स्त्री–रूप घेऊन भारूड सादर करत होता. कार्यक्रम चालू असताना मध्येच एका शर्ट पँट घातलेल्या शहरी गृहस्थाने त्या भारूड सादर करणाऱ्याला अडवले व त्याला म्हणाला, की तुमच्या या स्त्री–रुपातील पंढरपूरच्या पायी वारीचे सगळे पुण्य निघून जात आहे. त्या शहरी गृहस्थाच्या बोलण्याने भारूड करणारा वारकरी थांबला. तो बुचकाळ्यात पडला. यापूर्वी त्याला असे कोणी अडवले नव्हते. तो काही उत्तर देऊ शकला नाही. तेव्हा मी मध्ये पडलो. त्याच या वेषभूषेवरून तो पूर्वी कधी वारीला आला असेल असे वाटत नव्हते. त्याला मी प्रथम विचारले, की यापूर्वी कधी आपण वारीला आला होता का? त्याने सांगितले की, हे पहिलेच वर्ष आहे. मी विमा कंपनीमध्ये होतो. आता रिटायर झालो आहे. मग मी त्याला म्हणालो, की सातशे–आठशे वर्षाची वारीची परंपरा आहे. तेव्हापासून भारूड करणारे वारकरी आहेत. भारूडच्या माध्यमातून संत एकनाथांनी आपले विचार प्रभावीपणे मांडले आहेत. तुम्हाला आपल्या परंपरेची माहिती नाही आणि तुम्ही इथे भारूड करणाऱ्या वारकऱ्याला अडवत आहात. एकतर वारीमध्ये पहिल्यांदाचा आला आहात. तेव्हा प्रथम वारी समजावून घ्या व आपल्याला माहिती नसलेल्या गोष्टीबद्दल मतप्रदर्शन करू नका. एवढ्या समजावणीचा त्यांच्यावर परिणाम

झालेला दिसला नाही. त्यांची टकळी चालूच राहिली. म्हणून मी त्यांना पुढे म्हणालो की आपल्याशी बोलला तो परंपरेने वारकरी आहे. त्यामुळे तो आपणाशी उलट बोलला नाही; पण मी परंपरेने वारकरी नाही. त्यामुळे मी तुम्हाला उलट बोलू शकतो. आपण गुमान येथून निघून जा. ही दटावणीची मात्रा लागू पडली व गृहस्थ निघून गेले. वारकरी विवाद करीत नाहीत. चटकन दुसऱ्याच्या सांगण्यावर विश्वास ठेवतात. याचा गैरफायदा घेणारे एक उदाहरण. तेथे रस्त्याच्या कडेला जीप लावून, काही माणसे दिंडीप्रमुखांना अडवत होते आणि संवाद साधत होते. ही काय गडबड आहे ते जवळ जाऊन पाहिले. शासन आपण करत असलेल्या



आम्हा नादी विठ्ठलु, आम्हा छंदी विठ्ठलु ।

अंधश्रद्धाविरोधी विधेयकामुळे वारीवर बंदी येईल, म्हणून त्याविरोधी पत्रकावर सही करा, असे ते आवाहन करीत होते. ते पत्रक वाचले असता, त्यात वारीचा उल्लेख नव्हता. पत्रक न वाचता त्यावर ते घाईघाईत सहया घेत होते. अशा प्रकारे धार्मिक भावना भडकावून त्याचा फायदा घेण्याचा ते प्रयत्न करत होते. त्यांच्याशी बोलायचा प्रयत्न केल्यावर त्यांनी अरेरावीची भाषा केली व आपला उद्योग तसचा चालूच ठेवला.

### मौखिक परंपरेचा सन्मान

आषाढी वारीच्या कालावधीत या संतांची कवने व अभंग गात वारकरी संपूर्ण मार्गक्रमण करतात. आज लिखित परंपरेला मोठा सन्मान मिळत आहे. आपल्याकडे मौखिक परंपरा हजार वर्षाहून जुनी आहे. या मौखिक परंपरने आपली भाषा टिकवण्याचे काम महाराष्ट्रातील अशिक्षित कष्टकरी जनतेने केले आहे. गेल्या शंभर–दीडशे वर्षाच्या लिखित परंपरेपेक्षा अधिक सकस लिखाण या नऊशे–हजार वर्षाच्या मौखीक परंपरेत झाले आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. सातशे–आठशे वर्षात सहा ते सात लाख एवढ्या मोठया लोकसंख्येकडून कवितांचा गजर केला जातो. जगाच्या इतिहासात असे उदाहरण एकमेव असेल. वारकरी काही प्रसंगी देवाशीसुद्धा चार हात करायला मागेपुढे पाहत नाहीत, त्यालाही ते आव्हान देतात. वारीच्या सोहळ्याचा मुलभूत संदेश भक्ती, शांतीची स्थापना, समानता हा असतो. हा संप्रदाय जात, धर्म, वर्ण आदी भेदभाव मानत नाही. वारीत सहभागी होणाऱ्या शेतकरी व कष्टकऱ्याचे आत्मभान जागृत करण्याचे काम या वारीत होत असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही.

### नतमस्तक होणारे वारकरी

*विष्णुमय जग । वैष्णवांचा धर्म ।। भेदाभेद भ्रम । अमंगळ ।।*

ही वारकरी संप्रदायाची भावना आहे. आजही वारकरी एकमेकांला माउली म्हणून संबोधतात. जात, धर्म याचा विचार न करता समोरच्या व्यक्तीच्या पायावर नतमस्तक होतात. मात्र, चंद्रभागेच्या तीरावर जातीभेद विसरून उभा राहिलेला हा समूह, गावोगावच्या सीमा ओलांडून गावातील जातिपाती उद्ध्वस्त करण्याइतका अजून प्रभावी ठरलेला नाही. जातिव्यवस्थेचे जहर आपल्याकडे खूप खोलवर पसरलेले आहे, हे सत्य मागे उरतेच.

नामदेव, चोखोबा, बंका महाराज, नरहरी सोनार, सावता माळी, गोरा कुंभार, सेना न्हावी, तुकोबा, एकनाथ आदी संत. त्याचप्रमाणे मुक्ताबाई, जनाबाई, निर्मळा, कान्होपात्रा, बहिणाबाई यांच्या अभंगात प्रचंड सामाजिक भान आहे. समाजात होणाऱ्या चुकीच्या गोष्टींवर त्यांनी कोरडे ओढले आहेत. अलीकडचे कीर्तनकार आपल्याला असं करताना दिसत नाहीत. सगळ्यांना सांभाळून घेतात. आपल्याला काय देणंघेणं असा त्यांचा व्यवहार असतो.

प्रभावशाली अशा पाश्चात्त्य संकृतीच्या संपर्कात आलेल्या शिक्षितांनादेखील आज वारीमध्ये कुतूहल निर्माण होत चालल्याचे



आम्हा श्रुति विठ्ठलु, श्रोता विठ्ठलु ।

आपल्याला पाहायला मिळते. वारीमध्ये शेतकरी व कष्टकऱ्यांबरोबर प्राध्यापक, डॉक्टर, उद्योजक, निवृत्त अधिकारी मोठ्या प्रमाणात सामील झालेले दिसतात. नुसती गर्दी वाढून उपयोग नाही, वैष्णवांच्या या आनंदयात्रेकडून सामाजिक समता, सर्वसमावेशकता आणि सहिष्णुता खोलवर रुजण्याचे काम घडले, तर विश्वबंधुत्वाचा संदेश देणाऱ्या वारीचे ते एक महत्त्वाचे पाऊल ठरेल.

**(सर्व छायाचित्रे : संदेश भंडारे)**
**संपर्क: ०९४२२३०९९२३**



छाया : शिरीष शेटे

# ।। पालखी सोहळ्याचे व्यवस्थापन ।।

**ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस! या शब्दात वारकरी या दोन संतांना वेगळे स्थान देतात. आळंदीहून निघणारा संत ज्ञानेश्वर माउलींचा पालखी सोहळा आणि देहूहून निघणारा जगद्गुरू तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा हे दोन प्रमुख सोहळे मानले जातात. ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्यात सुमारे तीन लाख वारकरी असतात. तर तुकाराम महाराजांच्या पालखीसोबत दीड लाखाच्या वर वारकरी असतात. इतर संतांच्या पालख्यांसोबत किमान १५ हजार ते एक लाखापर्यंत वारकरी सहभागी असतात. या पालखी सोहळ्याचे नियोजन म्हणजे इव्हेंट मॅनेजमेंटचा एक उत्तम नमुनाच आहे. एकेका गावाची लोकसंख्याही नाही एवढे मोठे एक गाव दररोज वसतं आणि दररोज वाटचाल करतं.**

**बाळासाहेब बोचरे**

पंढरपूरची आषाढी वारी लाखोंच्या संख्येने भरते. लाखोंचा जनसमुदाय एकत्र येतो पण कुठेही गडबड नाही की, कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न नाही. याचे एकच कारण म्हणजे वारकऱ्यांमध्ये असलेली शिस्त आणि नम्रता. एकमेकाला देय मानून एकमेकांच्या पाया पडणारा वारकरी हा वारकऱ्यामध्ये कधीच गरीब-श्रीमंत, उच्च-नीच, जात-पात, धर्म असा भेदभाव करत नाही. 'एक गाऊ विठू तुझे नावा आणिकाचे काम नाही.' एवढंच वारकऱ्यांना माहीत असते. आषाढी वारीसाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून विविध संत-सज्जनांचे पालखी सोहळे पंढरपूरला येतात. त्यांच्या समवेत आलेली लाखो वारकऱ्यांची मांदियाळी म्हणजेच पंढरीतला आषाढीचा महासोहळा.

सर्वात मोठा सोहळा असलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे नियोजन कार्तिकी एकादशीला दिंडीकऱ्यांसमवेत आळंदीत केले जाते. तेव्हापासून दिंडीकरी व सोहळा व्यवस्थापन कामाला लागते. रथाचे बैल निवडले जातात, शिवाय सेवेकरी, मानकरी, पूजारी, कर्मचारी यांची निवड केली जाते. पालखी मार्गात

माऊलींसाठी सकाळची आरती, दुपारचा नैवेद्य आणि रात्रीची आरती व नैवैद्य याचे वेळापत्रक तयार असते. आळंदीतून निघाल्यापासून परत येईपर्यंत प्रत्येक मुक्काम आणि दुपारचे भोजन याचे मेनू ठरलेले असतात. त्या त्या ठिकाणी लागणारे स्वयंपाकाचे साहित्य याचे स्वतंत्र गाठोडे बांधले जाते. आणि ते गाठोडे त्याच मुक्कामाला सोडल जाते. शिल्लक मालमसालाही परत त्याच गाठोड्यात बांधला जातो.

### दिंड्यांचे व्यवस्थापन

वीणेकरी, टाळकरी, मृदुंगवादक, झेंडेकरी, तुळसधारी महिला आणि पाण्याचा हंडा घेतलेली महिला एवढ्यांचा समावेश असलेला समूह म्हणजे दिंडी. सर्वात पुढे झेंडेकरी, त्यामागे मध्यभागी वीणा व पखवाज वा मृदुंगवादक आणि बाजूने टाळकरी अशी रचना असते. या सर्व दिंड्यांची नोंद आळंदी संस्थानकडे आहे. त्यावर चोपदारांचे नियंत्रण असते. चोपदार दररोज दिंड्यांची हजेरी घेतात व त्याचे रेकॉर्ड नोंद करून ठेवतात. वरचेवर सोहळा वाढत असल्याने काही वर्षापूर्वी मोजदादीसाठी दिंड्यांना क्रमांक देण्यात आले आहेत. माऊलींच्या पालखी सोहळ्यात रथापुढे २७ दिंड्या असतात. सर्वांत पुढे २७ नंबरची भोई समाजाची दिंडी असते. त्यामागे दोन अश्व असतात आणि त्यानंतर २५,२५,२४ अशा उलट क्रमाने दिंड्या वाटचाल करत असतात. रथाच्या पुढे क्रमांक एकची दिंडी ही आळंदीकरांची दिंडी असते.


निर्गुणाचे भेटी, आलो सगुणा संगे ।
छाया : शिरीष शेटे

या दिंडीमध्ये सोहळा सुरू करणारे गुरू हैबतबाबांचे वंशज तसेच हैबतबाबा यांच्यासमवेत वारी करणारे वासकर, लिंबराज महाराज, आळंदीकर यांच्या वंशजांसह आळंदी देवस्थानचा समावेश असतो. कालांतराने या सोहळ्यात वाढ झाली आणि मग मागे एकेक दिंडी वाढू लागली. आज माउलींसोबत चारशे दिंड्या असून, आणखी वाढत आहेत. सलग पाच वर्षे हजेरी लागलेल्या दिंड्यांना तात्पुरते मागे चालण्यासाठी क्रमांक दिला जातो. सकाळी निघण्यापूर्वी पहिला कर्णा वाजला जातो. दिंड्या आपापल्या क्रमाने लगचे सज्ज होतात. निघण्यापूर्वी पाच मिनिटे आधी सज्जतेसाठी दुसरा कर्ण वाजला जातो. तिसरा कर्णा वाजला की, पालखी कोणासाठीच थांबत नाही हा इथल्या शिरस्ता असतो. रथापुढील दिंड्या पुढे, मागील दिंड्या मागे अशी रांग लागली की, मग ती तुटणे शक्यच नाही अशी ती शिस्त असते. सकाळी किती वाजता निघायचं हे अगोदरच्या सायंकाळच्या समाजआरती वेळीच चोपदारांनी घोषित केलेले असते. त्यानुसार पालखी निघते. सकाळची न्याहरी किती वाजता कोठे करायची, दुपारचा विसावा आणि भोजन कुठे आणि किती वेळ करायचे, दुपारनंतरचा विसावा कुठे आणि किती वेळ घ्यायचा हे ठरलेले असते. सायंकाळी पालखी तळावर पोहोचल्यावर मध्यभागी माउलींची पालखी ठेवून सर्व दिंडीकरी, वारकरी, गावकरी व भक्तगण सामूहिक आरती करतात. त्याच वेळी उद्या किती वाजता निघायचे हे चोपदार घोषित करतात. मग पादुका तंबूमध्ये दर्शनासाठी स्थानापन्न होतात. वारकरी आपापल्या तंबूत भोजन व विश्रांतीसाठी जातात. प्रत्येक दिंडीचे तबू व जेवणाची व्यवस्था स्वतंत्र असते. दिवसभर वा रात्री माउलींनी विश्रांती घेतल्याशिवाय आपण बसायचं नाही हा वारकऱ्यांचा शिरस्ता असतो. त्यामुळे भाविकांनी दर्शनासाठी पालखी थांबवणे किंवा एखाद्या व्हीआयपीनी दर्शनासाठी पालखी थांबवणे म्हणजे अख्ख्या सोहळ्याला थाबंवल्यासारखे असते.

### समाजआरती

संत ज्ञानेश्वर माउलींची पहाटेची पूजा आळंदी संस्थानच्यावतीने केली जाते. दुपारी मुख्य मानकरी श्रीमंत शितोळे सरकार यांचा नैवैद्य असतो. पालखी मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचल्यावर रात्रीची आरती ही सर्व दिंडीकरी, वारकरी समाजाला सोबत घेऊन केली जाते. म्हणून तिला समाजआरती म्हणतात. मध्यभागी पालखी स्थानापन्न केली जाते. त्याभोवती भाविक बसलेले असतात. त्यामागे दिंडीकऱ्यांनी गोल कडे केलेले असते. एकेक दिंडी उभी राहून हे कडे तयार होते. टाळमृदंगाचा जयघोष सुरू असतो. सर्व दिंड्या आल्याची खातरजमा झाल्यावर चोपदार आपल्याजवळचा चोप उंचावून सर्व दिंडीकऱ्यांना शांत राहण्याचे आवाहन करतो. लाखोंचा समुदाय एका चोपाच्या इशाऱ्यावर एकदम शांत होतो. अशा वेळी एखाद्या दिंडीकऱ्याने टाळ वाजवणे सुरूच ठेवले तर दिवसभराच्या वाटचालीत त्यांना कसला तरी त्रास झाला किंवा अडचण आल्याचे किंवा त्यांची काहीतरी तक्रार असल्याचे संकेत मानले जातात. चोपदार त्यांच्या जवळ जाऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेतात आणि अडचणीची सोडवणूक केली जाते. त्यानंतर उद्या किती वाजता निघायचे याची घोषणा होऊन आरती होते आणि सर्वजण विश्रांतीसाठी आपापल्या तंबूत जातात. मुक्कामाच्या

प्रत्येक ठिकाणी रात्री माउलींसमोर जागर आणि कीर्तन करण्याचा मान ठरावीक दिंड्यांना देण्यात आला आहे.

### तंबुंची रचना

पालखी येण्यापूर्वी तंबू ठोकणारी वाहने आणि कर्मचारी मंडळी तळावर जातात. सर्वात अगोदर माउलींचा तंबू उभारला जातो. त्याच्या डावीकडे कोण? उजवीकडे कोण? मागे कोण? पुढे कोण? अशा प्रकारे तळाचा नकाशा असतो. त्याप्रमाणे इतरांचे तंबू ठोकले जातात. पालखी आल्यावर गावातला माणूसही गावातच चुकतो पण वारीत आलेला चुकलेला माणूस, चोपदाराबरोबर त्या दिंडीत नेऊन सोडतात. या सोहळ्यातले बुजुर्ग वसंतनाना रंदवे चोपदार दोन वर्षांपूर्वी वारले. त्यांचे बंधू बाबूराव रंदवे चोपदाराचेही वय झाले आहे. या दोघांनीही या सोहळ्याची शिस्त जतन करण्यात मोलाची कामगिरी केली आहे. आज या दोघांचीही पुढची पिढी दिंडी नियंत्रणाची सेवा करते.

### रिंगण

पालखी सोहळ्यात अश्वांची रिंगणे ही आकर्षणाचा अन् चैतन्य फुलवणारा सोहळा असतो. वारकरी वाटचाल करत असतात. त्याबरोबर अश्वही वाटचाल करत असतात. या अश्वांना वारकरी माउली असेच मानतात. पळणे हा अश्वांचा स्थायिभाव असतो, त्यांना पळण्यासाठी कुठेतरी जागा करून द्यावी; हा त्यामागचा उद्देश असतो. देव आपल्यासोबत खेळतो म्हटल्यावर प्रत्येक वारकरी आपले वय विसरून खेळाचा आनंद घेतो. उभे रिंगणे हे वाटचाल करता करता, सोहळा थांबवला जातो. दिंडीकरी दोन रांगा करतात. मुखाने हरिनामाचा जयघोष आणि टाळमृदंगाचा गजर चालू असतो. मध्यभागी पालखी असते. सर्वात पुढे असलेले दोन्ही अश्व वारकऱ्यांच्या रांगेमधून उजवीकडून पालखीला प्रदक्षिणा घालून, रिंगण पूर्ण करतात. क्षणभराचा हा दोन अश्वांचा पाठशिवणीचा खेळ अवघा आसमंत देहभान विसरून अन् डोळ्यात प्राण आणून पाहतो. गोल रिंगणासाठी जमीन चांगली तयारी करावी लागते. या रिंगणाच्या स्थळी सर्वात मध्यभागी एक गोल रिंगण तयार केले जाते. त्यात मध्यभागी पालखी स्थानापन्न केली जाते. त्या रिंगणाबाहेर पालखीकडे पाठ करून प्रेक्षक बसलेले असतात. त्यानंतर अश्व दौडण्यासाठी गोलाकार धावपट्टी तयार केली जाते. धावपट्टीच्या दुसऱ्या बाजूला प्रेक्षकांना बसण्याची सोय केली जाते आणि त्यामागे दिंडीकऱ्यांनी गोलाकार कडे केलेल असते. पालखी विराजमान झाली की, आपोआप रिंगण तयारच होते. तयार झालेल्या धावपट्टीवर अश्वांना दौडण्यासाठी सोडून देण्यात येते. त्याची ही दौड अवघा आसमंत डोळ्यात प्राण आणून पाहतो. या रिंगणानंतर चोपदार प्रत्येक दिंडीला उडीच्या खेळाचे निमंत्रण देतात. सर्व दिंड्या मिळून पालखीला मध्यभागी ठेवून एक ताल एक सुरात ज्ञानोबा तुकारामाचा जयघोष करत, विविध खेळांचे प्रदर्शन घडवतात. ज्ञानोबा तुकारामाचा जयघोष तुकाराम तुकाराम असा टिपेला पोहोचतो आणि उडीचा खेळ समाप्त होतो.

### वारकऱ्यांची स्वयंशिस्त

वाटचाल करणारा वारकरी हा इकडेतिकडे पाहत नाही. कोणाला धक्काबुक्की करत नाही. धक्का लागला तर रागवत नाही. त्यामुळे या वारीत बंदोबस्ताला आलेल्या पोलिसांना कधीही काठी उगारायची वेळ येत नाही. या वारीला आता स्वच्छतेची वारी म्हणून स्वरूप येऊ लागले आहे. तीन लाखाचा समुदाय म्हटल्यावर घाण ही होणारच पण त्यामानाने वारकऱ्यांनी शिस्त लावून घेतल्याने, अस्वच्छतेवर नियंत्रण आले आहे. वाटचालीमध्ये काही अडचणी आल्या किंवा संप्रदायच्या विरोधात काही घटना घडल्या तर श्रीमंत शितोळे सरकार यांच्या तंबूसमोर ही बैठक होते. त्यामध्ये ठरलेले निर्णय समाज आदराने स्वीकारतो.

**वरिष्ठ उपसंपादक, दै. लोकमत, सोलापूर आवृत्ती. संपर्क: ०९९२२९२८१९२**



छाया : शिरीष शेटे

**खेळ मांडियेला वाळवंटी घाई, नाचती वैष्णव भाई रे ।**

# ॥ ज्ञानदेवें रचिला पाया ॥

**डॉ. यू. म. पठाण**

'ज्ञानदेवें रचिला पाया' या संत बहिणाबाईंच्या उक्तीचा महाराष्ट्रातल्या जनसामान्यांत, ज्ञानदेवांनी महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचा पाया रचला, ज्ञानदेवांपासूनच वारकरी संप्रदायाचा उद्‌गम झाला, असा रूढ अर्थ प्रचलित आहे. यात ऐतिहासिक वास्तव नाही. याचे कारण असे की, महाराष्ट्रात विठ्ठलोपासना ज्ञानदेवांच्या पूर्वीही–यादवपूर्वकाळातही–रूढ होती. तिचे संदर्भ चौथ्या–पाचव्या शतकापर्यंत आपल्याला इतिहासकाळात घेऊन जातात. शिलालेखांचे नि ताम्रपटांचे कोरीव लेणे आपल्याला 'पांडुरंग पल्ली' ला पांडुरंगाच्या गावी– तेराव्या शतकाच्या आधीही घेऊन जात नि त्या लेण्यातही विठ्ठलनामाचा गजर आपल्याला ऐकू येऊ लागतो. आठव्या शतकात शंकराचार्यांनी लिहिलेल्या 'पांडुरंगाष्टका' तही आपल्याला विठ्ठल नामाचा उदो उदो ऐकू येतो आणि हा 'कानडा विठ्ठलु' तत्पूर्वीही–इसवी सनाच्या चौथ्या–पाचव्या शतकात दक्षिणेतल्या द्रविड भक्तांच्या, अलवार संतांच्या, मनांत कसा ठाण मांडून बसला होता याच्याही पाऊलखुणा; आपल्याला दक्षिणेच्या मध्ययुगीन धर्मसाधनेचा इतिहास दाखवू लागतो. ही भक्तिगंगा उत्तरेऐवजी दक्षिणेकडून महाराष्ट्रात आली असावी, याबद्दल मग आपल्या मनात पुसटशी कल्पना उरत नाही. ज्ञानदेवपूर्वकाळातही विठ्ठलोपासना महाराष्ट्रात रूढ होती, असं जेव्हा इतिहासच आपल्याला सांगू लागतो, विठ्ठलाचा 'लान मडु' होता, त्याचा जीर्णोद्धार करण्याचे विविध प्रयत्न झाले, असं पंढरपूरच्या चौऱ्याऐंशीच्या शिळेपूर्वीच्याही शिळा आपल्याला सांगू लागतात, तेव्हा, कुठे आपले मन 'ज्ञानदेवें रचिला पाया' याचे अन्य अर्थ, अन्योन्यसंदर्भ शोधू लागते.



ज्ञानेश्वर माउली

ज्ञानदेवपूर्वकाळात जर वारकरी संप्रदाय महाराष्ट्रात अस्तित्वात होता तर, पुंडलिकाव्यतिरिक्त कुठल्याही अन्य भक्ताचे नि अन्य कोणत्याही वारकरी संताचे उल्लेख यादवपूर्वकाळात का बरं आढळत नाहीत; या विचाराने आपले मन अस्वस्थ होते. बरे, पुंडलिकाचा संदर्भ पाहावा तर तोही ऐतिहासिक नसून पौराणिक असल्याने, वारकरी संप्रदायाची यादवपूर्व परंपरा आपल्याला इतिहासात शोधता येत नाही. याचाच अर्थ असा की, ज्या अर्थी वारकरी परंपरा आपला इतिहास ज्ञानदेवांपासून सांगू लागते, त्या अर्थी, त्या परंपरेतील नि धर्मसाधनेच्या त्या क्षेत्रातील ज्ञानदेवांची प्रभावकक्षा फार लक्षणीय असली पाहिजे; अनन्यसाधारण असली पाहिजे.

## शिवोपासक ज्ञानदेव विठ्ठलोपासक कसे?

पण इथे आणखी एक अवघड समस्या उभी ठाकते. ही समस्या आहे ज्ञानदेवांच्या गुरुपरंपरेची. आदिनाथ–मत्स्येंद्रनाथ–गहिनीनाथ–निवृत्तिनाथ. या परंपरेने ज्ञानदेव नामसंप्रदायी, शिवोपासक नि पर्यायाने शैव ठरतात. यादवकाळात शैव–वैष्णवांतून उभ्या–आडव्या गंधाचा विस्तवदेखील जात नसे, असे हा काळच आपल्याला सांगतो. मग शिवोपासक ज्ञानदेव विठ्ठलोपासक कसे, हा विचार या समस्येत आणखी एक गुंता निर्माण करतो.

ज्ञानदेवपूर्व आणि ज्ञानदेवकालीन धर्मसाधनेची विविध क्षेत्रे पाहिली तर त्यातही हा गुंता वाढलेला. शाक्त, पाशुपत, तांत्रिक, मांत्रिक, नाथ, महानुभाव, ज्ञानमार्गी, कर्ममार्गी,भक्तिमार्गी, बौद्ध नि जैन मतानुयायी, द्वैती–अद्वैती, षड्दर्शनातल्या एकेक दर्शनाचे अभिमानी व पुरस्कर्ते, जपी–तपी–व्रती–तीर्थोपाध्ये, अनेक देवतोपासक यांच्या गोतावळ्यात धर्मसाधनेची जटिलता उत्तरोत्तर अधिक जटील झाली असावी; याचा प्रत्यय यादवपूर्व नि यादवकालीन साहित्यातूनही आपल्याला येतो. अशा स्थितीत जनसामान्यांची, लोकमानसाची काय अवस्था झाली असेल, याची आपण कल्पना करू शकतो. ही कल्पनाही आपल्या मनाचा थरकाप उडवून देते. ईश्वर, जीव, प्रपंच, विश्व, धर्मसाधना, जीवनाचे अंतिम उद्दिष्ट याविषयीच्या सर्व कल्पनांभोवतीच अनेक चक्रव्यूह निर्माण झालेले असल्याने; त्या एकेक चक्रातून जनसामान्यांना सोडवणे आवश्यक होते. धर्मविषयक तत्त्वज्ञान सुलभ करून, ते जनसामान्यांच्या आकलन कक्षेत आणणे तर आवश्यक होतेच पण त्याचबरोबर ते पारलौकिक तत्त्वज्ञान ज्या लौकिक जीवनात प्रकटणार होते; त्या जनसामान्यांच्या आचारधर्मातही सुलभता आणणे आवश्यक होते. ज्ञानदेवांसमोरची

**समाजातल्या सर्व थरांतल्या लोकांना वारकरी संप्रदायाच्या छत्राखाली आणण्याचे श्रेय नि:संशय ज्ञानदेवांकडेच जाते. चातुर्वर्ण्य व्यवस्थेने विदीर्ण केलेली ही सारी शकलं त्यांनी आपल्या समन्वयशील विचारसरणीनं अशा काही कौशल्यानं जोडली की, महाराष्ट्राच्या समाजजीवनाच्या आरशाला कधी तडा गेला होता याची पुसटशी जाणीवही होऊ नये. 'विठ्ठलाला घेऊन स्वत:चा पारमार्थिक उद्धार करून घेणे हा प्रत्येकाचा जन्मसिद्ध अधिकारच आहे.,' या विचाराने ज्ञानदेवांनी समाजाच्या साऱ्या थरांतील लोकांच्या मनात अस्मितेचा आत्मज्ञानदीप प्रज्वलित केला.**



ही दोन्ही आव्हाने शिवधनुष्यासारखी अवघड, अवजड, न पेलवण्याजोगी होती. आणि म्हणूनच वारकरी संप्रदाय ज्ञानदेवपूर्वकाळात अस्तित्वात असला तरी, ही आव्हाने पेलून या संप्रदायात नवचैतन्य ओतणारा कुणी वारकरी संत; आपल्याला शोधूनही गवसत नाही, आढळत नाही. ज्ञानदेवांनी ती आव्हाने लीलया पेलली. वारकरी संप्रदायाचा उद्‌गम नि ज्ञानदेव यांचे अतूट नाते जोडले जाते ते यामुळेच. धर्मविषयक तत्त्वज्ञान नि आचारधर्म यांच्यातील जटिलता काढून टाकून, ज्ञानदेव त्यांचे सुलभीकरण करतात. त्यात आपल्या हरिहरैक्यासारख्या समन्वयवादी विचारसरणीची संजीवनी ओततात ती कशासाठी? त्यांची लोकाभिमुख वृत्ती जनमानसाशी असलेली त्यांच्या मनाची जवळीक व बांधिलकी, जनसामान्यांच्या उद्धारार्थ कळवळणारी त्यांच्या मनातील सांप्रदायिक नेतृत्वाची उर्मी यातून प्रकटल्याशिवाय राहत नाही. मग ज्ञानदेवांच्या रूपाने महाराष्ट्राला एक नवे सांस्कृतिक नेतृत्व लाभू लागते.

### ज्ञानदेव : एक कुशल संघटक

ज्ञानदेवांच्या व्यक्तिमत्त्वात जसे संतत्व आहे, कवित्व आहे, तत्त्वचिंतकत्व आहे, तसंच कुशल संघटकत्वही आहे; याचा प्रत्यय मग आपल्याला येऊ लागतो. दैवतवादाचा अभिनिवेश, साधनामार्गाचा अभिनिवेश, पंथाभिनिवेश यांच्याच जोडीला वर्णाभिनिवेशही या विविध अभिनिवेशांच्या पंक्तीला येऊन बसल्याचं जेव्हा ज्ञानदेव पाहतात; तेव्हा हा समाज विविध कडांनी व कड्यांनी कोसळत-ढासळत चालल्याचे हृदयद्रावक, हृदयभेदक दृश्य त्यांना दिसू लागते. हे सारे कडे, या साऱ्या कडा समन्वयवादाचे, बंधुत्वाचे, समभावाचे भक्कम आधार देऊन, पुन्हा टिकवून धरणं अत्यंत आवश्यक होते. एकीकडून कर्मसिद्धान्ताचे प्रहार त्यावर होत होते नि दुसरीकडून चातुर्वण्य व्यवस्थेच्या दुष्परिणामांचे. समाजातली दुभंगणारी ही मने सांधण्याची विलक्षण क्षमता ज्ञानदेवांच्या संतत्वात होती, नेतृत्वात होती, संघटना चातुर्यात होती. ज्ञानदेव विशिष्ट तत्त्वज्ञानाचा, आचारधर्माचा, साधनामार्गाचाच अवलंब का करतात, याचे रहस्य उलगडण्याचा प्रयत्न आपले मन जसजसे करू लागते; तसतशी ज्ञानदेवांच्या व्यक्तिमत्त्वाची कितीतरी अज्ञात दालने आपल्यासमोर प्रकट होऊ लागतात. ज्ञानदेवांचे संप्रदाय-संघटकत्व, त्यांचे सांप्रदायिक नेतृत्व हेही एक असेच अलक्षित, फारशी दखल न घेतलेले पण लक्षणीय दालन आहे. वारकरी संप्रदाय 'ग्यानबा तुकारामां'चाच घोष का करतात, याचे कोडेही यातूनच उलगडू लागते. या कुशल संप्रदाय-संघटकांतही ज्ञानदेवांचे नावच जेव्हा आद्यस्थानी येते, त्या वेळी नामदेवांचीही आठवण झाल्याविना राहत नाही. ज्ञानदेव-नामदेव या संतद्वयाने मिळूनच वारकरी संप्रदायाची पुन्हा उभारणी केली, वारकरी संप्रदायात नवचैतन्य ओतले. ज्ञानदेव-नामदेवांची युती झाली म्हणूनच वारकरी संप्रदाय यादवपूर्वकाळातील सावट भिरकावून देऊन नवसामर्थ्याने, नव्या जोमाने, 'बाहो उभारून' जनसामान्यांना विठ्ठलभक्तीची 'गवांदी' देऊ लागला. ज्ञानदेवांचे हे नेतृत्व नामदेवांनीही स्वीकारले असावे, असे वाटते. ज्ञानदेवांनी समाजातल्या सर्व स्तरातल्या लोकांसाठी भक्तीची वाट मोकळी केल्यानेच कुंभार, सोनार, न्हावी, माळी, महार, वाणी, तेली या साऱ्याच जातिजमातींतल्या लोकांना ज्ञानदेव आपलेसे वाटले. समाजातल्या सर्व थरांतल्या लोकांना वारकरी संप्रदायाच्या छत्राखाली आणण्याचे श्रेय नि:संशय ज्ञानदेवांकडेच जाते.

चातुर्वण्यव्यवस्थेने विदीर्ण केलेली ही सारी शकले त्यांनी आपल्या समन्वयशील विचारसरणीने अशा काही कौशल्याने जोडली की, महाराष्ट्राच्या समाजजीवनाच्या आरशाला कधी तडा गेला होता, याची पुसटशी जाणीवही होऊ नये. विठ्ठल नाम घेऊन स्वत:चा पारमार्थिक उद्धार करून घेणे, हा प्रत्येकाचा जन्मसिद्ध अधिकारच आहे; या विचाराने ज्ञानदेवांनी समाजाच्या साऱ्या लोकांच्या मनात अस्मितेचा आत्मज्ञानदीप प्रज्वलित केला. दुभंगलेले लोकमानस सांधण्याचे कुशल संघटकत्व ज्ञानदेवांच्या व्यक्तिमत्त्वात कसे दडले होते, याचा प्रत्ययही यावरून येतो.

'सर्वांभूतीं भगवद्भावा' च्या विचारसरणीचा पुरस्कार करून कैवलाद्वैवमताच्या स्वीकारामागं नि चिद्विलासासिद्धान्ताच्या पुरस्कारामागंही त्यांच्या पारलौकिक उद्दिष्टाची पूर्ती जशी आपल्याला दिसते तशी (पर्यायाने) लौकिक उद्दिष्टाची पूर्ती झाल्याचेही आढळते.

### लोकमानसाला गवसणी घालण्याचं सामर्थ्य

सुगम तत्त्वज्ञान, सुगम आचारधर्म, सुगम भक्तिकल्पना, सुगम साधना यांच्या स्वीकारामागंही ज्ञानदेवांचे संघटकत्व कुठेतरी दडून बसले आहे, या संप्रदाय-संघटकत्वाची प्रेरणा जटिलतेतून सुलभतेच्या, सुगमतेच्या प्रवासामागे निश्चितपणे असावी. त्यांचे समाजाच्या मानसशास्त्राचे आकलनही यातून प्रकट होते. लोकमानसाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य ज्ञानदेवांच्या सुगमतेच्या, समन्वयाच्या विचारसरणीत होते.

**(उर्वरित भाग पृष्ठ ४७)**

# ॥ तुका झालासे कळस ॥

**तुकोबांच्या परीसस्पर्शाने वारकरी संप्रदायाचे सामाजिक नि सांस्कृतिक संदर्भ जसे उजळून निघाले तसेच वाङ्‌मयीन संदर्भही उजळून निघाले. तुकोबांच्या अनुभवसंपन्न व्यक्तिमत्त्वामुळे वारकरी संप्रदायाच्या अभंग वाङ्‌मयात व पर्यायानं मराठी वाङ्‌मयात मोलाची भर पडली. 'अभंगवाणी' ही खरी तर 'तुक्याचीच' अशी नाममुद्रा मराठी अभंगावर उमटली. ज्ञानदेवांच्या ज्ञानदेवीने, पसायदानाने विश्वसाहित्यावर जसा आपला आगळावेगळा ठसा उमटवला. त्याचप्रमाणे तुक्याच्या या अभंगवाणीनेही विश्वसाहित्यावर आपला अमिट ठसा उमटवला. तुकोबांच्या 'अ-भंग' नि अमर, शाश्वत व्यक्तिमत्त्वामुळे त्यांचा अभंगही खऱ्या अर्थाने शतकानुशतके अभंगच राहिला.**

अनेक प्रकारच्या विरोधांशी सामना करत तुकोबांनी वारकरी संप्रदायाच्या समतावादी व बंधुत्ववादी विचाराचा, अत्यंत निर्भीडपणे पुरस्कार केला. मानवतावादी विचारसरणीचा पुरस्कार करताना तुकोबांच्या वाणीला जी धार चढते ती, बरे देवा कुणबी केलो, नातरि दंभ असतो मेलो! या उद्‌गारांतून समर्थपणे व्यक्त होते. आपला संप्रदाय हा दऱ्या निर्माण करणारा नाही तर त्या बुजवणारा आहे, समन्वयवादी आहे, हे तुकोबांनी आपल्या वाणीच्या व लेखणीच्या साहाय्याने अत्यंत कळकळीने सांगितले.

आजपर्यंतची वारकरी संप्रदायाची वाटचाल पाहिल्यावर मन काहिसे विस्मित, काहीसे दिङ्‌मूढ होते. अनेक शतकांचा प्रदीर्घ प्रवास करूनही, हा संप्रदाय थकला-भागला नाही, सुरकुतला-कोमेजला नाही. उलट जसजशी शतकांमागून शतके येत गेली, तसतसा हा संप्रदाय उत्तरोत्तर उजळ-उजळच होत गेला, त्यात नवचैतन्यच येत गेले. झाकोळण्याऐवजी तेजाळण्याकडेच त्यांची वृत्ती-प्रवृत्ती होत गेली. हे काही सहजासहजी घडले नाही, हे महाराष्ट्रातल्या काही अन्य संप्रदायांची वाटचाल पाहिल्यावर जाणवल्यावाचून राहत नाही.

असे का बरे घडले असावे, याचा जसजसा आपण विचार करू लागतो, तसतशी काही अलौकिक व्यक्तिमत्त्वे नवे विभूतिमत्त्वे



समचरणदृष्टि विटेवरी साजिरी । तेथें माझी हरी वृत्ति राहो

चित्र : गजानन शेपाळ

आपल्या दृष्टीसमोर येऊ लागतात. त्यात अगदी सुरुवातीला येतात ते ज्ञानदेव-नामदेव. त्यांच्या पूर्वीही वारकरी संप्रदाय होताच, पण ज्ञानदेव-नामदेवांनी त्याला संजीवनी दिली. या संजीवनीमुळे वारकरी संप्रदायाची वेल पुन्हा तरारून उठली. ती अधिक टवटवीत झाली. तिला जी सुंदर फुले आली. त्यांची तुलना तर खपुष्प असलेच तर त्याच्याशीही करता येणार नाही.

### नवे आव्हान

जसजसा काळ पालटत होता, तसतशी या संप्रदायासमोर नवनवीन आव्हानही उभी राहत होती, पण या संप्रदायाचे सुदैव असे की, ही आव्हाने पेलणारे नेतृत्वही या संप्रदायात उत्तरोत्तर निर्माण होत होते. ज्ञानदेव-नामदेवांच्या काळात जी आव्हाने होती. त्यापेक्षा एकनाथ काळातली म्हणजे बहामनी काळातली आव्हाने आणखी वेगळी होती.

पूर्वीच्या आव्हानांबरोबरच काही नवीन आव्हानांचीही त्यात भर पडली होती.

यादवकालीन आव्हानांना कसे सामोरे जायचे, याचा वस्तुपाठ ज्ञानदेव नामदेवांनी दिला होताच पण तरीही त्यांचे काही पदर बहामनी काळालाही स्पर्श करत होते. त्यांचा विचार करून, आणि त्याशिवाय परिस्थितीनुरूप जी नवीन आव्हाने येत होती; त्यांना एकनाथ समर्थपणे सामोरे गेले.

या आव्हानांचे काही पदर शिवकालापर्यंतही येऊन पोहोचले होते. त्यांना सामोरे कसे जायचे याचे दोन मार्ग दोन शिवकालीन संतांनी दाखवले, एक मार्ग तुकोबांनी दाखवला नि दुसरा समर्थांनी. या दोन्ही संतांचे पारमार्थिक उद्दिष्ट एकच असले तरी त्यांनी त्या उद्दिष्टांकडे जाण्याच्या ज्या वाटा चोखाळल्या; जी माध्यमे स्वीकारली नि जो सांप्रदायिक दृष्टिकोन स्वीकारला, त्यात वेगळेपण होते.

### कळसाचे स्थान

'तुका झालासे कळस' ही बहिणाबाईंची उक्ती आपल्याला या संदर्भात बरेच काही सांगून जाते. तुकोबांनी वारकरी संप्रदायासाठी असे कोणते लक्षणीय कार्य केले की, ज्यामुळे त्यांना कळसाचे स्थान प्राप्त झाले? याचं उत्तर एका वाक्यात, एका मुद्द्याच्या अनुषंगाने वा एकपदरी असे देता येणार नाही. कारण तुकोबांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचे कार्य नि त्यांचे संतत्वच अनेक पदरी होते. एखाद्या देखण्या हिऱ्याला जसे अनेक लकाकणारे पैलू असावेत तसे. कोणकोणते होते हे पैलू?

### नामयाचा तुका

'नामयाचा तुका' ही वारकरी संप्रदायात प्रचलित असलेली उक्ती यापैकी एका महत्त्वाच्या पैलूवर प्रकाश टाकते, ज्या समाजाच्या स्तरातून तुकोबा आले होते. वर्णावर्णांच्या नि जाती-जातींच्या भिंती वारकरी संप्रदायाने टिकू दिल्या नाहीत. वर्णवर्चस्वालाही या संप्रदायाने प्रखर विरोध केला. तुकोबांनी वारकरी संप्रदायाच्या या समतावादी व बंधुत्ववादी विचाराचा, अनेक प्रकारच्या विरोधांशी सामना करत, अत्यंत निर्भीडपणे पुरस्कार केला. यादवकाळात रुजलेल्या या मानवतावादी विचारसरणीचा पुरस्कार करताना तुकोबांच्या वाणीला जी धार चढते ती,

*बरे देवा कुणबी केलो*
*नातरि दंभ असतो मेलो !*

या उद्गारांतून समर्थपणे व्यक्त होत नाही का? आपला संप्रदाय हा दऱ्या निर्माण करणारा नाही तर त्या बुजवणारा आहे, समन्वयवादी आहे हे तुकोबांनी आपल्या वाणीच्या व लेखणीच्या साहाय्याने अत्यंत कळवळ्याने सांगितले. दलित, शोषितांची दु:खं नि व्यथाही त्यांनी जाणल्या. त्यामुळेच साधुत्वाची व्याख्या नि परिभाषाही त्यांनी आमूलाग्र बदलून टाकली. 'जे का रंजले-गांजले, त्यांसी म्हणे जो आपुले' या त्यांच्या उद्गारांतून ती उत्कटपणे व्यक्त झाली आहे! त्यांच्या दोन टाळकऱ्यांपैकी पहिले संताजी जगनाडे हेच तेली समाजाचे होते. यावरून तुकोबांची समाजातल्या विविध स्तरांतल्या लोकांकडे पाहण्याची भूमिका व दृष्टिकोन सहज स्पष्ट होईल. तुकोबांच्या काळात वारकरी संप्रदायाचा विस्तार एवढ्या मोठ्या प्रमाणात झाला, त्यामागे तुकोबांचे संप्रदाय संघटनकौशल्य जाणवल्यावाचून राहत नाही. लोकमानसाच्या कक्षा ज्ञानदेव-नामदेवांच्या काळापासून रुंदावण्यास ज्या प्रयत्नांना प्रारंभ झाला होता, त्यांची लक्षणीय परिणती तुकोबांच्या काळात झाली. लोकाभिमुखतेची शीग या संप्रदायाने तुकोबांच्या काळातच गाठली. वारकरी संप्रदायाच्या छत्राखाली जमले. ज्ञानदेव-नामदेवांनी यादवकाळात पाहिलेले स्वप्न अशा प्रकारे तुकोबांच्या कार्याच्या रूपाने शिवकालात साकार झाले.

### तुकोबांच्या प्रेरणा

पण यासाठी तुकोबांना किती सहन करावे लागले? समाजातल्या विविध थरांतल्या लोकांमध्ये स्वत:च्या अस्तित्वाचीच नव्हे तर अस्मितेची जाणीव निर्माण करून देण्यामागेही; तुकोबांच्या या प्रेरणा होत्या. जे इतरांना हीन मानून वर्णवर्चस्व प्रस्थापित करत होते. त्यांना आवर घालण्याची मानसिकता ही तुकोबांच्या फटकळ वाणीने नि विधायक मार्गदर्शनाने लोकमानसात निर्माण झाली.

### प्रबोधनासाठी कीर्तन

या प्रबोधनासाठी कीर्तनासारखे प्रसार माध्यम कसे उपयुक्त आहे. याचा वस्तुपाठ नामदेव नि एकनाथ यांच्यासारख्या संतांनी दिलाच होता. तुकोबांनी त्यातले सुप्त सामर्थ्य ओळखून, वारकरी संप्रदायाच्या प्रसारासाठी व विस्तारासाठी त्याचा उपयोग केला. तुकोबांची कीर्तने शिवकालात किती लोकप्रिय होती व त्यांचा जनमानसावर कसा विलक्षण प्रभाव होता, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. हा प्रभाव उत्तरोत्तर वाढत होता. म्हणून तर काही वर्णवर्चस्ववादी लोक तुकोबांना लक्ष्य मानून, त्यांचा विरोध करत होते. तुकोबांच्या या द्रष्ट्या भूमिकेमुळे शिवकालात वारकरी संप्रदाय प्रचंड वेगाने फोफावला, वाढला, विकसित झाला. या प्रचंड गंगोघात तुकोबांचे मूठभर विरोधक कुठल्या कुठे परागंदा झाले. जनमानसात निर्माण झालेली आत्मभानाची, आत्मसन्मानाची, अस्मितेची लाट ते थोपवू शकले नाहीत. एक समतावादी व विषमताविरोधी संप्रदाय म्हणून वारकरी संप्रदायाची प्रतिमा निर्माण करण्यात तुकोबांनी मिळवलेले यश दृष्ट लागण्याजोगे होते. त्यामुळे मध्ययुगीन महाराष्ट्रातील सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेलाही फार मोठी गती मिळाली.

### सामाजिक संदर्भाची जोड

वारकरी संप्रदायाच्या आध्यात्मिक उद्दिष्टपूर्तीला समकालीन व उत्तरकालीन सामाजिक संदर्भाची जोड लाभली. समाजातली दुभंगलेली मने जोडण्यात वारकरी संप्रदायाला तुकोबांचे समर्थ नेतृत्व कारणीभूत ठरले. 'ग्यानबा-तुकारामा'च्या उद्घोषाच्या रूपाने मराठी-खरे तर, 'मऱ्हाटी' माणसाने हे ऋण फेडले.

वारकरी संप्रदाय म्हटला की, ज्ञानदेव नि तुकोबा हे समीकरण आपल्याला आठवते, यातच सारे काही आले, असे मला वाटते.

### शब्द बांधू तुकोबांचे

सूर्यनारायण नितनेमानं उगवा
अंधाराच्या दारी थोडा उजेड पाठवा.
मोडक्या घराच्या बिंद्रावनाशी सांजेला
दिव्याचा आधार जडो त्यांच्या संसाराला
ओंजळीनं भरू देगा पाखरांच्या चोची
दु:खात पंखांना असो सावली मायेची.
आबादानी होवो शेत भरू दे दाण्यांचे
तुझ्या पालखीला शब्द बांधू तुकोबाचे

**- ना. धों. महानोर,**
(पानझड कविता संग्रहातून...)




**पालखी सोहळ्यात आकर्षक चित्ररथ व कलापथकाचे सादरीकरण पाहण्यासाठी वारकरी गर्दी करू लागले आहेत. वारकरी विसावला की, सुरू होते स्वच्छता दिंडीचे प्रबोधन. पायी चालून विसावलेल्या माउलींना या वेळी मनोरंजनातून प्रबोधनाचे काम केले जाते. दमलेल्या वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर स्मितहास्य आणते स्वच्छता दिंडी. म्हणूनच गेली १३ वर्षे अखंड सुरू असलेल्या स्वच्छता दिंडीला राज्याचे मुख्यमंत्री पंढरपुरात गेल्यावर आदराने सन्मानित करतात. समारोप कार्यक्रमाला दरवर्षी उपस्थित राहून आपुलकीने मुख्यमंत्री कलाकारांचे आभार मानतात. त्यांना प्रशस्तिपत्रक देऊन सन्मानितही करतात.**

# ।। स्वच्छतेची वारी ।।

**सचिन अडसूळ**

मराठी माणसांची प्रमुख ओळख काय असेल तर ती एक म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज आणि दुसरी म्हणजे 'पंढरीची वारी'. वारीची ही प्रथा फार जुनी साधारण ७००-८०० वर्षांची मानली जाते. बहुधा जगात हा एकमेव असा उपक्रम असावा. सातत्य, व्यापकता, स्वीकृती आणि त्यामागील भक्तिभाव अशा वैशिष्ट्यांनी समृद्ध असा हा महाराष्ट्राचा पालखी सोहळा जगभर चर्चेचा विषय असतो. लाखो वारकरी हाती टाळ. मुखी हरीनाम, विठु माउलीचा गजर करत पायी बेभान होऊन, मस्तकी माउली दर्शनाचा विचार घेऊन पुण्याहून पंढरपूरकडे निघतात. अशा या देदीप्यमान सोहळ्यात लोकांशी संवाद साधता येईल का? त्यांच्यापर्यंत साधुसंतांनी सांगितलेले ग्रामविकासातील संदेश पोहोचवता येतील का?

**(उर्वरित भाग पृष्ठ ३९)**

सदा माझे डोळा जडो तुझी मूर्ती
रखुमाईचा पती सोयरीया
गोड तुझे रूप, गोड तुझे नाम
देई मज प्रेम, सर्वकाळ..



नवरात्र महोत्सव २०१७ निमित्त श्री विठ्ठलास पारंपरिक अलंकारांनी व रुक्मिणी मातेस तुळजाभवानी देवी पोशाख व विविध पारंपरिक अलंकारांनी सजविण्यात आले होते.



मकर कुंडले तळपती श्रवणी । कंठी कौस्तुभमणी विराजित ।।



महालक्ष्मी देवी पोशाखातील रुक्मिणी मातेचे मनोहारी रूप




आवडे हे रूप गोजिरे सगुण । पाहता लोचन सुखावले ।।



कमलजा देवी पोशाखातील रुक्मिणी मातेचे मनोहारी रूप



पिवळा पितांबर वैजयंती । माया मुकुट शोभे किती ।।



फुलांच्या पोशाखातील रुक्मिणी मातेचे मनोहारी रूप

# सुंदर ते ध्यान उभे विटेवरी
# कर कटावरि ठेवूनिया



विजयादशमीला श्री विठ्ठलास सोन्याचे धोतर, घोंगडी, काठी आणि पारंपरिक अलंकारांनी तर रुक्मिणीमातेस विजया लक्ष्मीदेवी सोन्याच्या साडीने व अलंकारांनी सजविण्यात आले होते.

(पृष्ठ ३० वरून)
अशा विचारातून २००५ साली पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाची पहिली स्वच्छता दिंडी निघाली. आज त्याला १४ वर्ष झाली. 'पंढरीची वारी' हे वारकऱ्यांचे व्रत आहे. तसे महाराष्ट्रातील प्रत्येक गाव स्वच्छ सुंदर व्हावे हे शासनाच्या स्वच्छता दिंडीचे आता व्रत बनले आहे.

### प्रबोधनाचे माध्यम

सुरुवातीला स्वच्छता दिंडीला विरोध झाला पण स्वच्छतेच्या प्रबोधनाचे महत्त्व पटवून दिल्यानंतर त्याचा स्वीकार सर्व स्तरातून झाला आहे. वारीतील प्रत्येक क्षण हा वारकऱ्याला नवीन शिकवणारा, माहिती करून देणारा कसा ठरेल, यावर चिंतन करून वारीतील दिनक्रमाची रचना त्या वेळी केली गेली. त्यानुसार भजन, प्रवचन, कीर्तन या पारंपरिक प्रबोधन माध्यमांच्या जोडीला लोकांना भावतील आणि आकर्षित करतील अशा माध्यमांचाही उपयोग स्वच्छता दिंडीत केला गेला. वारीतील परंपरा आदर, भक्ती, श्रद्धा यांना बाधा न आणता कधी भारूड, कधी गोंधळ, कधी बतावणी, कधी स्वच्छतेची लावणी, मध्येच गाडगेबाबाचे कीर्तन तर कधी तुकडोजी महाराजांचे भजन... कधी ढोलकीवर थाप अन् कधी संबळाची साथ..! विठ्ठलाचे दर्शन व्हावे या ओढीने पंढरपूरकडे निघालेल्या वैष्णवांच्या मेळ्यात वारकऱ्यांना महाराष्ट्रातील पारंपरिक लोककलांचे दर्शन पाहायला मिळत आहे. त्यासाठी पारंपरिक संगीत साधनेही वापरली जातात. स्वच्छता दिंडीत पारंपरिक लोकभाषा व लोककलेचा वापर अप्रतिम केला जातोय. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या, वेगवेगळ्या विकासाच्या टप्प्यामध्ये वास्तव्यात असलेल्या लोकांना; अनेक प्रकारच्या प्रबोधनाची गरज असते.

### जनजागृती

स्वच्छता दिंडीतून फक्त स्वच्छता या विषयावर प्रबोधन केले जात नाही तर लोकांनी आरोग्यसंपन्न जीवन जगण्यासाठी व सामाजिक वातावरण सदृढ राहावे म्हणून व्यसनमुक्ती, स्त्री पुरुष समानता, शिक्षण, पर्यावरण, पंचायत राज, बेटी पढाओ बेटी बचाओ, वृक्षलागवड, पाणी अडवा पाणी जिरवा अशा अनेक विषयांवर जनजागृती केली जाते. स्वच्छता दिंडीत दोन्ही भागांवर मिळून २२५ ते २५० कलाकार व स्वच्छता सल्लागार सहभागी असतात. श्री संत ज्ञानेश्वर पालखी मार्गावर ८ चित्ररथ व श्रीसंत तुकाराम पालखी मार्गावर ८ चित्ररथ असतात. यातील कलाकार राज्यातील विविध ठिकाणावरून सहभागी होत असतात. स्वच्छता दिंडीची सुरुवात पुण्यातून होते तर समारोप पंढरपुरात होतो. कलापथक व चित्ररथ हे स्वच्छता दिंडीचे वैशिष्ट्य. दोन्ही पालखी मार्गावर कलापथक संच चित्ररथाच्या साहाय्याने पूर्ण सोहळ्यात प्रबोधनाचे काम करतात. भारतीय तत्त्वज्ञानात संगीताला ईश्वराचे दुसरे रूप मानले जाते. या संगीताच्या आधाराने विकसित झालेल्या लोककला लोकरंजनाच्या माध्यमातून, वारीत प्रबोधनाचे काम करतात. म्हणूनच प्रत्येक वाद्य ईश्वराचा साक्षात्कार घडवते. हे सगळे घडवून आणणारे स्वच्छता दिंडीतील कलाकार कितीतरी आधीपासून याची तयारी करतात. पालखी सोहळ्यात दरवर्षी या कलाकारांकडून नवनवीन सादरीकरण होत असते.

### स्वच्छता दिंडी

सामाजिक ऐक्याचे मूल्य जोपासून मूल्याधिष्ठित समाज घडवण्याचे व्यापक कार्य वारीत सहज होते. हजारो वर्षांपासून साधुसंतांनी सांगितलेल्या निरोगी समाज निर्मितीचा संदेश उराशी बाळगून, त्याला विज्ञानाची जोड देऊन, महाराष्ट्र शासनाची स्वच्छता दिंडी कार्य करत आहे. विशेष बाब म्हणजे पालखी सोहळ्याला भारतातील अतिमहत्त्वाच्या दहा राष्ट्रीय उत्सवात विशेष स्थान मिळाले आहे. अशा या देदीप्यमान सोहळ्यात वारकरी लाखो संख्येने उपस्थित असतात. त्याचबरोबर पालखीच्या दर्शनासाठी येणारे लाखो भाविकही असतात. अशा जनसमुदायाबरोबर संवाद साधण्याची, प्रबोधनाची संधी शासन स्वच्छता दिंडी सारख्या माध्यमातून अखंड करत आहे. स्वच्छता दिंडी उभी करण्यामागे हजारो हात आहेत. यातील कलाकार हे प्रमुख आहेतच. डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी यांनी खऱ्या अर्थाने स्वच्छता दिंडीला उंचीवर नेऊन ठेवले. अतिरिक्त मुख्य सचिव शामलाल गोयल स्वच्छता दिंडीला आधुनिक बनवण्यासाठी योगदान देत आहेत. सहभागी अधिकारी व जिल्हा कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष स्वच्छता दिंडीत सहभाग घेऊन स्वच्छता दिंडीची परंपरा यशस्वी ठेवण्यास सहकार्य केले आहे.

### आधुनिक स्वच्छता दिंडी

आता स्वच्छता दिंडीत आधुनिकता आली आहे. ही दिंडी ग्लोबल बनली आहे. कलापथक चित्ररथाबरोबर एल.ई.डी.स्क्रीनचा वापर, सोशल मीडियाचा वापर होत आहे. नावीन्यपूर्ण कार्यक्रमातून नवीन संदेशांची निर्मिती करून वारकऱ्यांना प्रबोधन केले जात आहे. विविध वाचन साहित्याचे वाटपही केले जात आहे. स्वच्छता दिंडीची फलनिष्पती पालखी सोहळा पुढे गेला की, त्या त्या गावात दिसत आहे. पूर्वी पालखी मार्गावरील गावात पालखी गेल्यानंतर अस्वच्छता व रोगराई पसरायची. आता पालखी गेली की, १२ तासात गाव स्वच्छ होतेय. वारकरी आता शौचालयांचा वापर करू लागलेत. जेवणाआधी हात साबणाने धूत आहेत. यापेक्षा मोठे साध्य ते काय? आता महाराष्ट्र हागणदारीमुक्त झाला. पुढे स्वच्छतेतील शाश्वततेसाठी, चांगल्या आरोग्यासाठी, भावी सुदृढ पिढीसाठी पालखी सोहळ्यात स्वच्छता दिंडीचे कार्य असेच सुरू राहणे आवश्यक आहे. स्वच्छता दिंडीचा पालखी सोहळ्यातील चौदा दिवसांचा चित्रमय अहवाल सोहळ्यातच शेवटी तयार केला जातो. दैनंदिन कार्यक्रम, आकर्षक छायाचित्रे, वारकऱ्यांच्या स्वच्छता दिंडीतील प्रतिक्रियांचा या अहवालात समावेश असतो. स्वच्छता दिंडी अहवालाचे प्रकाशन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पंढरपुरात होत असते. त्याचबरोबर स्वच्छता दिंडीची सात ते दहा मिनिटांची फिल्मही त्याच दिवशी प्रसिद्ध केली जाते.

**प्रसिद्धी प्रमुख, स्वच्छता दिंडी**


**पसायदान हे ज्ञानेश्वरीचे अमृतमधूर फळ आहे. मुळात ज्ञानेश्वरी हेच एक अमृताचे झाड आहे. त्याची मुळे, त्याचे खोड, त्याच्या फांद्या, त्याची फुले हे सर्व वैभव रम्य व मधूर आहे. या सर्व माधुर्याचे व ऐश्वर्याचे सुगंधी अत्तर पसायदानामध्ये उतरले आहे. आताच्या कळवळ्यापोटी गीतेच्या सातशे श्लोकांवर नऊ हजार ओव्यांची टीका लिहून, ज्ञानेश्वरांचा वाग्यज्ञ पूर्णतेला गेला. त्याप्रित्यर्थ त्यांनी यज्ञदेवतेजवळ साचिलेला प्रसाद म्हणजे हे पसायदान. एका अलौकिक विश्वमानवाला प्रतीत झालेले गीतेचे अंतरंग उलगडून दाखवण्यासाठी, मांडलेला विशाल वाग्प्रंपच आवरता घेताना; कृतकृत्य अंतःकरणाने त्यांनी हे पसायदान मागितले आहे. ही प्रार्थना यज्ञकर्ता व ऋत्विजाकरता नसून, ज्यांच्या कल्याणासाठी यज्ञाचे प्रयोजन, त्यांच्यासाठीच केली आहे. आपले यज्ञकर्तव्य आटोपून ज्ञानेश्वर जणू त्या उत्तरदायित्वातून आता मुक्त झाले. यज्ञविधी व यज्ञफल यांचे पुण्य त्यांनी आपल्या श्रोत्यांना अर्पण केले. विद्यावाचस्पती राम शेवाळकर यांचे पसायदानावरील हे भाष्य 'अमृताचा घनू' या पुस्तकातून संपादित स्वरूपात घेतले आहे.**

# ।। पसायदान : ज्ञानेश्वरीचे अमृतमधुर फळ ।।

**प्रा. राम शेवाळकर**

*आता विश्वात्मकें देवें ।*
*येणें वाग्यज्ञें तोषावें।*
*तोषोनि मज द्यावें ।*
*पसायदान हें ।।*

पसायदानाचे आराध्य ठरलेल्या व ज्ञानेश्वरांना अभिप्रेत अशा या देवाचे स्वरूप विश्वात्मक आहे. म्हणजे आत्मतत्त्व ओतप्रोत भरलेल्या




विश्वाकारामध्येच ज्ञानेश्वरांनी देवत्व कल्पिले आहे. एक प्रकारे सर्व स्थिरचरव्यापी भूतात्मवासी परमेश्वराला केलेली ही प्रार्थना आहे. सूक्ष्म दृष्टीने पाहिले तर सर्व प्राणिमात्रांच्या हृदयस्थ परमात्मातत्त्वाकडे ही याचना केली आहे. म्हणजे खऱ्या अर्थाने ज्यांच्यासाठी गीतार्थाचा प्रपंच, त्यांच्यासाठीचे व त्यांच्याकडेच हे पसायदान मागितले आहे.

पसायदानातील ज्ञानेश्वरांची पहिली मागणी आहे,

*'जे खळांची व्यंकटी सांडो'।*

जगामध्ये दुष्टांमधील दुष्टावा तेवढा नाहीसा होवो. त्याची खलत्वाची नांगी गळून पडो. खलांना मानवजातीचे वैरी बनवणारी ही व्यंकटी तेवढी नष्ट झाली, हा वाकडेपणा संपला की; त्यांचाही स्वभाव, वर्तन सरळ व ऋजू होईल. त्यासाठी दुष्ट जातीचा विनाश करण्याची गरज नाही. ज्ञानेश्वर जाणून होते की, एखाद्या महान अपराधाखातर एखादा दुष्ट नष्ट करता येतो, पण त्यातून दुष्टपणा नष्ट झाल्याबद्दल इतिहासाची ग्वाही नाही.

माणसाच्या मूलभूत माणूसपणावर ज्ञानेश्वरांनी हा केवढा प्रगाढ विश्वास प्रकट केला आहे. माणूस मूलतः वाईट नसतो. तो परिस्थितीमुळे व कारणामुळे वाईट झालेला असतो. ही कारणे नाहीशी झाली की, माणसाला वाईटपणा चिकटून राहण्याचे कारण नाही. दुष्टत्वाची हिंसक नखे काढून घेतल्यावर, उरलेला निखळ माणूस ज्ञानेश्वर स्वीकार्य मानतात; कारण त्यामुळेच त्या माणसाचे देवामध्ये रूपांतर होण्याची प्रक्रिया शक्य होते.

एकदा खळांची व्यंकटी नष्ट झाली, तर त्याने पुढे काय करावे? आतापर्यंत दुराचरणामध्ये तो व्यग्र असल्यामुळे त्याला आयुष्याची चिंता करण्याची सवड नव्हती. आता तो ती पोकळी कशी भरून काढणार? ज्ञानेश्वर लगेच त्याच्या शुद्धीकरणाची प्रक्रिया स्पष्ट करण्यासाठी मार्ग सुचवतात–

*तया सत्कर्मी रती वाढो ।*

दुष्टावा गळून पडलेल्या माणसाची सत्कर्माबद्दलची आवड वाढीस लागो. ही सत्कर्माबद्दलची रुची, आपोआपच दुष्कर्माबद्दलची अरुची वाढविण्यास पूरक ठरते. चमचाभर साखरेने पेलाभर पाण्याची चव बदलते. कोणत्याही विधायक प्रवृत्तीची एखादी छटाही केवढ्याही विघातक प्रवृत्तीचा प्रभाव कमी करण्यास पुरेशी ठरते. अवघ्या जगाला भयप्रद वाटणाऱ्या विक्राळ अंधाराला, मातीच्या पणतीतील इवलीशी ज्योतही धिटाईने तोंड देते. ती कांतिमान ज्योत स्त्रीलिंगी आणि एकाकी असूनही, तिला त्या आसुरी अंधाराची भीती वाटत नाही, याउलट अंधारालाच तिची भीती वाटू लागते. सत्कर्माची एक ठिणगी केवढ्याही मोठ्या तृणपर्वताची अल्पावकाशात राख करून टाकते. प्रकाशाच्या प्रत्येक उजळत्या पदन्यासाबरोबर राक्षसी काळोख भीतीने

पळ काढू लागतो.

दुष्टप्रवृत्तीचा विनाश करण्यासाठी सत्प्रवृत्तीला मुद्दाम काही प्रयत्न करावे लागत नाहीत. हातात शस्त्र धारण करावे लागत नाही. युद्ध पुकारावे लागत नाही. धमक्यासुद्धा द्याव्या लागत नाहीत. सत्प्रवृत्तीचे प्रकट होणे आणि दुष्प्रवृत्ती नष्ट होणे या एकसमयावच्छदेकरून आपोआप होणाऱ्या दोन क्रिया आहेत. सूर्याचा उदय म्हणजेच अंधाराचा लोप. ही सत्कर्माबद्दलची रती वाढावी, असे ज्ञानेश्वर म्हणतात. उत्पन्न व्हावी किंवा रुजावी, असे म्हणत नाहीत. कारण प्रत्येकामध्ये मूलतः ती असतेच, असा ज्ञानेश्वरांचा विश्वास आहे. एखादा रावण त्रैलाक्याकरिता वाईट असला, तरी त्याच्या कुटुंबीयांकरिता निखळपणे चांगलाच असतो. म्हणूनच मुळात ही रती वाढावी, अशी कामना ज्ञानेश्वर व्यक्त करतात.


विश्वाचे आर्त माझे मनी प्रकाशले ।

त्यानंतरची ज्ञानेश्वरांनी व्यक्त केलेली तिसरी कामना आहे –

*'भूतां परस्परें जडो । मैत्र जीवाचें'*

सर्व जीवजातींना परस्पराबद्दल सौहार्द उत्पन्न होवो. ज्ञानेश्वरांनी या ठिकाणी 'मैत्र' हा शब्द वापरला आहे. तेही जीवाचे मैत्र, म्हणजे परस्परांवर स्वतःच्या प्राणांइतके प्रेम करणारी जिवलग मैत्री ज्ञानेश्वरांना अभिप्रेत आहे. सर्व प्राणिमात्र परस्परांवर असे व इतके प्रेम करू शकतील काय? मग त्यांच्या जन्मजात हाडवैराचे काय होणार? माणसात परस्परांबद्दल दुजाभाव, द्वेष, मत्सर, वैरभाव असतो. जातीच्या, धर्माच्या, देशाच्या, भाषेच्या, पंथाच्या (व आता पक्षोपपक्षांच्या– इतकेच नव्हे, तर पक्षांतर्गत गटोपगटांच्या) नावाने माणसे परस्परांशी शत्रुत्व करतात, नि या शत्रुत्वाचा निकाल दोघांपैकी एकाला समूळपणाने संपविण्यानेच लागेल, असा पिढिजात विश्वास बाळगतात. त्यानुसार अखंड एकमेकांना पाण्यात पाहत राहतात. एकाच घराण्यातल्या, एकाच वंशातल्या व एकाच आईच्या कुशीत जन्मलेल्या भावंडामध्येही अशी पराकोटीची वैरे आढळतात, मग इतरांबद्दल काय बोलावे? अशा वातावरणात परस्परांवर जिवापलीकडचे प्रेम करण्याची ज्ञानेश्वरांची कल्पना निखालस स्वप्नाळूपणाची ठरणार नाही काय? नाही. कारण– सर्व प्राणिमात्रांची व्यंकटी सांडल्यावर व सर्वांची सत्कर्माबद्दलची रती वाढल्यावर एकमेकांबद्दल दुजाभाव कसा धजावू शकेल? सर्वांभूती प्रेम उत्पन्न होणाऱ्या आवाक्याबाहेरच्या अशक्यप्राय स्वप्नांची यथार्थता पटण्यासाठी, ज्ञानेश्वरांच्या या पूर्वअटी लक्षात घेणे निकडीचे आहे.

*दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो ।*

दुरित म्हणजे पाप. जगातून पापाचा अंधार नाहीसा होऊन प्रत्येकाला स्वधर्माचा सूर्यप्रकाश अनुभवता यावा, ही सदिच्छा समजावून घेणे तितकेसे अवघड नाही. फक्त ज्ञानेश्वर दुरित कशाला म्हणतात, तेवढे उकलून घ्यावे लागले. पहिल्या ओळीत दुरिताला तिमिर म्हटल्यानंतर लगेच दुसऱ्या ओळीत त्यांनी स्वधर्माला सूर्य संबोधले आहे. त्यावरून दुरित शब्दाने त्यांना परधर्म अभिप्रेत असावा, असा सहज निष्कर्ष निघतो. सामान्यपणे 'धर्म' या शब्दाचा अर्थ संप्रदायपर असा संकुचित लावला जातो. पण येथे ज्ञानेश्वर एका विशिष्ट, मर्यादित सांप्रदायिकांबद्दल सदिच्छा व्यक्त करत नसून, सर्व भूतमात्रांबद्दल करत आहे. सर्व जीवजातींचा स्वधर्म कोणता असू शकेल? तर जो त्याला जन्मतःच प्राप्त होत असतो.

सुरक्षिततेच्या काळजीने व आत्महिताला बाधा आणणाऱ्या भयाच्या भावनेने एक जीव दुसऱ्या जिवाबद्दल संशय व अविश्वास बाळगतो. त्यातून त्याला स्वधर्माचा विसर पडतो व दुरिताच्या परधर्मतमाने सर्व जीव अंधारून येते. यासाठी प्रत्येकाला स्वधर्माचे भान येणे अगत्याचे आहे. याशिवाय हातून घडणाऱ्या पापांच्या व्याप्तीला आळा बसणार नाही. समाज सज्जनांचा निष्कारण दुःस्वास करतो. त्यांचा सूडबुद्धीने छळ करतो. त्यांची सत्त्वपरीक्षा घेतो. त्याची प्रतिक्रिया उद्वेगात, संतापात व प्रतिशोधात होणे संतांकडून अभिप्रेत नाही.

*जो जें वांछिल तो तें लाहो । प्राणिजात ।।*

जन्माला आलेल्या सर्व जिवांच्या सर्व इच्छा पूर्ण होणे कधीतरी शक्य आहे काय? आपल्या प्रत्येकाच्या इच्छा परस्परांना बाधक असतात. उदा. राष्ट्रपती होण्याची प्रत्येकाची इच्छा एकाच वेळी पूर्ण होणे कसे शक्य आहे? म्हणून जगात यशवंत लोक अल्पसंख्य असतात व अपयशी लोकांची गर्दी असते. एकाच्या आनंदासाठी दुसऱ्या कोणाला तरी दुःखी व्हावे लागणे, हा या जगातील निघृण पण सर्वसंमत न्याय आहे. पुष्कळदा दुसऱ्यांचे दुःख हेच काही लोकांच्या आनंदाचे कारण असल्याचेही दृष्टोत्पत्तीस येते. सुखदुःखाच्या आपल्या कल्पनाही दुष्ट असतात, आपल्यापुरत्याच असतात. आमची सुखे इतरांच्या दुःखावरून मापली जातात. आमची दुःखे इतरांच्या सुखांवर आधारलेली असतात. परदुःख शीतल वाटणे स्वाभाविक मानले, तरी ते सुखद वाटणे निर्दयपणाचे आहे; पण दुर्दैवाने ते नित्यपरिचयाचे आहे. तसेच दुसऱ्याचे सुख न पाहवणे हेच बहुतेकांच्या दुःखाचे मूळ असते.

इथपर्यंतच्या प्रार्थनेत ज्ञानेश्वरांनी समाजातील खलप्रवृत्ती नष्ट व्हावी, विधायक सत्प्रवृत्ती पुष्ट व्हावी, प्रत्येकाला स्वधर्माचे भान यावे, या सदिच्छांचा विचार केला. या सदिच्छा ज्यांच्या जीवनात समूर्त झाल्या आहे, अशा महोदार सत्पुरुषांची चित्रे यानंतरच्या प्रार्थनेतून प्रकट होत आहेतः

*वर्षत सकळमंगळी ।*
*ईश्वरनिष्ठांची मांदियाळी अनवरत भूमंडळी ।*
*भेटतु भूतां ।।*

या भूमंडळावर मांगल्याचा अखंड पाऊस पाडणारी ईश्वरनिष्ठांची गर्दी नांदत राहो. या सदिच्छेत ज्ञानेश्वरांनी त्यांना अभिप्रेत असलेल्या परमपुरुषांची व्याख्या स्पष्ट केली आहे. संपूर्ण ज्ञानेश्वरीत ही ईश्वरनिष्ठांची संकल्पनाच फुलवीत नेली आहे. असा ईश्वरनिष्ठ माणूस 'मनुष्याणां सहस्रेषु' एखादाच राहणार. तो दाटीने भेटत राहावा, ही ज्ञानेश्वराची सदिच्छाही समजावून घेण्यासारखी आहे. आपल्यात कुणी

'ईश्वरनिष्ठ असेल, याचा विश्वास देता येत नाही. जे जे नश्वर असल्याची आपली खात्री आहे, त्यांच्या प्राप्तीसाठी आपण रक्त ओकीत असतो. तारुण्य, लावण्य या दैवदत्त बाबी तर बेभरवशाच्या आहेत, तरी आपण टॉलस्टॉयच्या कथेतील जमिनीचा हव्यास धरणाऱ्या त्या अधाशाप्रमाणे या नश्वर गोष्टींसाठी हपापत व धपापत असतो.

आजच्या समाजात तीन शक्ती प्रतिष्ठित झालेल्या आहेत. सत्ता, संपत्ती व शस्त्र. यांच्या प्राप्तीसाठी माणूस आयुष्यभर आसुसलेला असतो. त्यांच्या लोभाने त्यांच्या ओठांतून लाळ गळत असते व अंगातून घाम गळत असतो; पण या तिन्ही शक्ती अत्यंत बेभरवशाच्या मानल्या जातात, त्या भंगूर तर आहेतच; पण चंचलही आहेत. एकनिष्ठेबद्दल त्यांपैकी कुणाचीही ख्याती नाही. त्या आज एखाद्याजवळ असतील, तर तत्क्षण त्याला तोडून दुसरीकडे पळतील. लक्ष्मी तर चंचलतेकरिता प्रसिद्धच आहे. शस्त्राला स्वतःचे डोळे नसतात, स्वतःची बुद्धी नसते. आपल्या पैशाच्या बळावर विकत घेणाऱ्यावरच ते उलटू शकते. शस्त्र भरवशाचे नाही, याचे कारण त्याच्याजवळ स्वतःची ताकद नसते. जो दणकट हात त्याला धारण करील, त्याच्या मनगटात ताकद असते; पण मनगटात तरी स्वतःची ताकद कुठे असते. मन दणकट असले, तर मनगटात ताकद येते आणि तरच हातातील शस्त्र कृतार्थ होते.



**नेवासा येथील पैस खांब. या ठिकाणी बसून संत ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' लिहिली.**

नश्वरनिष्ठांच्या या मांदियाळीत खऱ्या ईश्वरनिष्ठेची एखादी तिरीप प्रकट व्हावी, जिच्या प्रकाशाने सर्व आसंमत प्रक्षाळून निघेल. अंधारासाठी आसुसलेल्या या जन्मांध जगाची बुबुळे या प्रकाशाच्या कनवाळू स्पर्शाने सुखावतील, सजगही होती. अशाश्वताची अभिलाषा मावळून शाश्वताच्या उपासनेत सर्वजण समर्पण भावनेने मग्न होतील.

या ईश्वरनिष्ठांची तेजःपुंज वैशिष्ट्ये ज्ञानेश्वर यापुढे विविध दीप्तिमान प्रतिमांनी साकार करतात.

*चला कल्पतरूंचे आरव ।*
*चेतना चिंतामणींचें गांव ।*
*बोलते जे अर्णव । पीयूषाचे ।।*
*चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।*
*जे सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।।*

ज्ञानेश्वरांना अभिप्रेत असलेल्या ईश्वरनिष्ठांच्या मांदियाळीची चित्रे वरील प्रतिभाभूत प्रतिमांमुळे अधिकच ठसठशीत झाली आहेत. ईश्वरनिष्ठांची ही मांदियाळी कशी असेल? तर कल्पवृक्षांच्या जंगम उद्यानासारखी, सचेतन चिंतामणींच्या वसाहतीसारखी, किंवा अमृताच्या बोलक्या समुद्रासारखी! कल्पवृक्ष मनात आलेल्या कल्पना उच्चारण्याची आवश्यकता न ठेवताही पूर्ण करण्यासाठी प्रख्यात आहे. चिंतामणी नावचे रत्न जवळ बाळगणाऱ्याच्या सर्व चिंता हरण करण्याची हमी देते. असा कल्पवृक्ष किंवा चिंतामणी एखादाच नाही, तर त्यांच्या संपन्न बागा, समृद्ध गावे या ईश्वरनिष्ठांच्या समुदायासरशी प्रजेच्या प्रत्ययाला येतील. हे ईश्वरनिष्ठ लोक कसे आहेत, तर निष्कलंक चंद्रम्यासारखे सुखशीतळ, तर प्रखरता नसलेल्या सूर्यबिंबासारखे संजीवक असतील. त्यांच्या तोंडातून पडणारे प्रत्येक अक्षर अमृताने ओथंबलेले असेल, त्यांच्यामुळे ऐकणाऱ्याला त्याचे माधुर्य चटका लावील व अमरपणाचा आशीर्वादही देईल.

*किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होवोनि तिहीं लोकीं*
*भजि जो आदिपुरुषी । अखंडीत ।।*

ईश्वरनिष्ठांच्या या दुनियेत प्रेमाचीच देवाणघेवाण होईल. आनंदाचेच आदानप्रदान होईल. असा सर्व त्रैलोक्यामध्ये पूर्ण सुखाचा स्वामी होऊन, आदिपुरुषाची अखंड आराधना करणारा साधक ज्ञानेश्वरांच्या कृपाप्रसादाने या ठिकाणी साकार झालेला आहे.

*आणि ग्रंथोपजिवीये। विशेषी लोकी इये।*
*दृष्टादृष्टविजयें। होआवें जी ।।*

या ओवीतील ग्रंथोपजीवी म्हणजे काय? त्याचा अर्थ ग्रंथावर उपजीविका करणारे असा होतो– आणि ग्रंथ हे ज्याच्या ज्ञानाचे उपजिव्य आहे, असाही होतो.या ग्रंथोपजीवी लोकांना दृष्टादृष्ट म्हणजे इह–परलोकांतील संकटांवर मात करून, उभयलोकी इष्ट भोग प्राप्त करून घेणे अभिप्रेत आहे. पसायदान हे आपल्या श्रोत्यांच्या कळवळ्यापोटी, विश्वात्मक देवाच्या पायाशी ज्ञानेश्वरांनी आळवलेली एक पवित्र प्रार्थना आहे. या प्रार्थनेच्या अनुषंगाने त्यांना अभिप्रेत असलेले आदर्श मानव समाजाचे एक नीलचित्रच त्यांनी रेखाटले आहे. पुढे मागे कोणाला सर्वांग, परिपूर्ण अशा अव्यंग समाजाची पुनर्रचना करण्याची प्रेरणा झाली व शक्ती आली, तर त्यासाठी आवश्यक असलेला निर्दोष आराखडा त्याला येथे उपलब्ध आहे. पसायदान हे ज्ञानेश्वरांच्या आर्षप्रतिभेला पडलेले, मानवतेच्या कल्याणाचे एक भव्य स्वप्न आहे. हे स्वप्न त्यांनी विश्वात्मक देवाच्या निमित्ताने, सर्व भूतमात्रांच्या हृदयस्थ आत्मशक्तीच्या सुपुर्द केले आहे. हे स्वप्न या आत्मरूपाच्या अनुग्रहाने व प्रभावाने समूर्त होईल, असे आश्वासन विश्वेश्वराने दिले होते.

*येथ म्हणे श्री विश्वेशरावों । हा होईल दानपसावो ।*
*येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ।।*

नऊ हजार ओव्यांमध्ये प्रत्येक शब्द जणू अमृतात बुचकळलेला आहे.

**(आभार: आशुतोष शेवाळकर)**

**डॉ. प्रतिमा इंगोले**

विठ्ठल अख्ख्या महाराष्ट्राचेच लोकविलक्षण दैवत... चराचरांत आणि पानाफुलांत सामावलेला विठ्ठल भेदातीत आहे. त्यामुळे त्याच्या चरणाशी स्त्रीपुरुष असा भेद नाहीच. विठ्ठलाच्या निर्मितीची कथाच मुळात स्त्री प्रधान आहे. ती कदाचित आख्यायिकाही असेल.

भगवान श्रीकृष्णाची पत्नी रुक्मिणी रुसली आणि दिंडीखनात आली. अर्थात हे दिंडीखन म्हणजेच दंडकारण्य! महाराष्ट्राचे प्राचीन नाव... एखाद्याने बायकोचा पिच्छा सोडून दिला असता आणि दुसरी बायको केली असती. पण विठ्ठलच तो! अद्‌भुत रसायनच ते! जगाच्या दृष्टीने तो अद्‌भुत वागला. बायकोला समजावयाला आला, रुसलेल्या रुक्मिणीने दौंडला वास्तव्य केले असे म्हणतात. तिचा शोध घेत–घेत विठ्ठल दौंडला पोहोचले. रुक्मिणीची समजूत काढली आणि परत जाताना त्यांना आपल्या भक्ताची, पुंडलिकाची आठवण झाली. ते त्याला भेटायला पंढरपूरला आले आणि पुंडलिकाने फेकलेल्या विटेवर स्थानापन्न झाले. विठ्ठल का येत नाही म्हणून मागोमाग रुक्मिणी आली ते बघून तिथेच थबकली... तेव्हापासून विठ्ठल झाला भक्तांचा आणि आपल्या माहेरवासीयांना वेड लावणाऱ्या विठ्ठलाचे कौतुक बघत रुक्मिणी उभी राहिली. पण दोघांमध्ये कायम एक भिंत आडवी आली.

समतेचे मूर्तरूप असणारे सावळे परब्रह्म महाराष्ट्री नांदू लागले. विशेष म्हणजे ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांच्या सारख्याच विठ्ठलाच्या जनाबाई, मुक्ताबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई या संत स्त्रिया मान्यता पावल्या. विठ्ठलाचे अख्खा महाराष्ट्राशीच नाते जुळले पण ह्या संत स्त्रियांबाबत ते अधिक लडिवाळ असलेले दिसून येते. तसेच ह्या स्त्री संतांच्यामुळे विठ्ठलाच्या समतेवर शिक्कामोर्तब होते.

### संत जनाबाई

यात सर्वात जास्त भक्तीचा अधिकार प्राप्त झालेली जनाबाई! तर आध्यात्मिक अधिकार प्राप्त झालेली चिमुकली मुक्ताबाई! मुक्ताबाईमुळे भक्ताचे वयाचे बंधन तुटून पडते. तर जनाबाईमुळे सामाजिक स्थितीचे! कारण जनाबाई नामदेवाच्या घरची दासी असते म्हणजे, आधीच स्त्री म्हणून शुद्र, त्यात दास्यत्व! पण म्हणजे विठ्ठलाचे व

# ।। विठुरायाची समता ।।

**समतेचे मूर्तरूप असणारे सावळे परब्राह्म महाराष्ट्री नांदू लागले. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांच्यासारख्याच विठ्ठलाच्या जनाबाई, मुक्ताबाई, कान्होपात्रा, बहिणाबाई या संतस्त्रिया मान्यता पावल्या. विठ्ठलाचे अख्ख्या महाराष्ट्राशीच नाते जुळले पण या संतस्त्रियांबाबत ते अधिक लडिवाळ असलेले दिसून येते. या स्त्रीसंतांच्यामुळे विठ्ठलाच्या समतेवर शिक्कामोर्तब होते.**



या पंढरीचे सुख पाहतां डोळां ।

तिचे अनाम नाते सगळ्या नात्यांना कवेत घेणार आहे.

लोकमानसात विठ्ठलाची व जनीची जी प्रतिमा आहे, ती बापलेकीच्या परे जाणारी आहे. विठ्ठल सतत जनीसाठी रुक्मीणीशी आणि समाजाशी भांडतो. स्त्रीला लाभलेले दास्यत्व मिटवण्याचा प्रयत्न करतो. तो सतत जनीची बाजू राखतो. तिच्या कष्टाची कदर करतो.

*विठ्ठल म्हणे जनी मोठी सासरवासी*
*दयनाच्यासाठी निजली जात्यापासी*
*– वऱ्हाडी लोककथा*

सकाळी लवकर उठून दळण उरकायचे असल्यामुळे जनीला काळजी वाटते. दुसरीकडे झोपले तर जाग येणार नाही, म्हणून ती जात्या जवळच झोपते. पण विठ्ठल पहाटेच ती उठण्याआधी तिचे दळण दळून टाकतो. तिची वेणी उकलून तिला न्हायला घालतो. तिच्या केराच्या पाट्या भरतो.

*दळिता कांडिता देवाहाती आले फोड*
*जनाबाई बोले । केली वैकुंठाची जोड*

कारण एखाद्या स्त्रीचे डोंगरभर कष्ट उपसून काढले तर ते पुण्याचेच काम! पण जनीही विठ्ठलाला हाक मारते! हक्काने मदत कर म्हणते.

*पंढरपुरात जनी थेपते (वेचते) गवऱ्या*
*हात लावू लागा तुमी इठ्ठल सोयऱ्या*
*– वऱ्हाडी लोकगाथा*

विठ्ठलामध्ये आणि जनीमध्ये इतके सख्यत्व आहे की, ती विठ्ठलाला हक्काने काम सांगू शकते आणि पंढरपुराचीच दैवत बनते. विठ्ठलाला सोयरा म्हणते.

*मुंबईची मुंबादेवी, पुण्याची परबती,*
*जनाबाईची शिळ्या लावून पूजा व्हती*
*– वऱ्हाडी लोकगाथा*

विठ्ठल तरी जमिनीवर आहे. पण जनाबाईला इतके उंच स्थान मिळाले आहे की, तिची पूजाही शिडीवरुन करावी लागावी. ती विठ्ठलाच्या पाठिंब्यामुळे इतकी धीट होते की, डोईचा पदर आला खांद्यावरी असे म्हणत, विठ्ठला मी तुझे घर रिघून वेश्या झाले आहे, असेही प्रतीकात्मकरीत्या म्हणते. विठ्ठलाच्यासाठी आपल्याला जगाची फिकीर नाही असेच तिला सुचवायचे असते. कारण विठ्ठल तिच्या व्यक्तिमत्त्वाला पुरून उरलेला असतो. तिथे खरं तर स्त्री–पुरुष भेदच काय तर भक्त आणि देव हा भेदही गळून पडलेला असतो. इतका की त्यामुळे रुक्मिणीला मत्सर वाढू लागतो.

*शेजबाज केली, रुकमिन म्हने वाया गेली,*
*जनीच्या झोपळीत झोप देवाले लागली*
*– वऱ्हाडी लोकगाथा*

## संत मुक्ताबाई



दुसरी संत मुक्ताबाई ! मुक्ताबाईचा तर एवढा अधिकार की साक्षात नामदेवाने तिला गुरू मानले व चांगदेवाला तिने अक्कल शिकविली. चांगदेव मुक्ताबाईची एक कथा सांगतात. कदाचित तीही आख्यायिका असावी. चांगदेवी मुक्ताबाईला भेटायला येतात. तेव्हा ती न्हाणीत आंघोळ करीत असते. ती म्हणते या इकडे पण चांगदेवाला वाटते. एक स्त्री आंघोळ करते आहे आणि आपण कसे जावे? वास्तविक मुक्ताई, दहा वर्षांचीच असते पण मनातल्या मनात हसते व म्हणते ज्याची देहाची जाणीव गेली नाही तो काय योगी? पण विठ्ठल या सर्वांच्या पलीकडे जातो व नेतोही. म्हणूनच त्याची आस स्त्री वर्गाला लागते. मुक्ताई तर साक्षात वीजच!

*मुक्ताई–मुक्ताई दहा वरसाचं लेकरु,*
*चांगदेव योगियानं तिले मानलं रे गुरु*

पण सामान्य लोकांना चमत्काराशिवाय अधिकार पटत नाही म्हणूनच मुक्ताईच्या खात्यावर अनेक चमत्कार आहेत त्यात वाघावर बसून आलेल्या आणि सर्पाचा दोर केलेल्या चांगदेवाला ती निर्जीव भिंतीवर बसून सामोरी जाते.

*ज्ञानदेव धुये तोंड, मुक्ता न्हानीत,*
*चांगदेव आले भेटी, निर्जिव चालवली भिंत*
*– वऱ्हाडी लोकगाथा*

अशी मुक्ताई की, जिच्या दर्शनाला स्वत: विठ्ठल वाट तुडवित जातो. ते बघून पुन्हा रुक्मिणीला मत्सर वाटतो.

*रुसली रुकमिना, जाऊन बसली पानंदीले,*
*सावया इठ्ठाले, जाऊ देईना आळंदीले।।*

मुक्ताबाईचा अधिकारच तेवढा होता. कारण ज्ञानदेवाच्या आधी तिला सर्वज्ञान प्राप्त झाले होते. म्हणून विसोबा, नामदेव, चांगदेव यांसारखे वयोवृद्ध तिचे शिष्य झाले होते.

*देख ग्यानियाच्या राजा आदिमाथा पान्हावली,*
*सर्वांआधी रे मुक्ताई, पान्हा पियीसनी गेली*

साक्षात आदिमायेने पान्हा पाजलेली मुक्ताई सर्वात श्रेष्ठ असली तर नवल नाही. तरीही तिची विठ्ठलावर भक्ती होती आणि विठ्ठलानेही तिच्या दर्शनाची आस धरली होती.

*घेती हिरीदाचा ठाव, ऐका ताटीचे अभंग,*
*एका–एका अभंगात, उभा केला पांडुरंग*

## संत कान्होपात्रा

तिसरी स्त्रीसंत कान्होपात्रा ही तर व्यवसायाने वेश्या होती. तिच्या बाबतही एक कथा सांगितली जाते. हीही कदाचित आख्यायिका असावी. कान्होपात्रा अंत:प्रेरणेने दिंडीसोबत पंढरपूरला आली आणि विठ्ठलाला सखा मानून भक्तिरंगात रंगून गेली. ती अतिशय सुंदर होती. बेदरच्या बादशहाने तिची सौदर्यकीर्ती ऐकून तिची अभिलाषा धरली. त्या वेळी ती धावत विठ्ठलाजवळ आली आणि कान्होपात्रेचे झाड झाले. तिने विठ्ठलाला मारलेली आर्त हाक अजरामर आहे.

*नको देवराया अंत आता पाहू,*
*प्राण हा सर्वथा जाऊ पाहे*

कवित्वाचा संस्कार नसलेली कान्होपात्रा आंतरिक उमाळ्याने व विठ्ठलावरील विश्वासाने चंदनवेल बनते. लोकमानस कान्होपात्रेला रुक्मिणीइतकेच महत्त्वाचे स्थान देताना दिसते.

*राही रुक्मिनापरस*
*सत्यभामाचं रुप चढं*
*देवाच्या अंगणात*
*कान्होपात्राचं झाळं*

कृष्णाच्या दोन्ही पत्नीपेक्षा कान्होपात्राच श्रेष्ठ ठरली. कारण तिला

विठ्ठलाचा अखंड सहवास लाभला.

*कान्होपात्राचं झाळ, सत्यभामा तुझ्या दारी*
*फुलं पळतीन विठ्ठलाच्या शेजेवरी*
*– व्हाडी लोकगाथा*

विठ्ठलाची आगळी पूजा बांधण्याची संधी फक्त कान्होपात्राला मिळाली आहे. त्यामुळे विठ्ठलाचे भक्त तिचे दर्शन घेतल्याशिवाय मंदिर सोडत नाहीत. त्यामुळेच सर्वसामान्य स्त्रिया विठ्ठलाला कान्होपात्रेसारखं बोलावून घे अशी विनवणी करतात.

*देवा तुया दारी! कान्होपात्राचं झाळ,*
*आषाढी एकादशीले, विठ्ठला मूळ धाडं*
*– लोकगाथा*

कान्होपात्राच्या जीवनाच सोनं झालं. तिला विठ्ठलाचरणी स्थान मिळालं. उलट झाड होऊन विठ्ठलावर सावली धरता आली. अर्थातच झाड हे भक्तीचं प्रतीक असावं. वैज्ञानिकदृष्टी काहीही म्हणो पण विठ्ठलभक्तीमुळे कान्होपात्राचा उद्धार झाला व ती इतक्या उंचीवर जाऊ शकली की, देवालाही कवेत घ्यावे. मुक्ताई चांगदेवासाठी पाळणा म्हणते तेव्हा ती आदिमाय होते तर कान्होपात्रा देवावर सावली धरून आदिमाता होते.



## बहिणाबाई

चवथी विठ्ठलभक्त स्त्रीसंत बहिणाबाई ही खरी तुकारामांची शिष्या! अतिशय खडतर आयुष्य लाभूनही ती आपली विठ्ठलावरील श्रद्धा कायम ठेवते. एकाच जन्मात तेरा जन्म लाभल्याचे ती स्वतःच नमूद करते. लहान वयात बिजवराशी लग्न होऊन पुढे संसारासाठी वणवण हिंडणारी बहिणाबाई आध्यात्मिक शिखर गाठते. तिला नकोसे वाटतानाही, स्त्रीदेहाचे उपभोगाचे साधन बनविलेल्या पुरुषाला नकार देता येत नाही, ही खंत ती व्यक्त करते.

*स्त्रियेचे शरीर पराधीन देह । न चाल उपाव विरक्तीचा*
*भ्रतार तो मज वोढतो येकांती । भोगावे मजसी म्हणोनिया*

बहिणाईचा संघर्ष असा तिहेरी होता. तिला संसार सोडता येत नव्हता. त्या काळात पुरुष गुरू केला म्हणून संघर्ष करावा लागत होता आणि नवरा मालकी हक्क सोडत नव्हता. अशा वेळी तिला विठ्ठलच सखा वाटत होता, नव्हे तो सगळ्या स्त्रियांचा सखाच आहे.

## संत सखुबाई

'सखू जाते पंढरपुरा' हे गीत लोकगीते गोळा करताना मिळाले. अर्थातच ते नेहमीच्या गीतापेक्षा वेगळे आहे. त्यात सखू पंढरपूरला जायला निघते. पण तिच्या मुलांना आवडत नाही. एक मुलगा तर तिला जबरीने परत आणतो. कोंडवाड्यात कोंडतो, ती तिथे विठ्ठलाचा धावा करते. विठ्ठला धावून येतो, तिची सुटका करतो, इकडे सखू पंढरपूरा जाते. विठ्ठल तिच्या जागी तिचे रूप घेऊन राहतो, कामं करतो.

*देव आले वसान वाड्या सळकन कुलपाच्या आगळ्या*
*साती आगळ्या पळू लागल्या – पांडुरंगा*
*कवाड साती उघडले, सकू गेली पंढरीशी*
*दिवसांन दिवस सात दिवस – पांडुरंगा*
*देव आनले घरारोजी, लावले दळण दळायला,*
*मुक्यानं दळू नको – पांडुरंगा– पांडुरंगा*
*सासू–सासरे ववी गावू रे भरतारा*
*देव घासतील भांडे, सखू पंढरीत हिंडे – पांडुरंगा*
*देव घरातील पोतेरा, सकू पाहती गोकुळपूरा*
*देव नदीवर धुन धुती– पांडुरंगा*

स्त्रीभक्तांसाठी स्त्रीरूप धारण करण्याची विठ्ठल तयारी ठेवतो. यातच त्याच्या सहृदयतेबरोबरच समानतेवर कळस चढतो. म्हणून तुकोबा म्हणतात, 'भेदाभेद, भ्रम अमंगळ', विठ्ठल इथे देव राहतच नाही तर तो सखा बनतो. जनाबाईचा विठ्ठल तिचा सखा आहे. म्हणून ती त्याला शिव्या देते त्याला रागवते.

## समानतेची पताका

अरे अरे विठ्या, मूळ मायेच्या कारट्या असे म्हणत समानतेची पताका खांद्यावर घेते. विठ्ठलाला सख्यत्व बहाल करते. तर एखाद्या खेड्यातील सकूचाही विठ्ठल सखाच असतो. स्त्रीच्या शरीराला जैविक पातळीवर नराची आसक्ती असते. हे खरे असले तरी तिच्या मनाला शरीरापार जाण्याची ओढ असते. त्या वेळी शरीरातील पातळीवर जाणारा सखा हवा असतो आणि असा सखा विठ्ठलाच्या रूपात भेटतो, दिसतो.

आयुष्यातील एका टप्प्यावर स्त्री वैतागते, त्रासते. अशा वेळी शरीरापार जाण्याऱ्या सख्याची तिला ओढ वाटते. लौकिक जीवनात असा सखा मिळत नाही. नवरा तर सखा होऊनही नवरेपण कधीच विसरू शकत नाही, स्त्रीवरचा लैंगिक हक्क तो सोडायला तयार होत नाही. मग अशा स्वप्नसख्याचे काम विठ्ठल करतो. तो केवळ आधारच देत नाही तर प्रसंगी धीरोदात्तपणे पाठीशी टाकण्याचा विश्वास देतो. वरील संत स्त्रियांच्या आयुष्यात आणि सामान्य वारकरी स्त्रीच्या आयुष्यातही विठ्ठलाची ही भूमिका असते. एक सख्यत्वाचे आगळे लडिवाळ नाते तिथे विकसित होते. विठ्ठल सामाजिक स्थिती (कान्होपात्रा), कौटुंबिक स्थिती (बहिणाबाई), दास्यत्व (जनी), अवखळ वय (मुक्ताई) यांच्या पलीकडे जाऊन त्यांचा सखा होतो. सगळे निकष, नीतिनियम मोडून टाकतो. विठ्ठल असाच तर सर्व स्त्रियांना हवा असतो.

संपर्क: ०९८५०११७९६९



छाया : शिरीष शेटे

नाम विठोबाचे घ्यावे । मग पाऊल टाकावे ।।

# ।। आमुचा देव तो पांडुरंग । रंगले हे चित्त माझे तयापायी ।।

**गेली सुमारे एक हजार वर्षे महाराष्ट्र आणि शेजारच्या राज्यांतील श्रद्धाळू वारकऱ्यांना श्री क्षेत्र पंढरपूरचे आकर्षण राहिले आहे. संत शिरोमणी ज्ञानेश्वर महाराजांपासून ते संत तुकाराम महाराजांपर्यंत वारकरी संप्रदायाच्या या संतभूमीची महती जनसामान्यांत रुजवण्यात अनेक संतांनी योगदान दिले आहे. अनेक परकीय आक्रमणे आली, राज्ये बदलली, नव्या विचारांची वादळे आली अन् गेली; परंतु, कोणताही गाजावाजा वा प्रचार न होता पंढरपूरच्या विठ्ठलभक्तीचा हा धागा अतूट राहिला आहे. खऱ्या अर्थाने जातिभेद न पाळणाऱ्या वारकरी संप्रदायाच्या या संतभूमीचे श्रेष्ठत्व म्हणूनच निर्विवाद आहे.**

**अनुराधा पिटके**

गेली अनेक शतके लाखो भक्तांना आपले आराध्य दैवत म्हणून आकर्षण बनून राहिलेल्या श्रीक्षेत्र पंढरपूरचा, पांडुरंग वल्ली असा सर्वात पहिला उल्लेख इ. स. ५१४ सालच्या एका कानडी भाषेत खोदलेल्या ताम्रपटावर आढळतो. ज्ञात अशा ऐतिहासिक प्रत्यक्ष पुराव्यांपैकी हा बहुधा सर्वात जुना पुरावा असावा. ऐतिहासिक तथ्यानुसार पंढरपूरच्या मूळ विठ्ठल मंदिराची उभारणी मोडी लिपीचा जनक आणि कृष्णदेवरायाच्या काळातील स्थापत्य अभियंता हेमाद्री पंडित याने केली असल्याचे मानंले जाते. तर, संशोधक डॉ. मोटे यांनी आपल्या 'टेम्पल्स ॲण्ड लिजण्ड्स ऑफ महाराष्ट्र', या पुस्तकात व्यक्त केलेल्या मतानुसार विठ्ठल मंदिर भक्त पुंडलिकाने बांधली. बृहन्नारदीय पुराणात पंढरपूरचा पाण्डुपूर असा; तर, स्कंदपुराणात पुंडरिकापुर असा उल्लेख आढळतो.

पंढरपूरच्या पांडुरंगाची मूर्ती परकीय आक्रमकांपासून वाचवण्यासाठी मंदिरातून अनेकवेळा हलवली गेली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांना ठार मारण्यासाठी विजापूरहून निघालेल्या अफझलखानाचा मार्ग पंढरपूरहून जात होता. त्या वेळी या मूर्तिभंजकापासून विठ्ठलमूर्ती वाचवण्यासाठी जवळच्याच भंडीशेगाव या गावातील पाटीलबुवानं ती आपल्या घरी नेली होती, असे देवळातील परंपरागत सेवेकरी

सांगतात. विठ्ठलाचे पदस्पर्श दर्शन हे पंढरपूरचे वैशिष्ट्य होय. भारतात बहुधा कुठल्याच मंदिरात अशी पदस्पर्श दर्शनाची पद्धत नाही.

### वारकरी संप्रदायाची स्थापना

साधारणत: १२ शतकापासून म्हणजे संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाची स्थापना केल्यानंतर पंढरपूरचे महत्त्व उत्तरोत्तर वाढत गेले. समाजातील सर्व जातिधर्माच्या लोकांना याच काळात भक्तीचे क्षेत्र खुले झाले. या सर्व वारकऱ्यांना भागवत संप्रदायाच्या एका झेंड्याखाली एकत्र आणण्याचे कार्य अनेक संतांनी केले. त्यासाठी श्रीक्षेत्र पंढरपूर हे व्यासपीठ म्हणून उपयोगात आणले. संत ज्ञानेश्वरानंतर मुक्ताबाई, नामदेव, जनाबाई, रोहिदास, चोखामेळा, संतसेना, सावतामाळी, एकनाथ, तुकाराम इत्यादी अनेक संतांनी आपल्या भक्तिरसपूर्ण अभंगांद्वारे भागवत संप्रदायाची परंपरा व्यापक केली. या सर्व संतांच्या साहित्यात, अभंगात श्रीक्षेत्र पंढरपूरचे माहात्म्य अपरिहार्यपणे आले आहे.

संत ज्ञानेश्वरांपूर्वी आठव्या शतकापासून कर्नाटकात विठ्ठल भक्तीचा प्रारंभ झाल्याचे दिसून येते. आठव्या शतकातील कर्नाटकचे अचलानंद, वैष्णव परंपरेतील तिथले संत व्यासराय, ब्रह्मण्यतीर्थ, श्रीपादराय यांनी कर्नाटकात विठ्ठलभक्ती आणि पंढरपूरचे माहात्म्य वाढवले. अचलानंदांच्या प्रयत्नांमुळेच विठ्ठलभक्तीची धारा अनेक प्रांतात गेली.

*आम्ही वैकुंठवासी । आलो याची कारणासाठी ।*
*अर्थे लोपली पुराणे । नाश केला शब्दज्ञाने ।*
*विषयलोभी मने । साधन हे बुडविले ।*
*पिटु भक्तीचा डांगोरा । कळीकाळासी दरारा ।।*

श्रीविठ्ठल आणि पंढरपूर यांचं संत तुकारामांनी आपल्या साऱ्या आयुष्याशी एक अतूट नाते जोडले. त्यांच्या अनेक अभंगात ठायी ठायी आलेला या दोहोंचा उल्लेख याचीच प्रचिती देतो...

*तुका म्हणे करा जयजयकार आनंदे । गायीन ओवीया पंढरीचा देव ।*
*आमुचा देव तो पांडुरंग । रंगले हे चित्त माझे तयापायी ।*
*म्हणवुनी घेई हाची लाहो ।।*

### बेगडी प्रतिष्ठेपासून दूर

तुकारामांसारख्या संतांनी बळकट केलेल्या भागवत संप्रदायात, जातिभेदाला, मत्सराला, द्वेषाला, लहानमोठेपणाला, बेगडी प्रतिष्ठेला स्थान नाही म्हणूनच पंढरीच्या वाटेवर विठुनामाचा गजर करत जाणाऱ्या शेकडो पालख्यांसमवेत अनेक परदेशी भक्तजनदेखील सामील होताना दिसतात.

विष्णूचा अवतार समजल्या गेलेल्या पंढरपूरच्या श्रीविठ्ठल मूर्तीत भागवत भक्तांसाठी आकर्षणाची मोठी शक्ती सामावलेली आहे. त्यामुळेच खऱ्या अर्थाने प्रांतीय आणि राष्ट्रीय एकात्मता साधणारा पंढरपूरच्या विठ्ठल भक्तीचा हा चिवट धागा येणाऱ्या काळातही माणसामाणसांना जोडत राहील. तोपर्यंत *'बोला, पुंडलिक वरदे हरी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम.'*

*माते तृण बाळा दुधाची ते गोडी । ज्याची नये जोडी त्यासी कामा ।*
*तुका म्हणे मुक्ताफळ शिंपीपोटी । नाहीं त्याची भेटी भोग तिथे ।।*
*कमोदिनी काय जाणे तो परिमळ । भ्रमर सकळ भोगीतस ।*
*तैसें तुज ठावें नाहीं तुझे नाम । आम्हीच तें प्रेमसुख जाणों ।।*

# ।। ज्ञानदेवें रचिला पाया ।।

**(पृष्ठ २७ वरून)**

जटिलयोगसाधना करणारे ज्ञानदेव जनसामान्यांकडून तिची अपेक्षा करत नाहीत. प्रपंचाची पायरी न ओलांडणारे ज्ञानदेव समाजाला मात्र गृहस्थाश्रमाची कर्तव्ये यथार्थपणे पार पाडायला सांगतात. दैवी संपत्तीचे आदर्श समोर ठेवून आसुरी प्रवृत्तींचा त्याग करायला सांगतात. त्यांची ज्ञानदेवीच मग वारकऱ्यांच्या प्रस्थानत्रयीतील आद्य स्थान घेते. एवढेच नव्हे तर माउलीचे स्थानदेखील घेते. कुशल संघटक आपल्या अनुयायांना नवी दृष्टी, नवी विचारसरणी नि आचारसरणी देतो नि त्यांच्या जीवनाला नवे वळण लावण्याचाही प्रयत्न करतो. ज्ञानदेवांच्या रूपाने महाराष्ट्राला असेच एक असामान्य नेतृत्व लाभले. या द्रष्ट्या नेतृत्वात समंजसपणा होता, सर्वांना घेऊन चालण्याची कुटुंबप्रमुखाची कुटुंबवत्सल प्रवृत्ती होती, दुरितांचे तिमिर नष्ट करण्याची दुर्दम्य


ज्ञानेश्वर माउली

लालसा होती, ईश्वरनिष्ठांची मांदियाळी जमवण्याचे सामर्थ्य होते. त्यामुळे यादवपूर्वकाळातल्या वारकरी संप्रदायाची स्थितिप्रियता जाऊन त्याला नवचैतन्य लाभले. यादवकालात नि यादवोत्तर कालात तो उत्तरोत्तर विकसित होत गेला. महाराष्ट्राचं धार्मिक नि सांस्कृतिक नेतृत्व करण्याची क्षमता ज्ञानदेवांनी त्यात निर्माण केली. साऱ्या जातिपातींत एकात्मतेची ज्योत पेटवीत, हा संप्रदाय आजही प्रपंच परमार्थाची गुंफण करून पंढरीची वाट चालत, चालत; मोक्षाची वाट दाखवत आहे. बरीच 'शतकं' ही वाट चालत चालत आल्यावर आपण जेव्हा शतकानुशतकांची आवरणं बाजूला काढून, दूरवर पाहू लागतो तेव्हा आपल्याला काही पाऊलखुणा दिसू लागतात. या पाऊलखुणा असतात निळोबांच्या, बहिणाबाईंच्या, तुकोबांच्या, एकोबांच्या, चोखोबांच्या, गोरोबांच्या, नाम्यांच्या नि ज्ञानोबांच्या. पाऊलखुणांवर शतकानुशतके एकामागून एक चालणाऱ्या या संतांबरोबरच हरिनामाचा घोष करणाऱ्या वारकऱ्यांच्या दिंड्यातून 'ग्यानबां'च्या संघटन कौशल्याचीही साक्ष पटू लागते.

डॉ. सागर देशपांडे

'तेरावं शतक हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील एक फार महत्त्वाचं शतक आहे. याच शतकात महाराष्ट्रात एक क्रांतिपर्व सुरू झालं. या पर्वाला ' क्रांतिपर्व' म्हणावं, 'परिवर्तन पर्व' म्हणावं की 'प्रबोधनपर्व' म्हणावं असा प्रश्न नेहमी पडतो. कारण या पर्वाचे हे तिन्ही आयाम आहेत. म्हणावं तर त्यांचं स्वतंत्र अस्तित्व आहे नि म्हणावं तर ते परस्परपूरक आहेत.' (संदर्भ - पृष्ठ क्र. १६, 'निवडक सार्थ नामदेव' या डॉ. अशोक कामत यांनी लिहिलेल्या ग्रंथाला डॉ. यू. म. पठाण यांनी लिहिलेली प्रस्तावना) डॉ. पठाण यांनी सांगितलेल्या वरील तिन्ही पर्वांचा आविष्कार आपल्याला पंढरपूरच्या वारीमध्ये पाहायला मिळतो. म्हणूनच आजच्या भाषेत वारी म्हणजे भारताची आध्यात्मिक लोकशाही आहे, असं म्हटलं तरी ते वावगं ठरू नये.

### भक्तिपंथाचे आद्यपीठ

श्री विठ्ठलाच्या अधिष्ठानामुळं आज पंढरपूरची ओळख भक्तिपंथाचं आद्यपीठ म्हणून दृढ झाली आहे. इथलं विठ्ठलाचं मंदिर पूर्वीच्या काळी तसं लहान होतं. पण पुढे रामचंद्र देवराय यादव आणि हेमाद्री पंडित यांनी पुढाकार घेऊन, या मंदिराचा विस्तार केला. पंढरपूरला आषाढी आणि कार्तिकी एकादशीच्या दिवशी मोठी यात्रा भरते. लक्षावधी विठ्ठलभक्तांनी, भाविकांनी, वारकऱ्यांनी चंद्रभागेचं वाळवंट

**आजच्या भौगोलिक नकाशातील महाराष्ट्र, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशाच्या काही भागात आपल्याला विठ्ठलभक्तांची मांदियाळी पाहायला मिळते. श्री विठ्ठल हे विष्णूचे रूप मानले जाते. त्याचं मूळ क्षेत्र हे कर्नाटकातील असल्याचे सांगण्यात येते. म्हणून 'कानडावो विठ्ठलु, कर्नाटकु' असं म्हटलं जातं. पण शेकडो वर्षांच्या परंपरेनं चालत आलेली ही विठ्ठलभक्तीची परंपरा 'वारी'च्या रूपानं ज्या प्रांतानं अक्षय्य ठेवल्याचं दिसून येतं, तो प्रांत म्हणजे आपला महाराष्ट्र. म्हणूनच ऐतिहासिक काळापासून वारकरी- धारकऱ्यांचा महाराष्ट्र अशीच या प्रदेशाची ओळख करून देण्यात येते.**

# ।। आध्यात्मिक लोकशाहीचा आविष्कार ।।



छाया : शिरीष शेटे

केशवाचे भेटी लागलें पिसें । विसरलें कैसें देहभान ।।

आणि पंढरपूरचा कित्येक मैलांचा परिसर व्यापून गेलेला असतो. वर्षानुवर्षे, शेकडो वर्षे झाली तरी महाराष्ट्रातली ही आषाढी आणि कार्तिकी वारीची परंपरा अखंडपणे सुरू आहे. नुसतीच सुरू आहे असं नव्हे तर ती बदलत्या काळानुसार नव्या बदलांना स्वीकारत सुरू आहे.

या वारीसाठी आळंदीहून संतश्रेष्ठ श्रीज्ञानेश्वरांची आणि देहूतून तुकोबारायांची अशा पादुकांच्या पालख्या पंढरीला येतात. याशिवाय वेगवेगळ्या भागांतून, वेगवेगळ्या संतांच्या नावे असलेल्या दिंड्या, वर्षानुवर्षे चालत आलेली आपली परंपरा आणि दिनक्रम सांभाळून; या वारीमध्ये सहभागी होत असतात. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून लक्षावधी स्त्री-पुरुष वारकरी आपापल्या गावशिवारांतून चालत-चालत पंढरपुरी दाखल होत असतात. क्षणभराच्या विठ्ठलमूर्तीच्या दर्शनाची आस लागलेल्या या वारकऱ्यांकडे पाहिले की, महाराष्ट्राच्या वाटचालीतल्या संतपरंपरेच्या अस्तित्वाची साक्ष पटू लागते.

शेतीतील पेरणीच्या पहिल्या हंगामाची सुरुवात करून झाली की, हजारो खेडेगावांमधल्या स्त्री-पुरुषांनी अनवाणी पायांनी पंढरीच्या दिशेनं मार्गस्थ व्हायचं ही इथली शेकडो वर्षांची परंपरा. थोडाफार जवळ असलेला शिधा आणि मोजक्याच साहित्यानिशी प्रवासामधल्या सर्व प्रकारच्या गैरसोयी सहन करत, मुखी विठ्ठल-रखुमाईचं नाव घेत घेत, मिळेल ते जेवण गोड मानत कधी एकदा आषाढीच्या आधी पंढरपुरी दाखल होतो अशी विठ्ठलदर्शनाची प्रचंड आस लागलेली जुन्या पिढ्यांमधली माणसं पाहिली की; निर्मळतेच्या झऱ्यांचा वेगळा शोध घेण्याची गरजच पडत नसे. अठरा पगड जातिधर्मातले लोक कोणताही भेदभाव न करता परस्परांच्या गळाभेटी घेत आपण पाहिले की समजून येते - आपल्या महाराष्ट्राला लाभलेली ही एक वेगळ्याच प्रकारची श्रीमंती आहे.

## जागतिक पातळीवरील एकमेव 'इव्हेंट'

उपवास, भजन, कीर्तन, प्रवचनात दंगलेले वारकरी हातात टाळ-चिपळ्या आणि डोईवर तुळशी-वृंदावन घेऊन एखाद्या आजन्म व्रताचं पालन करावं अशा श्रद्धेनं जेव्हा आषाढी-कार्तिकीच्या वारीला जायला निघतात, तेव्हा आपसूकच मनात विचार येतो. कुणाच्याही निमंत्रणाशिवाय स्वयंस्फूर्तीनं शेकडो वर्षे सुरू असलेला वारी हा जागतिक पातळीवरील एकमेव 'इव्हेंट' असावा.

परकीयांची आक्रमणं आणि त्यात होरपळून निघणारा सर्वसामान्य समाज आपल्या अस्तित्वाच्या खुणा शोधू लागला होता, त्या काळात इथल्या संत-महात्म्यांनी त्याला विठ्ठलभक्तीची दीक्षा दिली. त्यातूनच सर्व जातिधर्मातल्या स्त्री-पुरुष संतांची एक वेगळी परंपराच निर्माण झाली.

ज्ञानेश्वर महाराजांनी लावलेले हे भागवत धर्माचे रोपटे पुढे निवृत्ती, सोपान, मुक्ताबाईंसह, नामदेव, तुकाराम, एकनाथ, चोखोबा, विसोबा, निळोबा, सावतामाळी, सेना न्हावी, गोरा कुंभार, नरहरी सोनार, संत जनाबाई, संत सखू अशा अनेकांनी आपापल्या हृदयातील विठ्ठलभक्तीचे शिंपण घालून मोठं केलं. महाराष्ट्रातल्या अठरापगड जातींमधल्या आबालवृद्धांची ही वारी म्हणजे समन्वयाच्या आणि सर्वसमावेशकतेच्या मूळच्या मानवी प्रवृत्तीचं एक समृद्ध प्रतीकच म्हणावं लागेल. त्यातूनच पुढं समर्थ रामदासांनी 'मराठा तितुका मेळवावा! महाराष्ट्र धर्म वाढवावा' हे विचारसूत्र महाराष्ट्र प्रांताला दिलं. म्हणूनच 'भेदाभेद अमंगळ' मानणारा हा वारकरी संप्रदाय आणि या पंढरीच्या वारीच्या निमित्तानं एकवटणारी विठ्ठल भक्तांची मांदियाळी ही या महाराष्ट्राची म्हणजेच या भारतवर्षाची फार मोठी शक्ती ठरली आहे.

## जीवनमूल्यांची रुजवणूक

सहिष्णुता, मानवता, उदारता, समानता, सहयोग आणि या साऱ्याला लाभलेलं भक्तीचं अधिष्ठान ही मूल्यं या पंढरीच्या वारीनं समाजात वारंवार पेरली. जात-पात-पंथ-भेद विसरून या मूल्यांच्या रुजवणुकीसाठी विचारांचं खतपाणी घातले. अनेक चुकीच्या रुढी-परंपरावर प्रहार करणाऱ्या संतविचारांचा जागर करत, सामाजिक समतेचा संदेश प्रत्यक्षात आणणारी आणि प्रपंचात राहूनही परमार्थ साधता येतो या मूलभूत विचारांचा प्रत्यय देणारी; ही 'वारी' म्हणूनच आपल्या सगळ्यांचं विचारविश्व आणि जीवनविश्व व्यापून राहिलेली आहे.

शेकडो वर्षांची वारीची ही प्रथा कालसुसंगतपणे बदलत गेलेली दिसून येते. पूर्वी आपापल्या गावातून थेट पंढरपूरला चालत जायचे आणि चालत परत यायचे इथंपासून सुरू झालेली वारी आता आधुनिक युगात तंत्र-विज्ञानस्नेही बनू लागली आहे. या वारीची एक स्वतंत्र व्यवस्थापन यंत्रणा विकसित झाली असून, दिंडी प्रमुखाच्या म ार्गदर्शनाखाली तिचे व्यवस्थापन सुरू असलेले दिसून येते. या वारीमध्ये केवळ ग्रामीण भागातल्या स्त्री पुरुषांचा आता सहभाग राहिलेला नसून तरुण पिढीतली मंडळीही आवर्जून सहभागी होताना दिसतात. माहिती-तंत्रज्ञानाच्या (आय. टी.) क्षेत्रात काम करणाऱ्या उच्चशिक्षित, आधुनिक तंत्रस्नेही असणाऱ्या युवक-युवतींनाही या वारीचं आकर्षण वाटू लागलं आहे. अशा युवक-युवतींचा वारीमध्ये दखल घेण्याजोगा सहभाग आता दिसू लागला आहे. वाहनसुविधेबरोबरच मोबाईलच्या उपलब्धतेमुळं एका हातात टाळचिपळ्या घेतलेले वारकरी स्त्री-पुरुष आपल्या दुसऱ्या हातातील मोबाईलवरून गावाकडच्या मंडळींशी संपर्क साधत आहेत, असे चित्र आता वारीमध्ये सगळीकडे पाहायला मिळते.

## आधुनिक ज्ञानतीर्थ

देहू-आळंदीसह हजारो वारकरी ज्या तीर्थक्षेत्रांवर मुक्कामाला असतात अशी देशभरातील तीर्थक्षेत्रं ही 'ज्ञानतीर्थक्षेत्रं' व्हावीत अशी ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांची इच्छा आहे, त्या दृष्टीने त्यांनी आळंदी येथे काही उपक्रम राबवले आहेत.

केवळ भारतातच नव्हे तर आता जर्मनी, रशिया, अमेरिकेतील अभ्यासकांनाही या वारीची भुरळ पडली असून, संतसाहित्याचा अभ्यास करण्यासाठी, अनेक विदेशी अभ्यासक भारतात दाखल होत आहेत. आता गरज आहे ती आपणच आपल्या 'ग्लोबल' होत चाललेल्या वारीचं महत्त्व ओळखण्याची! ते जपण्याची!!

संपर्क: ०९८५०८८५९३६

# ।। समचरणीं विठ्ठल उभा ।।

**आपल्या संतश्रेष्ठांना पंढरीचा विठ्ठल अनेक रूपात भावला. त्यांनी विठुरायाचे, त्याच्या सगुण निर्गुण स्वरूपाचे वर्णन मनमोहकरीत्या करून ठेवले आहे.**

**जयंत साळगावकर**



एकनाथांनी विठ्ठलावर एक बहारदार रूपक केले आहे. ज्ञानेश्वरांनी विठुरायाला 'सर्व सुखाचे आगर' म्हटले. नाथ तोच भाव आपल्या शब्दांत असा व्यक्त करतात– *सकळ सुखाचें जें सुख । तेंचि सोलीव श्रीमुख ।। विठ्ठल विठ्ठलीं शोभा । मिरवितसे स्वयंभा ।।* सगुण दृश्यरूपातच विठ्ठलाचे साध्या डोळ्यांना न दिसणारे निर्गुण स्वरूप कसे सामावले आहे, ते नाथ स्पष्ट करतात. निर्गुणाचे सगुण रूप मिरवणाऱ्या विठ्ठलात त्यांनी सगळी सद्गुण वैशिष्ट्येच पाहिली. मी *तूंपणाचा शेवट । तोची मस्तकीं मुगुट ।।* मी आणि तू यातले द्वैत नष्ट झाले आणि ते अद्वैत विठ्ठलाच्या मस्तकी मुकुटाच्या रूपाने विराजमान झाले. *अधिष्ठान जें निर्मळ । तेंचि लल्लाट सोज्वळ ।।* विठुरायाचे जे निर्मळ अधिष्ठान आहे, त्याचे जे असामान्य, अद्वितीय असे स्थान तेच जणू काही त्याचे कपाळ! *श्रुति विवेक ये विवेका । तेची श्रवण ऐका ।।* वेद, उपनिषदे यातील विवेकी विचार हेच जणू काही विठ्ठलाचे कर्णयुगुल, दोन्ही कान. *जीव शिव एक ठसा । कुंडलें सर्वांग डोळसा ।।* त्या कानात कुंडले कुठली? तर जीव आणि शिव! *जे कां आदित्यीं तेज तेजाळें । तेंचि तया अंगी झाले डोळे ।।* अखिल विश्वाला प्रकाशाने न्हाऊ घालणाऱ्या सूर्याचे तेज हेच त्याचे डोळे. त्या डोळ्यात अंजन कशाचे? *चिच्छक्तीचें जाणणेपण । तेंचि नयनीचें अंजन ।।* आणि त्याचे धारदार तेजस्वी नाक कसे आहे? *शोभा शोभावी जें बिक । तेंचि मुखीचें नासिक ।। वदन म्हणिजे सुखसागर । तळपतील हरी ऐसे अधर ।।* त्याचे मुखकमल हे तर सुखाचा सागरच आहे. *सचित्पदाची जे माळा । माळा गुणें पडली गळा ।।* सत्, चित्त, या वैशिष्ट्याची माळ त्याच्या उरोभागी शोभत आहे. *कर्म कर्तव्य हें फळ । तेचि कर कटीं सरळ ।।* कर्म आणि कर्तव्य आचरल्यामुळे त्यामधून जी काही फलप्राप्ती होते तेच याचे दोन्ही हात आहेत. *कोहं सोहं मूस अटी । तेची आटीव बाहुवटीं ।।* मी कोण आहे? या प्रश्नाला मी ब्रह्म आहे, असे उत्तर देणारा श्रेष्ठ परमार्थ विचार हेच जणू याचे दोन्ही बाहू आहेत. *कवणे व्यक्ती नये रूपा । ह्यदयी पदक पहा पा ।।* आणि याच्या ह्दयावर विराजमान झालेले पदक ते काय आहे? ते अव्यक्त रूपाचे स्वरूप आहे. *नाभिका पूर्णानंदी । तेचि नाभी तया दोंदी ।।* पूर्णानंदाचे स्वरूप ती याची नाभी, बेंबी! *नि:शेष सारूनि अंबर । तो कासें पीतांबर ।।* अंबर म्हणजे वस्त्र आणि अंबर म्हणजे आकाश. सर्व ब्रह्मांड निराकाश करून त्याचेच पीतांबर हा नेसला आहे.

*महासिद्धि ज्या वांजटा । त्याची मेखळे जडल्या घंटा ।।* त्याच्या मेखलेवरील घंटा म्हणजे प्रत्यक्ष महासिद्धी आहेत. *गती चालविती गती । तेचि समचरण शोभती ।।* अखिल विश्वाची गती ज्या योगे अविरत चालू राहते, ते या ईश्वराच्या ईश्वराचे समचरण आहेत. *अहं सांडोनी अहंकार । तोचि चरणीं तोडर ।।* अहंभाव सोडलेला अहंकार म्हणजे काय ? पण तोच याच्या चरणाचा तोडर झाला आहे. *अर्था अर्थी जडली निकी । ते शोभती वाळे वाकी ।।* शब्दाच्या अर्थात जो अर्थ असतो तेच याचे वाळे आणि वाकी झाले आहेत. *शंक चक्र पद्म गदा । चारी पुरुषार्थ आयुधा ।।* चारी पुरुषार्थ म्हणजे याच्या हातातील शंख, चक्र, पद्म, गदा ही आयुधे आहेत. *शून्याशून्य पायातळीं । तेचि विट हे शोभली ।।* जिथे काहीच नाही, केवळ शून्य आहे ते याच्या पायापाशी वीट होऊन राहिले आहे. *दृश्य सारुनियां शोभा । समचरणीं विठ्ठल उभा ।।* दिसत तर काही नाही; पण प्रेमशोभा विलसत आहे. *चरणातळीं ऊर्ध्व रेखा । जाला जनार्दन एका ।।* समचरणावर विठ्ठल उभा आहे आणि या विठुरायाच्या पायाच्या तळव्यावर जी उभी रेघ आहे तेच स्वत: एकनाथ महाराज आहेत.

## परब्रह्म उभें वाळुवंटीं मायें ।

आषाढी एकादशी म्हणजे. शेकडो वर्षे चालत आलेल्या पंढरपूरच्या यात्रेचा परममंगल दिवस. पंढरीच्या रायाचे हे आकर्षण महाराष्ट्राच्या मातीने जिवाभावाने जपले–जोपासले आहे. मुळात श्री विठ्ठलदेव कर्नाटकातून पंढरपुरी आलेच का? तर म्हणे पुंडलिकाला भेटण्यासाठी. नामदेव महाराज सांगतात. *पुंडलिकाचे भेटीं आणि भींवरेचे तटीं । परब्रह्म उभें वाळुवंटी मायें ।।* हा विठुराया साधा दिसत असला तरी वास्तविक हे प्रस्थ बरेच मोठे आहे. *अगणित गुण, वर्णिती पुराणें । पंढरीचे राणे । ख्यातीं जगीं ।। अलक्ष भेटी, लक्षिताची नाहीं । पुंडलिकें काहीं । तप केले ।। युगें गेली अठ्ठावीस, ते अझुनी । उभा चक्रपाणी, राहिलीसी ।। वेद म्हणती नेति, पुराणें तें किती । भांबावल्या मती । म्हणे नामा ।।* साहजिकच या पंढरीचा थाट स्वर्गाहून कितीतरी अधिक आहे आणि तो तसा असणारच! *नामाचा गजर, गर्जे भीमातीर । महिमा साजे थोर तुज एका ।। रिद्धि सिद्धि दासी, अंगण झाडिती । उच्छिष्टें काढिती । युक्ति चारी ।। चारी वेद भाट, होऊनि गर्जती । सनकादिक गाती । कीर्ति तुझी ।। सुरवरांचे भार, अंगणी लोळती । चरणरज क्षिती । शिव वंदी ।। नामा म्हणे देव, ऐसा हो कृपाळू । करितो सांभाळू, अनाथांचा ।।* एरव्ही याचे दर्शन ऋषी, मुनी, तपस्वी साऱ्यांनाच दुर्लभ । पण पंढरीत मात्र तो हमखास सापडतोच. *अनंत हे कळा, अनंत हे लीळा । अनंत जयाला । वेद गाती ।। तोचि पांडुरंग, पंढरीचा राजा । धणी झाला वोजा । भावबळें ।। अनंत जयाच्या सेवा, बोजावणी । नामरुपी गुणीं। नामातीत ।। नामा म्हणे अंत, असेना जो कांहीं । सापडतो पाहीं । पंढरीये ।।* एकदा पंढरपुरी आपण त्याला भेटावयास गेलो की, हा भक्तवेडा पंढरीचा राणा प्रेमाचा इतका वर्षाव करील म्हणनू सांगू! *वाळवंटी उभा करें कुरवाळिल । जीवींचे पुसेल । जडभारी ।।* आपण फक्त एकच करायचे *हरुषें लोळणी , घालूं महाद्वारी । येईल समोरी । केशिराज ।।* म्हणून तर पंढरपुरी याला भेटण्यासाठी भक्तांची ही गर्दी होते. याने कोणाकोणाला आपल्या नादी लावले म्हणून सांगावे ! *वाळुवंटी उभे, पताकांचे भार । पाहोनि शंकर वेडावला ।। सूर्यचंद्रादिक, घालिती लोटांगण । करी प्रदक्षिणा । स्वयें गंगा ।। नामा म्हणे ऐसें, सांगतां बहुत । वेदशास्त्र ग्रंथ । ठकावले ।।* या पंढरपुराचे आणि पंढरीरायाचे माहात्म्य तुम्हाला किती म्हणून सांगणार? *एक एकादशी, होय पंढरीसी । सुकृताच्या रासी । ब्रह्मा नेणें ।।* नामदेवांनी विठ्ठल आणि पंढरपूर यांची थोरवी इतक्या तन्मतयेने गायिली आहे की 'देवाचिये द्वारी' नामदेवांनी सांगितलेले पांडुरंग माहात्म्य आपण चर्मचक्षूंनी वाचत असलो, देहाने पृथ्वीच्या पाठीवर कुठेही असलो, तरी मने मात्र पांडुरंगाच्या समचरणांवर क्षणभर, अगदी निमिषभर विसावण्यासाठी आसुसली आहेत. शरीराचे डोळे, शारीरिक नेत्र या मजकुरावरून फिरत असले तरी मनाचे डोळे हृदयात साठवून घेत आहेत त्या सावळ्या परब्रह्माचे सुंदर तें ध्यान !

## पंढरीची वारी

तुकोबा आपल्या कुळाचाराबद्दल किती दक्ष आहेत पाहा. ते सांगतात– *पंढरीची वारी, आहे माझे घरीं । आणीक न करीं । तीर्थव्रत ।। व्रत एकादशी, करीन उपवासी । गाइन अहर्निशीं । मुखीं नाम ।। नाम विठोबाचें, घेईन मी वाचे । बीज कल्पांतीचें । तुका म्हणे ।।* साहजिकच माझ्या मनाला आता केवळ ध्यास काय तो या पंढरीचाच. त्यामुळे कधी एकदा आषाढ येतो आणि मी आषाढी एकादशीला जातो असे मला होते. अहो, माझ्यासारखी अशी वारीची उत्कटता ज्यांना असते, ज्यांना पंढरीची पराकोटीची ओढ असते, त्यांची तो विठ्ठलही तेवढ्याच उत्कटतेने वाट पाहात असतो. *संपदा सोहळा, नावडे मनाला । लागला टकळा । पंढरीचा ।। जावें पंढरीसी, आवडी मनासी । कधीं एकादशी । आषाढी ये हें ।। तुका म्हणे ऐसें, आर्त ज्याचे मनीं । त्याची चक्रपाणी । वाट पाहे ।।* घरातल्यांपासून गावातल्यांपर्यंत सगळे म्हणतात की, मी संसाराबद्दल पार उदास झालो आहे. मला संपत्तीबद्दल, संसाराबद्दल काहीच मायामोह उरलेला नाही. ते म्हणतात ते खरेच आहे. मी खरोखरच सर्व ऐहिक गोष्टींचा त्याग केला आहे, पण तो करण्यामागे मी फायदाच पाहिला आहे. पंढरीची वारी केली तर मोक्षासारखा श्रेष्ठतम लाभ होतो. हा फायदा मी डोळ्याआड कसा करणार? मी त्याचा अनुभव घेतला आहे. पटले तर तुम्ही साऱ्यांनी तो अनुभव घ्या. *सुखें घेऊं जन्मांतरें । एक बरें इहलोकीं ।। पंढरीचे वारकरी । होतां थोरी जोडी रे ।। हें तो आलें अनुभवा । पाहावें जीवावरुनि ।। तुका म्हणे केला त्याग । सर्वसंग, म्हणवूनि ।।* ही भीमेच्या काठी काशीच वसली आहे. या भीमेत एकदा स्नान केले की, पुनर्जन्माची कटकट संपलीच म्हणून समजा. *भीमातीरवासी । तेथें निश्चयेंसी काशी ।। मुख्य मुक्तीचें माहेर । ऐसें जाणा पंढरपूर ।। घडे भींवरेशी स्नान । त्यासी पुन्हां नाही जन्म ।। भाव धरोनी नेटका । मोक्ष जवळी म्हणे तुका ।।* खरोखरच हा पुंडलिक सर्व भक्तांमध्ये खरा ठरला. जे भूत कोणालाच कोंडून ठेवता येत नव्हते, कोणाच्याच हाती लागत नव्हते, त्याला पुंडलिकाने विटेवर पार खिळवून ठेवले. *भूत नावरे कोणासी । पुंडलीकें खिळिलें त्यासी ।। समचरण असे विटे । कटीं कर उभे नीट ।। वाळुवंटीं नाचती संत । प्रेमामृतें डुल्लत ।। तुका म्हणे पुंडलिका । भक्तिबळें तूंचि निका ।।* तर अशा या भुताला भेटायला मी पंढरपुरी जाईन म्हणतो. मला तर मोक्षाचे घबाड मिळणारच आहे. पण घरच्यादारच्यांच्या सुखासाठीही मी त्याला साकडे घालणार आहे. *विठ्ठल सोयरा, सज्जन विसांवा । जाईन त्याच्या गांवा । भेटावया ।। सीण भाग त्यासी, सांगेन आपुला । तो माझा बापुला । सर्व जाणे ।। माय माउलिया, बंधुवर्गा जाणा । भाकीन करुणा । सकळिकांसी ।। संत महंत सिद्ध, महानुभाव मुनि । जीवभाव जाऊनि । सांगेन त्यां ।। माझिये माहेरीं, सुखा काय उणें । न लगे येणें जाणें । तुका म्हणे ।।* माझ्याबरोबर तुम्हीही चला. चंद्रभागेचे नुसते दर्शन घेतले ना, तरी सगळ्या तीर्थस्थानी स्नान केल्याचे पुण्य घडते, फळ मिळते. एका पुंडलिकाचे दर्शन घेणे हे सर्व संतांना भेटण्यासारखे आहे आणि त्या विटेवरच्या लबाडाचे दर्शन घेतले ना की, कसे जन्माचे सार्थक होते, धन्य धन्य वाटते. मग काय चलणार ना पंढरीच्या वारीला? अहो, शरीराने नाही, तर निदान मनाने तरी..

**(आभार: जयराज साळगावकर)**



(पहाटे ४ वाजता) मंदिर उघडले जाते... त्यावेळी कानटोपी, अंगावर शाल आणि शेला या निद्रा पोशाखातील विठ्ठल.



(पहाटे ४.१० वाजता) काकड आरती



(पहाटे ४.२५ वाजता) महाअभिषेक पूर्वतयारी

# ॥ श्री विठ्ठलाचे राजोपचार ॥

**भूतलावरील समस्त प्राणिमात्रांना नैसर्गिक दिनचर्या क्रमप्राप्त आहे. मग तो मानव असो की, प्राणी त्याला नित्यकर्म चुकत नाही. त्याप्रमाणे मानव प्रातर्विधीपासून शयनापावेतो नित्यकर्म करत असतो. ज्याच्या आशेवर आणि विश्वासावर मानव चालतो, आश्वस्त होऊन जीवन व्यतीत करतो; त्या देवाचे निर्गुण निराकार आणि सगूण साकार रूपातही तो त्याची आराधना करतो. 'यथा देहे तथा देवे' या न्यायाने सगूण साकार भगवंताचीही नित्य अर्चना आणि नित्य दिनक्रम मानवाकडून चालवला जातो तो त्यामुळेच.**

**सुनील उंबरे**

हिंदू धर्मात तर परमेश्वराचे नित्य व्यवहाराचे उपचार सर्वसामान्य मानवाप्रमाणे न होता त्याचे राजोपचार म्हणूनच संपन्न होतात. कारण परमेश्वर म्हणजे राजामहाराजाहून वरचढ आहे. तो सर्वश्रेष्ठ आहे. तो परमपिता आहे. तोच पालनकर्ता आहे. तोच संरक्षक आहे. '*मिया बोलविल्या वेदु बोले। मिया चालविल्या सूर्यु चाले। मिया हलविल्या पानु हले।*' असा तो कर्तुम अकर्तुम शक्ती आहे. त्यामुळे त्याचे नित्योपचार एखाद्या महाराजांच्या श्रेष्ठतेने संपन्न होतात.

पंढरीश परमात्मा पांडुरंग तर बळिवंत आहे. तो साऱ्या देवांचा देव आहे. देवाधिदेव आहे. *बळिया माझा पंढरीराव। जो या देवांचाही देव।।* असे संतांनी त्याचे महत्त्व वर्णिले आहे. कारण तो हा देवांचाही देव । *काय कळिकाळाचा भेव।।* अशा त्याचा आश्रय घेतल्यावर कुणाचीही भीती नाही अगदी काळाचीही. म्हणून तो सर्वश्रेष्ठ आहे. त्याशिवाय भगवान शंकरसुद्धा मनोमन सदोदित योगियांच्या *ध्याना नये अनुमाना। कैलासीचा राणा ध्यास त्यासी।।* याप्रमाणे ज्याचे ध्यान करतात, त्याचे स्मरण, भजन, चिंतन करतात. *रूप पाहता तरि डोळसु। सुंदर पाहता गोपवेशु। महिमा वर्णिता महेशु। जेणेमस्तकी वंदिला।* याप्रमाणे नमस्कार करतात, ज्याची पूजा करतात, ज्याच्या भेटीच्या इच्छेने पंढरीकडे येतात. याप्रमाणेच प्रभू रामानेही विठोबाचे पूजन केले आहे. मग त्याचे उपचार मोठ्या थाटात, डौलाने आणि वैभवाने संपन्न झाले पाहिजेत म्हणून परमात्मा विठोबाचे भूवैकुंठ पंढरीतील मंदिरात ते



(पहाटे ४.३० वाजता)
दहीदुधाचा महाअभिषेक



(पहाटे ४.४० वा.)
अभिषेकानंतर विठ्ठलाला पोशाख करताना



( रात्री ११ वाजता)
शेज आरती

तेवढ्या वैभवाने संपन्न केले जातात. ज्याला धर्मशास्त्र आणि आयुर्वेदाचीही जोड घालण्यात आली आहे.

पूर्वपरंपरेने चालत आलेल्या नित्योपचारात कालमानाने आलेले शैथिल्य आणि विस्कळीतपणा १७व्या शतकातील संत श्री प्रल्हाद महाराज बडवे यांनी दूर केला. तर १८व्या शतकात धर्मसिंधूकार बाबा पाद्धे यांनीही त्याबाबत मोठे काम करून आजचा रूढ उपचार चालू आहे.

### साडेतीन वाजताचा मुहूर्त

ब्राह्ममुहुर्तावर पहाटे साडेतीन वाजता मुख्योपाद्धे आणि आद्य सेवकाकडून त्याचा प्रारंभ होतो. (मंदिर शासनाच्या ताब्यात जाण्यापूर्वी बडवे आणि सेवाधारी सेवा बजावत होते. आता समितीचे सेवक करतात) भगवंतद्वारावरच्या गणपती पूजनाने दिवसाचे स्वस्तिवाचन करून, प्रथम १६ खांबी मंडपाचे द्वार उघडण्यात येते. तद्‌नंतर सेवक देवाच्या शेजघरात जाऊन वस्त्र सावरतात. त्याला हलवतात. नंतर गर्भागारात येऊन देवाला निद्रेतून उठवले जाते. 'उत्तिष्ठ ब्रह्मणस्पते देवन्तस्त्वेमहे...' या वेदमंत्रांनी आळवणी करण्यात येते. नंतर देवाचे अंगावरील हार आणि पायावरील तुळसीपत्रे काढून पादप्रक्षालन आणि मुखप्रक्षालन करण्यात येते. जसा एखादा मानव उठल्याबरोबर पहिल्यांदा चूळ भरतो तसे. नंतर कान्हया हरिदास रचित *अनुपम्य नगर पंढरपूर भिमा मनोहर। संतांचे माहेर अव्यक्त आदिमूर्ती।।* या आरतीने काकडा करण्यात येतो. काकडारती वेळी ढोल, धमामे, नगारा, शिंगे, कर्णे, मर्फे आदी मंगलवाद्ये वाजविली जातात. सोबतच बाहेर जमलेले भक्तजनांचाही

*उठा पांडुरंगा आता दर्शन द्या सकळा।*
*झाला अरुणोदय सरली निद्रेची वेळा।।*
*उठा पांडुरंगा प्रभात समयो पातला।*
*वैष्णवांचा मेळा गरूडपारी दाटला।।*

## विठुरायाचा नैवेद्य



**सकाळी १०.४५ वा. माध्यन्हपूजा प्रारंभ होते. ज्यात पादप्रक्षालन, गंधलेपन करून हारतुरे वाहून पुरण, साखरभात, श्रीखंडपुरी, खीर, बेसनलाडू पंचपक्वान्नाचा नैवेद्य देवाला अर्पण करण्यात येतो. धूपदीप समर्पून ही पंचोपचार पूजा संपन्न होते.**



**विठुरायाला उन्हाळ्यात चंदनाची उटी लावतात.**



**रंगपंचमीच्या दिवशी विठुरायाला पांढरे वस्त्र परिधान केले जाते.**

सायंकाळी सायंपूजा केली जाते. सायंपूजा म्हणजे धूपारती. यावेळी केवळ मुख, पाद प्रक्षालन करून, मुखाला अत्तर लावून गंधाक्षत केली जाते. हारतुरे घालून धूपदीप आणि सायभाताचा नैवेद्य देवाला दाखवतात. शेवटी *नामदेवराय रचित युगे अठ्ठाविस विटेवरि उभा।* ही आरती म्हणून आरती करण्यात येते. या वेळी सोळखांबी मंडपात भक्तगणांची गर्दी असते.

रात्रौ ११ ते १२.३० च्या सुमारास शयनारती (शेज) करण्यात येते. त्या वेळी देवाची वस्त्रे बदलून शयनासाठीचे कपडे परिधान केले जातात. ज्यात कटीस धोतर, अंगावर केवळ उपरणे असते. त्यावर शाल पांघरून मस्तकावर दिवसभर असणारा टोप काढून पागोटे बांधण्यात येते. कानाला कानपट्टी बांधून गंधाक्षत करतात. हारतुरे वाहून आरती करतात. थंडीत गरम रजईही देवाला गुंडाळतात. शयनारती वेळी देवाच्या सिंहासनापासून, शयनघरापावेतो केशरमिश्रित जलाचा सडा घालून; त्यावर सुंदर नक्षीदार रांगोळी रेखून, त्यावर शुभचिन्हांची पाऊलघडी अंथरतात. ज्यावरून देव शयनघरी जातात.

यानंतर शेजघरातील उपचार म्हणून सहस्त्र तुलसीदलाचे अर्चन आणि पाच आरत्यांचा उपचार करण्यात येतो. ज्यात आता शयनास जाणाऱ्या भगवंताला १००० नामाच्या मंत्रांनी तुळसीदले वाहून, लाडू, दुधाचा नैवेद्य अर्पून; त्रयोदशगुणी विडे अर्पितात. *हरि चला मंदिरा ऐशा म्हणती गोपिका। तसेच काय तुमचा महिमा वर्णावा किती।* आदी ५ विविध आरत्या गात शयनारती संपते.

नंतर पुजाऱ्यांकडून गर्भागार स्वच्छ धुऊन देवास शयनसमयी किडेडासांचा उपद्रव होऊ नये म्हणून धूप घालण्यात येतो. सुखनिद्रेची प्रार्थना करण्यात येते. केशर, चंदन मिश्रित जल सिंहासनापासून शयनघरापावेतो आणि पुढे दारापावेतो समार्जन करून; देवद्वार बंद करण्यात येते. ऋतुकालपरत्वे धूपारती वा शयनारती आदीच्या वेळेत बदल होतो. तसेच वस्त्रप्रावरनेही बदलली जातात. जसे थंडीत सकाळी नित्यपूजेनंतर घटीभर कानपट्टी बांधतात. रात्रौ रजई पांघरतात. तर उन्हाळ्यात चंदनाची उटी करण्यात येते. नैवेद्यात आमरस, बासुंदी, श्रीखंड असा बदल होतो.

प्रत्येक पूजेवेळी उक्त वेदमंत्र, आरत्या स्तोत्रे म्हटले जाते. सकाळी बाळरूपातील दिसणारा परमात्मा घडी घडी रूप बदलत तरुण, प्रौढ होत रात्रौ एखाद्या वयोवृद्धाप्रमाणे भासतो.

*महाद्वारी वैष्णवजन।*
*आले पूजा सामुग्री घेवून।*
*द्यावे यांसी दर्शन। बंदिजन गर्जती।।*

या आणि अशा अनेक भूपाळ्या, मंगलगानाचा गजर चालू असतो. देवाच्या विविध सेवांसाठी पूजारी, डिंगरे, बेणारे, परिचारक, हरिदास, डांगे, दिवटे अशा सात सेवाधाऱ्यांची स्वतंत्र वेगवेगळ्या कामी योजना करण्यात आली होती. आता ही सेवा समितीचे पूजारी करतात. कारण पुरुषसूक्त स्तवनाने देव संतोषतो. अशी पूजा पाहणे सुखासारखे असते. दही, दूध, मध, साखर, तूप आदी पंचामृताने स्नान घालून, मुखाला लोणी धरून लोण्याची आरती केली जाते. त्यानंतर केशरयुक्त जलाचा अभिषेक केला जातो. नंतर सुंदर उंची वस्त्रे नेसवून, हारतुरे फुले अर्पून पुन्हा 'शरणांगत तव शरणा' ही प्रल्हाद महाराज बडवे रचित आरती म्हणून प्रात:स्नानादिची पूजा संपते आणि भगवंत भक्तभेटीसाठी तयार होतो.

## पोशाख पूजा

दिवसभर वापरून मलीन झालेली वस्त्रे बदलण्यासाठी दुपारी साडेचार वाजता पोशाख पूजा केली जाते. ज्यात विठोबाची सर्व वस्त्रे बदलून स्वच्छ वस्त्रे देवाला परिधान करतात. सणासुदीला उंची भरजरी रेशमी वस्त्रे वापरून, त्यावर खजिन्यातील रत्नजडित सुवर्णालंकार देवाला घालण्यात येतात. पाद, मुखप्रक्षालन करून, हार, फुले व तुळशी वाहून; लाडवाचा नैवेद्य अर्पितात.

**लेखक, प्रतिनिधी दै. सामना (पंढरपूर). संपर्क: ०९९२१११४००**
**(सर्व छायाचित्रे : सतीश चव्हाण)**




**'ग्यानबा-तुकाराम' हा मराठी लोकमानसाच्या सहिष्णुतेचा मूलमंत्र आहे आणि 'पंढरीची वारी' महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील उदारमतवादाची शुभ्र पताका आहे. महाराष्ट्राच्या लोकजीवनाचा विचार करता लक्षात येते की, भक्तिसंप्रदाय आणि प्रबोधनाच्या चळवळी या हातात हात घालून प्रवास करतात. या प्रवासाची एक समृद्ध पाऊलवाट म्हणजे पंढरीची वारी. या वारीचे ताणेबाणे महाराष्ट्राच्या प्राचीन, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक जीवनाशी एकजीव झाले आहेत.**

छाया : सुनील उंबरे

# ॥ एक समृद्ध पाऊलवाट ॥

**डॉ. प्रमोद मुनघाटे**

महाराष्ट्राच्या लोकसमुहाचे जनमानस ज्या सामूहिक शहाणपणावर अधिष्ठित आहे, त्याचे एक दृश्य रूप म्हणजे पंढरीची वारी आहे. वर्ण आणि जातिव्यवस्था हे आपल्या संस्कृतीचे कटू वास्तव आहे. जिवंत माणसाला केवळ त्याच्या जातीवरून अस्पृश्य ठरवणे आणि सामाजिक जीवनात त्याला सर्वस्वी अपमानित वागणूक देणे, हा मानवतेला काळिमा फासणारा अक्षम्य अपराध आहे. या सामाजिक विकृतीला संपवण्याचे प्रयत्न त्या त्या काळातील संतमहात्म्यांनी केले आहेत. त्याचीच एक फलश्रुती म्हणजे मराठीतील संत ज्ञानेश्वर ते संत तुकाराम यांचे संतसाहित्य होय. साहित्य हे शब्दबद्ध असते. जोपर्यंत ते प्रत्यक्ष जीवनाला सामोरे जात नाही, तोपर्यंत ते निष्फळ असते. संतसाहित्याची सामाजिक फलश्रुती कोणती असा प्रश्न कोणी केला, तर जुन्या पिढीतील थोर मराठी विचारवंत प्रा. गं. बा. सरदार यांनी उत्तर देऊन ठेवले आहे, अठरापगड जातींमधील बंधुभाव. या बंधुभावाचे दर्शनी रूप म्हणजेच, पंढरीची वारी.!

### सांस्कृतिक जीवनाचे महत्त्व

बारा बलुतेदार किंवा अठरापगड जाती ह्यांच्यातील दुरावा नष्ट करण्याचा वारकरी संप्रदायाचा एक प्रयत्न म्हणून आपण पंढरीच्या वारीकडे बघितले पाहिजे. वारी ही आपल्या सांस्कृतिक जीवनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. हजारो लाखो सामान्य माणसे नित्यनेमाने पायी वारी करतात, याकडे केवळ धार्मिक दृष्टीने बघू नये.

समाजातील सौहार्दाचा तो प्रयत्न आहे. हजारो लोक प्रत्यक्षात वारीत सहभागी होत असले तरी महाराष्ट्राच्या दहा कोटी लोकांच्या भावनांशी ती जोडली गेली आहे. संतांनी निर्माण केलेली अप्रत्यक्ष चळवळच आहे. समतेचे आणि सद्भावनेचे मूल्य रुजवण्याचा प्रयत्न करणारी ही चळवळ, कुणा एका प्रेषिताच्या आज्ञेने उभी झाली नाही.

महाराष्ट्रातील सामान्यजनांची ती कर्मठ पुरोहितशाहीविरुद्धची चळवळ आहे. वेगवेगळ्या संतांनी एकत्र येऊन, भक्तीच्या परिभाषेत जातिनिर्मूलनासाठी केलेले ते आंदोलन आहे.

वारकरी पंथाच्या एकात्मतेचे वर्णन बहिणाबाईंनी कसे केले आहे ते बघा –

*संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।*
*ज्ञानदेवे घातला पाया । उभारले देवालया ।।*
*नामा तयाचा किंकर । तेणे रचिले आवार ।।*
*जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ।।*
*तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।*
*बहेणी फडकती ध्वजा । निरोपण केले बोजा ।।*

### जगाच्या इतिहासात नोंद

मध्ययुगीन महाराष्ट्रात घडत असलेल्या या सामाजिक प्रबोधनाच्या चळवळीची नोंद जगाच्या इतिहासात अनन्यसाधारण अशीच आहे. आषाढी, कार्तिकी, चैत्री व माघी एकादशीला विठ्ठलाच्या चरणी लीन होण्यासाठी पंढरीची वारी करणे, हे वारकरी संप्रदायाने स्वीकारलेल्या भक्तिचे मुख्य तत्त्व आहे. वारी करतो तो वारकरी. मराठीत वारकरी म्हणजे पंढरीचाच वारकरी इतके ते सामान्यरूप झालेले आहे. वैदिक परंपरेतील यज्ञयाग इत्यादींचा सोस वारकऱ्यांच्या आचारपद्धतीत नाही. उलट ज्ञानेश्वर-तुकाराम संतांनी त्या कर्मकांडावर भरपूर प्रहार केले आहेत. म्हणून गळ्यात तुळशीची माळ घातली की, झाला तो वारकरी. हे सोपेपण बडिवार माजविलेल्या व्रतवैकल्यांचे निरर्थकपण ठसवून देणारे जसे आहे, तसे तत्कालीन सामान्य शेतकरी, कामकरी व बाराबलुतेदारांच्या अर्थकारणाशीही संबंधित आहे.

### व्यापक कुटुंबाची कल्पना

संत नामदेवांनी पंढरीच्या वारीचे महत्त्व सांगताना म्हटले आहे,

*माझे माहेर पंढरी । आहे भीवरेचे तीरी ।।*
*बाप आणि आई । माझी विठ्ठल रखुमाई ।।*
*पुंडलिक बंधू आहे । त्याची ख्याती सांगू काय ।।*
*माझी बहिण चंद्रभागा । करीतसे पापभंगा ।।*
*एका जनार्दनी शरण । करी माहेरची आठवण ।।*

संत नामदेवांची कुटुंबाची कल्पना किती व्यापक आहे, हे या अभंगातून सूचित होते. सततचे दुष्काळ, अवर्षणे आणि दारिद्र्य या भौतिक अभावग्रास्ततेला तोंड देताना, वारकरी अशा उदात्त भावनेने; आध्यात्मिक भावनेचा उत्कट अनुभव घेतात. जडवादी बौद्धिक परंपरेने या भावनेचा पलायनवाद आणि अफूची गोळी अशा शब्दात कितीही निषेध केला तरी, एकोणिसाव्या शतकातील मार्क्सवादी तत्त्वज्ञानाच्या चष्म्यातून बाराव्या-तेराव्या शतकातील संतांच्या सामान्यजनांप्रती असलेल्या करुणेचे; मूल्यमापन करू शकत नाही. संताना सामान्यजनांना बंधुभावाची व मानवतावादाची शिकवण द्यायची होती, त्याकरिता स्वर्ग-नरक, पाप-पुण्य आणि मोक्ष-मुक्ती या परिभाषेशिवाय पर्याय नव्हता. म्हणून संतांचे काव्य केवळ पोथीबंद राहिले नाही. समता आणि बंधुता या मूल्यांचा जागर केवळ शब्दांपुरता मर्यादित राहिला नाही. बऱ्याच प्रमाणात तो वारकऱ्यांच्या माध्यमातून सामान्यांच्या आचरणातही आला आहे.



आम्ही हरिचे सवंगडे ।

छाया : सुनील उंबरे

### सामाजिक सौहार्द्रतेचा मानबिंदू

पंढरीची वारी केवळ वारकऱ्यांच्या विठ्ठलभेटीचा महिमा नाही, तो समग्र महाराष्ट्राच्या सामान्य माणसाच्या सामाजिक सौहार्द्रतेचा मानबिंदू आहे. विठ्ठल हे सामान्य माणसाच्या अलौकिक रूपाचे कसे प्रतीक आहे, ते अनेक संशोधकांनी मांडले आहे. विठ्ठलाचे रूप कोणत्याही वैदिक देवतेपेक्षा अधिक देशी आहे. कडेवर हात ठेवलेली, स्थिर भावमुद्रेतून सामर्थ्यशाली अहिंसा सूचित करणारी पंढरपुरातील विठ्ठलमूर्ती; हा शिल्पाचा एक सुंदर नमुना आहे, असे डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी म्हटले आहे. (टीकास्वयंवर) इतिहासाचार्य राजवाडे यांनी 'विष्टल'पासून 'विठ्ठल' शब्दाची उत्पत्ती सांगतात. विष्टल म्हणजे दूर, एकीकडे रानावनात असलेली जागा, स्थळ व विठ्ठलदेव म्हणजे दूर, एकीकडे रानावनात असणारा देव असा अनुबंध; डॉ. दिलीप धोंडगे आपल्या 'वारकरी शैली' या ग्रंथात उलगडून दाखवतात. थोडक्यात उपलब्ध संशोधनावरून विठ्ठल हा द्रविड-अनार्य, बहुजनांचा, गुराख्यांचा देव आहे असे ढोबळमानाने म्हणता येईल. वारीत सहभागी उपेक्षित बहुजनाच्या सहभागाशी ते सुसंगतही वाटते.

### चंद्रभागेचे महत्त्व

आपल्याकडे तीर्थक्षेत्राला फार महत्त्व आहे. पण पंढरपूरच्या चंद्रभागेतील स्नान हे निव्वळ पापक्षालनासाठी केलेले कर्मकांड नाही. वारकरी एकेकट्याने स्नान करीत नाही. ते सर्व कुटुंबाने मिळून करायचे असते आणि कुटुंबातील सर्वात वयोवृद्ध व्यक्तीला इतर लोक आधार देऊन आंघोळ घालतात. जणू काही भक्त पुंडलिकाने आपल्या आईवडिलांची सेवा केली होती, तसे वृद्ध-अपंग माणसाला सोबत घेऊन सामूहिक स्नान करणे, हा त्या ठिकाणी सामूहिक सद्भावनेचा जागर करण्याचा एक भाग बनून जातो. विशेषतः आधुनिक व्यक्तिवादी जीवनाच्या पार्श्वभूमीवर, सामान्य वारकरी माणसाच्या जगण्याचे हे एक उदात्त व्यापक परिमाण आहे; असे मला वाटते. कारण केवळ आपल्या कुटुंबातीलच नव्हे तर एखादा वयोवृद्ध वारकरी एकट्याने आला असेल तर सर्वजण मिळून त्याचीही आंघोळ घालून देतात.

एका अलौकिक आनंदाचा अनुभव वारकरी स्वतःपुरता कधी घेत नाही तर ते सोबतच्या इतरांनाही सामील करून घेतात. किंबहुना सामूहिकता हेच वारीचे खरे वैशिष्ट्य आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. अवडंबरांचे प्राधान्य असलेल्या समुहातील मानवतावादाची अभिव्यक्ती याहून आणखी कोणती असू शकते.

संपर्क : ०७७०९०१२०७८

**अतुल भोसले,** (अध्यक्ष, विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती)

# ।। भक्तांसाठी सोयीसुविधा ।।

**आषाढी एकादशीला प्रचंड मोठ्या संख्येने येणाऱ्या भाविकांच दर्शन सुखकर व्हावे, यासाठी मंदिर समिती आणि प्रशासनाला कसरत करावी लागते. यंदाच्या आषाढी वारीसाठी मंदिर समितीने भक्तांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अनेक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला आहे.**

माझी मंदिर समितीच्या अध्यक्षपदी निवड होऊन एक वर्षाचा कालावधी लोटला आहे. या कालावधीत आम्ही वारकऱ्यांच्या दृष्टीने सगळ्यात मोठी समस्या काय असू शकते याचा अभ्यास केला तेव्हा लक्षात आले की, दर्शनरांग हा सगळ्यात महत्त्वाचा विषय आहे. लाखोंच्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात त्यामुळे मोठमोठ्या दर्शनरांगा लावाव्या लागतात. त्यात वृद्ध भाविक, गरोदर माताभगिनी यांना त्रास सहन करावा लागतो. म्हणून वारीच्या निमित्ताने आणि इतर वेळी व्यवस्थापन कसे करावे यासाठी, ट्रायलो एजन्सीज नावाच्या शासनमान्य कंपनीच्या साहाय्याने याचा अभ्यास केला. देशातील प्रमुख देवस्थानांचा अभ्यास केल्यावर असे लक्षात आले की, त्या ठिकाणी टोकन पद्धतीने दर्शन दिले जाते. साधारण एका दिवसात किती भक्त दर्शन घेऊ शकतात. त्यानुसार टोकन देऊन ही अडचण सोडवता येईल. टोकनवर किती वाजता दर्शन मिळेल याची वेळ दिलेली असते जेणेकरून भक्तांना वेळेचे नियोजन करून फिरण्यासाठी, खरेदीसाठी वेळ देता येईल. दर्शनही सुखकर होईल. गर्दीची ठिकाणे निवडून ४० ठिकाणी टोकन देण्याची व्यवस्था करण्यात येईल. वारीच्या दिवशी या टोकन योजनेची प्रयोगिक तत्त्वावर सुरुवात करण्यात येईल. वारीनंतर सर्व तयारीनिशी ही योजना अमलात आणली जाईल .




### आदर्श दिंडीस पुरस्कार

हरितवारी व्हावी म्हणून दिंड्यांना प्रोहत्सान देण्यासाठी या वर्षीपासून प्लास्टिकमुक्त, स्वच्छता तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने चांगले नियोजन करणाऱ्या दिंड्यांना पारितोषिक देण्याचा निर्णय मंदिर समितीने घेतला आहे. पहिल्या क्रमांकासाठी १ लाख रुपये, दुसऱ्या क्रमांकासाठी ७५ हजार आणि तिसऱ्या क्रमांकासाठी ५० हजार असे याचे स्वरूप असणार आहे. वारकऱ्यांचा प्रवास सुखकर व्हावा आणि स्थानिक नागरिकांना त्यांचा त्रास होऊ नये, हा त्यामागचा उद्देश आहे.

### भक्तांसाठी उपलब्ध सुविधा थेट दर्शन

आषाढीच्या दिवशी एवढी गर्दी असते की, दर्शन घेण्यासाठी खूप वेळ लागतो. म्हणून यंदा जिथे भाविकांची सर्वात जास्त गर्दी असते अशी १५ ठिकाणे आम्ही शोधून काढली आहेत त्या ठिकाणी १५ एलइडी स्क्रीन लावले जाणार आहेत. त्या माध्यमातून भक्तांना थेट दर्शन घेता येईल.

### प्रशिक्षित स्वयंसेवकांची फौज

वारीच्या दरम्यान प्रशासनाला मदत करण्यासाठी आम्ही आवाहन केले आहे. सांगायला आनंद होतो की, त्यातून १ हजार स्वयंसेवक पुढे आले आणि अजूनही अर्ज येत आहेत. या स्वयंसेवकांना रीतसर प्रशिक्षण देण्यात येणार आहे. हे स्वयंसेवक आठ दिवस पंढरपुरात राहून सेवा देणार आहेत. स्वयंसेवक गर्दीत ओळखू यावेत, यासाठी खास टी-शर्ट तयार केले आहेत. एखाद्या भाविकाला आरोग्यासंदर्भात किंवा अन्य कोणतीही समस्या आली तर ते नियंत्रण कक्षाला कळवून त्वरित मदत उपलब्ध करून देतील.

### विमा

मंदिर समितीने २५ वारकऱ्यांपर्यंतचा विमा काढला आहे. समजा एखादा अपघात झाला तर २५ वारकऱ्यांना २ लाखापर्यंत भरपाई मिळेल, हातापायाला दुखापत झाली असेल तर १ लाख रुपयांची भरपाई आणि काही कारणाने आजारी पडले तर २५ हजार रुपये मिळतील, असे विम्याचे स्वरूप आहे.

### स्वच्छतेस प्राधान्य

आतील आणि बाहेरचा प्रदक्षिणा मार्ग, मंदिर परिसर, चंद्रभागेचा तट यांची कायमस्वरूपी स्वच्छता करण्यासाठी शिर्डी संस्थान, तिरुपती बालाजी मंदिर, वैष्णव देवी मंदिर या मंदिर समित्यांशी चर्चा करून ई-टेंडरिंगचा अभ्यास केला. बीएसए नावाच्या कंपनीला स्वच्छतेची निविदा देण्यात आली. त्यानुसार १०२ लोक एक वर्षासाठी, दिवस-रात्र स्वच्छतेचे काम करणार अशी व्यवस्था केली आहे.

### नवीन पिढीला जोडण्याचा प्रयत्न

मंदिर समितीने एका ॲपचे लोकार्पण केले आहे. तसेच संकेतस्थळाच्या माध्यमातून देशविदेशातील भक्तांना घरबसल्या ऑनलाइन दर्शन, देणगी आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. येणाऱ्या काळात आणखी सुधारणा करण्याचा आमचा मानस आहे.

### वॉटर एटीएम

भक्तांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी 'वॉटर एटीएम' ही संकल्पना राबवण्यात आली आहे. पाच प्रमुख रस्त्यांवर वॉटर एटीएम उभी करण्यात आली आहेत.

### नवीन सुसज्ज भक्त निवास

पंढरपुरात येणाऱ्या भक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. प्रत्येक भक्ताला कमीत कमी दरात दर्जेदार राहण्याची सुविधा मिळावी, या हेतूने भक्त निवास उभारण्यात येत आहे. एका वेळेस १२०० लोक राहू शकतील अशी व्यवस्था असेल. या इमारतीत एक व्यावसायिक भाग देखील करण्यात आला आहे. ४७ गाळे व्यावसायिकांना भाडे तत्त्वावर देऊन त्यातून मिळालेल्या उत्पन्नातून भक्त निवासाची देखभाल व दुरुस्ती करता येईल.

### पंढरपूर स्मार्ट सिटी

कॅनडा सरकार आणि भारत सरकार यांच्यातील १५० वर्षांची मैत्री साजरी करण्यासाठी कॅनडा सरकारकडे भारतातील एक तीर्थक्षेत्र किंवा शहर स्मार्ट सिटी म्हणून विकसित करण्याचा प्रस्ताव होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंढरपूरचे नाव सुचवले होते. कॅनडा सरकारने हा प्रस्ताव स्वीकारला आणि कॅनडा सरकारचे काऊन्सिल जनरल जॉर्डन रिव्हज यांनी पंढरपूरचा दौरा केला आणि लागेल ते सहकार्य करण्याचे सुतोवाच केले. वारकऱ्यांना केंद्रबिंदू ठेवून विकास करण्याचा विचार पुढील काळात केला जाणार आहे. या आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुरात येणाऱ्या प्रत्येक भाविकांचे दर्शन सुखकर व्हावे, यासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती प्रयत्नशील आहे.

**शब्दांकन: सीमा शेळगावकर**
आंतरवासिता, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

**डॉ. राजेंद्र भोसले** (जिल्हाधिकारी, सोलापूर)

विठ्ठल रुक्मिणी देवस्थानाने वारीच्या रूपाने वारकऱ्यांची सेवा करण्याची संधी प्रशासनाला दिली आहे असे मी मानतो. त्यामुळे सेवाभावी वृत्तीने आम्ही काम करणार आहोत. जिल्ह्यात साधारणतः नऊ मानाच्या पालख्या, दोन हजार दिंड्या, बारा लाख भाविक दरवर्षी येत असतात. वारकरी हा केंद्रबिंदू मानून नियोजन केले आहे. ५ जुलैला देहू व ६ जुलैला आळंदी येथून पालख्या पंढरपूरकडे निघतात. १७ जुलैला सोलापूरकडे निघतात. १७ जुलैला ज्ञानेश्वर महाराजांची व १८ जुलैला तुकाराम महाराजांची पालखी अकलूज येथे येत असते. त्यानंतर गजानन महाराजांची पालखी येते असा क्रम असतो. या दृष्टीने नियोजन करण्यासाठी पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पालखी विश्वस्तांची बैठक घेण्यात आली. प्रत्येक पालखीसाठी एक उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी नेमण्यात यावा, असा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. हा अधिकारी पालखीच्या आगमनापासून ते प्रस्थानापर्यंत प्रशासन आणि वारकरी यांच्यातील समन्वयक म्हणून कार्य करेल.

**लाखो भाविक कुठल्याही निमंत्रणाशिवाय स्वयंस्फूर्तीने विठुरायाचे दर्शन घेण्यासाठी आषाढी वारीला पंढरपुरात येतात. वारीचा प्रवास, आठ दिवस पंढरपूरचा मुक्काम, भजन, कीर्तन हा प्रत्यक्ष अनुपम सोहळाच असतो. पंढरपूर वारीचा महत्त्वाचा टप्पा सोलापूर जिल्ह्यात असतो. यासाठी जिल्हा प्रशासनाला अचूक नियोजन व समन्वय साधावे लागते.**



## खडीमुक्त प्रदक्षिणा मार्ग


प्रदक्षिणा मार्गावर पडलेल्या कचखडीमुळे वारकऱ्यांना चालताना त्रास सहन करावा लागायचा म्हणून हा मार्ग कचखडीमुक्त करण्यासाठी प्रशासन लोकसहभागातून स्वच्छता करणार आहे. अधिकारी स्वतः प्रदक्षिणा मार्गावर अनवाणी पायाने चालून खातरजमा करतील.

## आपत्कालीन मदत केंद्र

मानाच्या पालख्यांचे ३५ मुक्काम सोलापूरला होतात. ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचा मुक्काम नातेपोते, माळशीरस, बंडीशेगाव असा होतो तर तुकाराम महाराजांची पालखी बंडीशेगाव, बोरगाव, भाकरे आणि पंढरपूर अशी मुक्कामी थांबते. या प्रवासादरम्यान पालख्यांना मदत करण्यासाठी दोन – तीन वर्षांपासून आपत्कालीन मदत केंद्राची व्यवस्था करण्यात येत आहे. या वर्षी चंद्रभागा तट, मंदिर परिसर अशा २१ गर्दीच्या ठिकाणांवर तत्काळ आपत्कालीन केंद्र स्थापन केली आहेत.

## मुक्कामाच्या ठिकाणी सोयीसुविधा

पंढरपुरात आल्यावर पालख्यांच्या मुक्कामासाठी ६५ एकर जमीन देण्यात आली आहे. या संपूर्ण जागेचे मुरुमीकरण करण्यात आले आहे. 'एक गुंठा एक प्लॉट' या पद्धतीने ४५० प्लॉट आखण्यात आले आहे. ११०० शौचालये, उच्च दाबाच्या पाण्याच्या टाक्या, हायमास्ट दिवे आणि वाहनतळ आदी व्यवस्था करण्यात आली आहे. ६५ एकराची जागाही कमी पडत असल्याने रेल्वेच्या १५ एकर जागेचा वारकरी वापर करतात.




## स्वच्छता आणि वाहत्या पाण्याची व्यवस्था

वारकऱ्यांच्या दृष्टीने विठ्ठलाच्या दर्शनाएवढंचे महत्त्व चंद्रभागेत स्नान करण्याला आहे. २० जुलैला आषाढी आहे. मात्र पालख्या १७ जुलैलाच पंढरपुरात दाखल होतात. आषाढीला प्रचंड गर्दी असल्याने ते १७ तारखेपासूनच स्नानाला सुरुवात करतात. या वर्षी चंद्रभागेत भरपूर पाणी असेल अशी व्यवस्था केली आहे.

चंद्रभागेच्या स्वच्छतेवर जास्त भर देण्यात आला आहे. ७ ते ८ हजार कर्मचाऱ्यांच्या मदतीने ६५ एकर जागा, मंदिर परिसर, प्रदक्षिणामार्ग इत्यादी ठिकाणांची स्वच्छता करण्यात येणार आहे. नदीत पडलेले खड्डे बुजवण्यात येणार आहेत. चंद्रभागा नदीत प्रवाहाने पाणी सोडले जाईल. त्यामुळे नदीत शेवाळ राहणार नाही.

## तीर्थक्षेत्र विकास आराखडा

सोलापूर जिल्ह्याकरिता ४६७ कोटी रुपयांचा तीर्थक्षेत्र आराखडा आखण्यात आला आहे. पंढरपूर शहर आणि ग्रामीण भागासाठी ८५ कामे मंजूर करण्यात आली आहेत. त्यापैकी ४३ कामे पूर्ण झाली आहेत. २७ कामे प्रगतिपथावर आहेत. ६५ एकर जागेवर जायला कुठलाही रस्ता नव्हता, त्या ठिकाणी रस्ता, पाणी, वीज, मुरमीकरण, ११०० शौचालये, हायमास्ट दिवे इत्यादी सुविधा करण्यात आल्या आहेत. पंढरपूर शहरातील रस्ते, पालखी मार्गावरच्या रस्त्यांची सुधारणा करण्यात आली. पंढरपूर शहरात २५००० कायमस्वरूपी स्वच्छतागृहे असावी असे उच्च न्यायालयाचे आदेश होते. त्यानुसार ७५० मोबाइल शौचालय मुक्कामांच्या ठिकाणी, ६५ एकरमध्ये ११०० शौचालये आणि पंढरपूर शहरात कायमस्वरूपी १४ सुलभ शौचालये उपलब्ध करून देण्यात आली आहेत. चंद्रभागेच्या ८५० मीटर लांबीच्या घाटाचे काम सुरू आहे. ते काम पुढील वर्षात पूर्ण होईल.

## विविध विभागांचा समन्वय

साधारणतः वारीच्या निमित्ताने १२ लाख वारकरी पंढरपुरात येत असतात. एवढ्या मोठ्या प्रमाणावरील गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस विभागाला सतर्क राहावे लागते. या वेळी इतर जिल्ह्यांतून ७५० कर्मचारी बोलावले जातात. आरोग्य विभाग, वनविभाग, अग्निशामक दल आदी विभागात समन्वय साधला जातो. वारीच्या कालावधीत जिल्हाधिकारी म्हणून माझा तळ पंढरपूरला असतो. या काळात २१ आपत्कालीन मदत केंद्राशी संपर्कात राहून गरज पडल्यास तत्काळ मदत पुरवतो. वाहनांना पास, पार्किंग, स्वंयपाक गॅस, केरोसीन, आरोग्य सेवा याचा समावेश आहे. वारीच्या काळात सरासरी २ हजार वाहने येतात. त्यामुळे पंढरपूरचे रस्ते बंद होतात. प्रत्येकाला वाटतं आपले वाहन पंढरपूर देवस्थानाजवळ घेऊन जावे. त्यामुळे अडचण निर्माण होते. दिंडीच्या वाहनचालकांना पास देऊन तो प्रश्न सोडवला जातो.


**शब्दांकन: स्वप्नील भालेराव**

आंतरवासिता, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय.



**वर्षभराच्या जीवनसंघर्षासाठी एक विलक्षण ऊर्जा घेण्यासाठी लाखो वारकरी पंढरपूरला येतात. या कालावधीत कोणतीही अनुचित घटना घडू नये व वारकऱ्यांना सर्व सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात, या अनुषंगाने प्रशासन सज्ज झाले आहे.**

# ॥ सुसज्ज प्रशासन ॥

**डॉ. दीपक म्हैसेकर,** (विभागीय आयुक्त, पुणे)

वारीला शेकडो वर्षांची परंपरा आहे. मोठ्या संख्येने सगळे भाविक, वारकरी इथे एकत्र येत असूनही, एका स्वयंशिस्तीने वारी पुढे चाललेली असते. या वारीच्या अंगभूत नियोजनाला प्रशासकीय आणि शासकीय नियोजनाची जोड मिळाली तर हा वारीचा सोहळा अधिकच सुखकारक आणि सुलभ होऊ शकतो. म्हणूनच त्याचे नियोजन समजून घ्यायला हवे.

पुणे, सातारा आणि सोलापूरमधून पालख्यांचे मार्गक्रमण होते. वेगवेगळ्या ठिकाणी पालखीचे मुक्काम होतात, त्या मुक्कामाच्या ठिकाणी आणि पालखीचे मार्गक्रमण होत असताना त्यांना वेगवेगळ्या सुविधा मिळाव्या, यासाठी या वर्षी सुरुवातीपासून


छाया : सतीश शेटे

नियोजन करण्यात आले आहे.

यंदा प्रामुख्याने जे काही निवासाचे तळ आहेत, त्या ठिकाणी वारकऱ्यांची राहण्याची सोय, शौचालयाची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वैद्यकीय व्यवस्था आणि आणीबाणीच्या प्रसंगी काही गरज लागली तर आपत्कालीन व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याचबरोबर पालखीचे मार्गक्रमण होत असताना रस्त्यावर त्यांना काही अडचण येऊ नये म्हणून पोलिसांमार्फत मार्ग आखून देण्यात आले आहेत.

### समन्वयाचे नियोजन

या वर्षी पालख्यांमध्ये समन्वय साधण्यासाठी उपजिल्हाधिकारी दर्जाचे समन्वयक अधिकारी नेमले आहेत. ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी मार्गावर ७०० तर तुकाराम महाराजांच्या पालखी मार्गावर ५०० फिरती स्वच्छतागृहे राहतील. ही स्वच्छतागृहे प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी उपलब्ध असतील. त्याव्यतिरिक्त पंढरपुरात २४,५०० स्वच्छतागृहांची व्यवस्था केली आहे. त्यातील काही खासगी स्वच्छतागृहे लोकांच्या घरातली आहेत, जिथे लोक परंपरेने वर्षानुवर्षे उतरतात. त्याव्यतिरिक्त ४५०० सामुदायिक स्वच्छतागृहांची व्यवस्था करण्यात आली आहे.

### आरोग्यविषयक नियोजन

पालखी मार्गावर जंतू किंवा रोगराई पसरू नये यासाठी ब्लिचिंग पावडर फवारून, योग्य ती काळजी घेतली जाईल. त्याचबरोबर प्रत्येक १०-१० कि.मी.वर 'कॉमन फॅसिलिटी सेंटर' (समान सुविधा केंद्र) तयार केले जात आहेत. या केंद्रामध्ये संपर्क साधल्यानंतर सर्व सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होतील. दर दहा कि.मी. अंतरावर एक अशी दोन्ही पालखी मार्गावर २५० ते ३०० केंद्रे उभी केली जातील. पालखीचा मुक्काम ज्या जिल्ह्यामध्ये असेल, त्या जिल्ह्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी योग्य ती काळजी घेतील. प्रत्येक ठिकाणी वैद्यकीय अधिकारी राहतील. यासाठी वेगळे ॲप तयार केले आहे.

### कायदा व सुव्यवस्थेचे नियोजन

पोलीस प्रशासनामार्फत यासाठी पूर्वनियोजन करण्यात आले आहे. क्लोज्ड सर्किट टेलिव्हिजन आणि मोबाइल सीसीटीव्हीद्वारे वारी मार्गावर लक्ष ठेवले जाईल. तिन्ही जिल्ह्यांचे शिपायापासून अधिकाऱ्यापर्यंत ५५०० पोलीस यावर लक्ष ठेवतील. रस्त्याने जाताना वारकऱ्यांना कुठलीही अडचण निर्माण होऊ नये म्हणून, आवश्यक तेथे वाहतूक दुसऱ्या दिशेने वळवावी, असे आदेश दिले आहेत.

### आपत्कालीन यंत्रणा

एखादी आपत्कालीन परिस्थिती सांगून येत नाही. आपल्याला त्याची संभाव्यता लक्षात घेऊन, त्यानुसार नियोजन करावे लागते. आपत्कालीन यंत्रणेसाठी प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांना क्षेत्रीय कमांडर म्हणून अधिकार दिलेले आहेत. त्यांच्या मदतीला अतिरिक्त जिल्हाधिकारी असतील. उपजिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांनासुद्धा हे अधिकार दिले आहेत. हे सर्वजण आणिबाणीची परिस्थिती उद्भवलीच किंवा निर्माण होण्याची शक्यता आहे असे वाटले तर ते तत्काळ परिस्थितीवर नियंत्रण ठेवतील. या दृष्टीने पोलीस प्रशासन, होमगार्ड्स, आरोग्य खात्यांचे पथक सज्ज असतील. पालखी मार्गावर सर्वच ठिकाणी शासकीय रुग्णालयांमध्ये १० टक्के बेड आम्ही रिकामे ठेवणार आहोत. त्यामुळे तातडीने उपचार करणे शक्य होईल. एवढेच नव्हे तर सुसज्ज अशा रुग्णवाहिकांची देखील सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. हृदयविकाराचा झटका आलेल्या रुग्णावर उपचार करण्याची १०८ नंबरच्या रुग्णवाहिकेमध्ये सोय आहे.

### पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा

तुकाराम महाराज पालखी देहू येथून निघते आणि ज्ञानेश्वर माउलींची पालखी आळंदीहून निघते. या दोन्ही पालख्या पंढरपुरात जातात. या पालखी मार्गावर आणि पालखी जेथे जेथे मुक्काम करते त्या ठिकाणी वेगवेगळ्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. २०१४ मध्ये अंतिम आराखडा मंजूर झाला. या आराखड्यामध्ये १०९४ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने रस्ते, भक्तनिवास, वेगवेगळ्या रस्त्यांना जोडणारे पूल, स्वच्छतागृह, पाणी पुरवठ्याची व्यवस्था या बाबींचा समावेश आहे. या आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी वेळोवेळी पाठपुरावा केला जात आहे. यातील काही कामांना पूर्ण करण्यासाठी वेळ लागत असला तरी ही कामे अपघातविरहित व्हावीत, यावर लक्ष केंद्रित केले आहे. वारकऱ्यांना इजा होऊ नये, अशी दक्षता घेण्याचे आदेश दिले आहेत. ही वारी संपल्यानंतर स्थगित केलेली कामे पुन्हा गतीने सुरू केली जातील.

**शब्दांकन: वृषाली बर्गे**
आंतरवासिता, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

**गोपालकृष्ण मांडवकर**

नद्या म्हणजे लोकवाहिन्या; जीवनदायिन्या ! एकेकाळी अमृताचे झरे वाहणाऱ्या या नद्या अलीकडे प्रदूषित झाल्या आहेत. त्याची कारणे अनेक आहेत. धार्मिक अधिष्ठान असलेल्या तीर्थक्षेत्रावरील पावित्र्य जपण्यासोबतच, पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी नदी स्वच्छतेचा कार्यक्रम देशपातळीवर राबवण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून 'नमामि चंद्रभागा' हे अभियान महाराष्ट्रात राबवण्यात येत आहे. शासनाच्या माध्यमातून निधीची उपलब्धता करून देण्यासोबतच, लोकसहभाग आणि जनजागृतीच्या माध्यमातून चंद्रभागेचे रूप पालटण्यासाठी २०२२ पर्यंतचा कालबद्ध कार्यक्रम या अभियानाच्या यशस्वितेसाठी सरकारने आखला आहे.

## प्रदूषणमुक्त नदी

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी हाती घेतलेल्या 'नमामि गंगे' च्या धर्तीवर राज्य सरकारने २०१६ मध्ये 'नमामि चंद्रभागा' मोहीम हाती घेतली. चंद्रभागा नदी प्रदुषणमुक्त करणे हा या मोहिमेचा मुख्य हेतू आहे. अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी २०१६–१७ अर्थसंकल्पात 'नमामि चंद्रभागा अभियान' शासन व लोकसहभागातून राबवण्याचा संकल्प व्यक्त केला. १ जून २०१६ रोजी स्वत: पंढरपुरात येऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वित्तमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत या मोहिमेचा शुभारंभ झाला. २०१७ मध्ये या मोहीमेसाठी केंद्र सरकारने ९९५ कोटी रुपयांच्या बजेटला मान्यता दिली आहे.


चंद्रभागेचा उगम असलेले भीमाशंकर ते पंढरपूर असा चंद्रभागा नदीचा ५५२ किलोमीटर लांबीचा पट्टा या अभियानाच्या माध्यमातून प्रदूषणमुक्त करणे आणि त्या माध्यमातून पंढरीला येणाऱ्या भाविकांना चंद्रभागेचे निर्मळ दर्शन घडवणे, हा या अभियानामागील हेतू आहे.

## चंद्रभागा प्राधिकरण

हे अभियान प्रभावीपणे राबवण्यासाठी नमामि चंद्रभागा प्राधिकरणाची स्थापना करून २ जुलै २०१६ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली. या प्राधिकरणाचे अध्यक्ष स्वत: मुख्यमंत्री आहेत. वित्तमंत्री हे सहअध्यक्ष आहेत. १ जून २०१६ रोजी या अभियानाला सुरुवात करताना तुळशीवन तयार करणे आणि चंद्रभागा नदीच्या तीरावर वृक्षलागवड करण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले. पंढरपूर नगरपालिकेने या कामासाठी दोन कोटी ८८ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकाला प्रशासकीय मान्यता दिली.

## भूयारी गटारांचे निर्माण

पंढरपूर शहरात भुयारी गटारांचे निर्माणही या अभियानाचा एक भाग आहे. हरित पंढरपूर ही संकल्पना या अभियानांतर्गत राबवली जाणार आहे. नामसंकीर्तन सभागृह बांधण्यासाठी १० कोटी रुपयांची विशेष तरतूद पंढरपूर नगर पालिकेकडे वळती करून, ते कामही आता पूर्णत्वाकडे आले आहे. पंढरपूर हे नमामि चंद्रभागा अभियानातील मध्यवर्ती स्थान आहे. या शहरातील स्वच्छता आणि सांडपाण्याचे नियोजन सर्वात महत्त्वाचे आहे. त्यामुळे या अभियानांतर्गत पंढरपूर नगरपालिकेने केलेल्या कामाचा आढावा घेतला जावा आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांसाठी समिती नेमण्यात यावी, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वी केली



**महाराष्ट्राचे दैवत असलेल्या पंढरीतील विठोबाचे आणि भक्तिरसाने ओथंबलेल्या चंद्रभागेचे नाते अतूट आहे. पंढरीची वारी आणि चंद्रभागेतील स्नान ही अखंड परंपरा आहे. चंद्रभागेतील स्नानाने पावन झालेली वारकऱ्यांची मने विठुरायाच्या दर्शनाने तृप्त होतात. हा तृप्तीचा दरवळ महाराष्ट्रभर पसरला आहे. म्हणूनच नद्या स्वच्छतेच्या मोहिमेत चंद्रभागेला नमन करणारे 'नमामि चंद्रभागा' हे अभियान राज्य सरकारने हाती घेतले आहे.**

# ॥ नमामि चंद्रभागा अभियान ॥

सुखांचे जें सुख चंद्रभागे तटीं ।

छाया : सुनील उंबरे

आहे. या कामाच्या तांत्रिक सल्ल्यासाठी निरी या संशाधन संस्थेची मदत घेण्याचे ठरले आहे. भीमाशंकर येथील नदीच्या उगमापासून ते नदी व शहरापर्यंत हरित पट्टा विकसित करण्याबरोबर नदीत सोडले जाणारे सांडपाणी, नागरी घनकचरा आदी बाबींच्या व्यवस्थापनासाठी मुख्यमंत्री स्वत:आग्रही आहेत. पर्यावरण संतुलन व सौंदर्यीकरणासाठी नदीच्या दोन्ही बाजूला मोठ्या प्रमाणात वनीकरण व फळबागा लावण्यावर सरकारचा भर आहे.

### ऑनलाइन संनियंत्रण कार्यप्रणाली

नद्यांना प्रदूषित करणाऱ्या सांडपाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी नगरविकास विभागाच्या नियतव्ययातून नाला इंटरसेप्शन आणि एसटीपीसाठी ९७ कोटी रुपये खर्च करण्याची मान्यता सरकारने दिली आहे. भीमा नदीच्या काठावर असणाऱ्या कारखान्यातील दूषित पाणी नदीमध्ये सोडले जाऊ नये, यासाठी ऑनलाइन मॉनिटरिंग सिस्टिम तयार करून, ते मध्यवर्ती प्रणालीला जोडण्याचे आणि घनकचऱ्यांची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट करण्याचे आराखडे तयार करण्याचे नियोजन; याअंतर्गत आखण्यात आले आहे.

पुणे महानगरपालिका आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सांडपाणी व्यवस्थापनासाठी 'निरी' या संस्थेशी करार करणार आहेत. भीमा, चंद्रभागा आणि तिच्या उपनद्यांच्या काठावरील औद्योगिक कारखाने आणि साखर कारखान्यांमधून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्यावर योग्य प्रक्रिया होते का? याची तपासणी निरी तसेच अन्य संस्थांच्या माध्यमातून नियमित करण्याची सरकारला यंत्रणेकडून अपेक्षा आहे.

### कामाची विभागणी

या अभियानाच्या कामाचे स्वरूप ठरवून, अलीकडेच पुणे विभागाचे आयुक्त डॉ. दीपक म्हैसेकर यांनी आठ भागात कामांची विभागणी केली आहे. तत्काळ उपाययोजनांच्या पूर्ततेसाठी यंत्रणेला ३१ ऑगस्टपर्यंत मुदत देण्यात आली आहे. भीमाशंकर ते पंढरपूर या ५५२ किलोमीटर लांबीच्या नदीचा आराखडा तयार करून, कामाचे नियोजन आखले आहे. पुणे, सातारा आणि सोलापूर या तीन जिल्ह्यांशी संबंधित हे अभियान असून, पाच नगरपालिका आणि दोन महानगरपालिकांमधील घनकचरा नियोजनाचे कामही याअंतर्गत आहे. विविध प्रकल्प आणि नदीकाठावरील साखर कारखान्यांकडून नदीमध्ये सोडल्या जाणाऱ्या सांडपाण्याचे योग्य नियोजन करण्यासाठी; पंढरपूर ते उजनी, उजनी ते पुणे आणि पुणे ते भीमाशंकर अशा तीन टप्प्यात चंद्रभागा नदीच्या प्रदूषणमुक्तीसाठी काम केले जाणार आहे.

### नद्यांचे शुद्धीकरण

नमामि चंद्रभागा अभियान केवळ चंद्रभागेपुरते नसून ती जिथून सुरू होते त्या भिमाशंकरपासून अभियानाचे काम आहे. इंद्रायणी, मुळा, मुठा या नद्यांच्या माध्यमातून चंद्रभागेत येणारी घाण थोपवण्यासाठी आधी त्या नद्यांचे शुद्धीकरण करणे गरजेचे आहे.




■ चंद्रभागा नदीच्या पाण्याची पातळी कायम राहावी, यासाठी बंधारे. ■ नदीचा किमान पर्यावरणीय प्रवाह अबाधित ठेवणार. ■ पंढरपूर यात्रेदरम्यान वारकऱ्यांची गर्दी अधिक असणाऱ्या ठिकाणी पुरेशा प्रमाणात सार्वजनिक स्नानगृहे, स्वच्छतागृहे, शौचालयांची उपलब्धता. ■ वारी मार्गावरील ठिकाणांवर पुरेशा प्रमाणात स्वच्छतागृहे, स्नानगृहे, शेल्टर, पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी सुविधा उपलब्ध. ■ फिरत्या जैविक शौचालयांची उपलब्धता. ■ चंद्रभागा नदीच्या वरच्या भागात असणाऱ्या भीमा नदी व तिच्या उपनद्यांवरील नागरी वस्तीतून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रियेसाठी यंत्रणा. ■ नागरी कचऱ्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट. ■ चंद्रभागा नदीच्या वरील भागातील कॅचमेंट क्षेत्रातील औद्योगिक वसाहती, उद्योगातून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून पाण्याचा पुनर्वापर. ■ नदीघाटाचे सौंदर्यीकरण आणि वनीकरण. ■ यात्रेच्या मार्गावर हरित पट्टा, बाग, वनीकरण करून त्यांचे संवर्धन.

निर्मल वारीसाठी निधीची कायमस्वरूपी तरतूद करण्यात आली आहे. त्याचे सकारात्मक चित्र गतवर्षीपासून वारीमध्ये उमटायला लागले आहे. वारीच्या मार्गावर असणारी हजारोंच्या संख्येतील फिरती शौचालये, आरोग्यदूत, यंदा प्रथमच वारीत असणारे हँडवॉश पॉईंट, वारकऱ्यांना पिण्याचे स्वच्छ पाणी, पंढरपुरातील ६५ एकर परिसरातील स्वच्छता आणि वारीच्या काळातील नियोजन हे सर्व या नियोजनाची सकारात्मक फलश्रुती आहे.

### प्राधिकरणाची जबाबदारी

चंद्रभागा नदी २०२२ पर्यंत निर्मळ आणि प्रदूषणमुक्त करून, तिचे संवर्धन करणे हा या अभियानाचा मुख्य हेतू आहे. यासाठी सर्व संबंधित शासकीय यंत्रणा, निमशासकीय संस्था, स्वयंसेवी संस्था, अशासकीय संस्था आणि जनता यांच्यात समन्वय साधण्याची मुख्य जबाबदारी प्राधिकरणावर आहे. इंद्रायणी, मुळा, मुठा, या नद्या पुणे जिल्ह्यातून पुढे येतात. खरे तर हे अभियान या नद्या ज्या जिल्ह्यातून येतात त्या जिल्हास्तरावर राबवण्यात येणार आहे. त्याचे संनियंत्रण पुणे विभागीय आयुक्त यांच्याकडे आहे. चंद्रभागा नदी आणि त्या काठावर वसलेल्या पंढरपूर या तीर्थक्षेत्राचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन, शासनाने आखलेले एकीकृत चंद्रभागा नदी संवर्धन अभियान म्हणजेच 'नमामि चंद्रभागा अभियान' आहे.


**वरिष्ठ उपसंपादक, दै.'लोकमत', सोलापूर**
**संपर्क:०९८५०२०७०११**



**पंढरपूरच्या गाभाऱ्याचे दर्शन घेण्यासाठी लाखो वारकरी पायीवारी करतात, त्याच वेळी विदर्भाच्या विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी धापेवाड्याच्या दिशेने शेकडो वारकरी निघालेले असतात. या वारीची पावणे तीनशे वर्षांची परंपरा आजही अखंडित आहे. माउली सर्वत्र आहे, याची प्रचिती देणारी ही यात्रा आषाढीच्या निमित्ताने विशेषत्वाने लक्षात राहाते.**

# ।। विदर्भाची माउली ।।

**नितीन नायगांवकर**

माउली या शब्दातील व्यापकता दोन ओळींची व्याख्या करून टिपता येण्यासारखी नाही. माउली म्हटल्यावर माय आली आणि माय अनेक रूपांची धनी असते. मायचे वर्णन करणे अवघड तसेच माउलीची व्याप्ती सांगणेही अवघड. सांगायचेच झाले तर अथांग महासागराचे दुसरे टोक एकवेळ हाती लागावे, पण माउली नावाच्या महासागराचा तळ गाठणेही अवघड. तरीही विठ्ठलाच्या दर्शनासाठी शकडो, लाखो लोक आषाढीच्या निमित्ताने उंबरठा ओलांडतात, सीमा ओलांडतात. पंढरपूरच्या गाभाऱ्याचे दर्शन घेण्यासाठी लाखो वारकरी पायी वारी करतात, त्याच वेळी विदर्भाच्या विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी धापेवाड्याच्या दिशेने शेकडो वारकरी निघालेले असतात. या वारीची पावणे तीनशे वर्षांची परंपरा आजही अखंडित आहे. माउली सर्वत्र आहे, याची प्रचिती देणारी ही यात्रा आषाढीच्या निमित्ताने विशेषत्वाने लक्षात राहाते.

कळमेश्वर तालुक्यातील धापेवाडा तसे नागपूर शहरापासून अवघे २३ किलोमीटर अंतरावरचे गाव. या गावाला खरी ओळख स्वयंभू श्री विठ्ठल-रुख्मिणी मंदिरामुळे मिळाली. पंढरपुरात आहे तशी धापेवाड्यातही चंद्रभागा आहे आणि चंद्रभागेच्या तीरावरच विठ्ठलाचे देऊळ आहे. धार्मिक आस्था का असेना, पण एखाद्या मान्यतेला अशा पद्धतीच्या योगायोगाची जोड मिळावी, हेही महत्त्वाचेच आहे. नागपूर जिल्ह्यातील महत्त्वाच्या धार्मिक स्थळांमध्ये धापेवाड्याचा समावेश होतो. लाखो भाविकांची वर्षभर गर्दी असतेच, शिवाय आषाढीच्या यात्रेत जवळपास अडिच लाख भाविक धापेवाड्यात दाखल होतात. कार्तिकी एकादशीच्या निमित्तानेही जवळपास दीड लाख लोक धापेवाड्यातील विठ्ठलाच्या दर्शनाला येतात. राज्य सरकारने याचीच दखल घेऊन धापेवाड्यातील या देवस्थानाला पर्यटनाचा ब' दर्जा दिला आहे. यात्रेच्या व्यतिरिक्त वर्षभर या ठिकाणी दाखल होणारे भाविक माउलीच्या दर्शनासोबत पर्यटनाचाही आनंद घेतात. विशेष म्हणजे धापेवाड्यापासून थोड्याफार अंतरावर

पारडसिंगा, आदासा, कोराडी, वाकी ही धार्मिक स्थळे आहेत. त्यामुळे बाहेरून येणारे भाविक त्या दृष्टीने नियोजन करून येतात.

## विलक्षण इतिहास

कुठल्याही यात्रेचा, उत्सवाचा एक इतिहास असतो. त्या आधारावरच अनेक वर्षे ही परंपरा पुढे जात असते. धापेवाड्याच्या यात्रेचाही एक विलक्षण इतिहास आहे. अर्थात या यात्रेच्या उगमाचा विचार केला तर एका सच्च्या भाविकाने निर्माण केलेले हे विश्व आहे, असेच म्हणावे लागेल. धापेवाड्यातील संत कोलबास्वामी विठ्ठलाचे निस्सीम भक्त. आयुष्यभर माउलीच्या दर्शनासाठी वारीत सहभागी झाले. आषाढी एकादशीची वारी असो वा कार्तिकी एकादशीची, संत कोलबास्वामी विठ्ठलाच्या दर्शनासाठी आवर्जून जायचे. वृद्धापकाळात वारीत, यात्रेत सहभागी होणे त्यांना शक्य व्हायचे नाही. आयुष्यभर विठ्ठलाच्या दर्शनासाठी वारी करणाऱ्या भक्ताला वारीपासून लांब गेल्यावर अस्वस्थ व्हायला लागते. संत कोलबास्वामींचेही तसेच झाले. ध्यानीमनी विठ्ठल. विठ्ठलाच्या दर्शनाला आसुसलेल्या कोलबास्वामींना अखेर साक्षात्कार झालाच. विठ्ठलाने कोलबास्वामींच्या स्वप्नात येऊन चंद्रभागानदीच्या किनाऱ्याला उत्तरेकडे असलेल्या बाहुली विहिरीत आपली मूर्ती असल्याचे सांगितले. या मूर्तीला विहिरीतून काढून मंदिराची स्थापना कर, असे विठ्ठलाने कोलबास्वामींना साक्षात्कार देऊन सांगितले, अशी मान्यता आहे. या साक्षात्कारानंतर कोलबास्वामींना माउलीच्या भेटीची ओढ लागली. त्यांनी लगेच बाहुली विहिरीतून, विठ्ठलाची मूर्ती काढून उमाजी आबा खोलकुटे यांच्या साक्षीने विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली. ज्येष्ठ शुद्ध द्वादशी शके १९६२ म्हणजेच इ.स. १७४१ चा हा कालावधी आहे. पावणे तीनशे वर्षांपूर्वीची ही घटना लाखो भाविकांसाठी विदर्भाचे पंढरपूर जन्माला घालून गेली. तेव्हापासून आजपर्यंत धापेवाड्यात वर्षभर भाविकांची मांदियाळी असते. आषाढी, कार्तिकी तसेच वर्षभर होणारे उत्सव भाविकांना धापेवाड्यात घेऊन येतात. शेकडो वर्षांच्या परंपरेचे पाईक होऊन लोकांनीही धापेवाड्याचे महत्त्व कायम राखले आहे.

## माउली अवतरते

आषाढी एकादशीच्या निमित्ताने गुरुपोर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी प्रत्यक्ष माउलीच धापेवाड्यात अवतरते, अशी एक आख्यायिका आहे. या दिवशी संपूर्ण महाराष्ट्रासह मध्यप्रदेश, छत्तीसगड, आंध्रप्रदेशलगतचा काही भाग आदी ठिकाणांहून भाविक धापेवाड्यात दाखल होतात. दरवर्षी दीडशेपेक्षा अधिक दिंड्या वारीत सहभागी होतात. सारे भाविक कोलबास्वामी मठाच्या परिसरात वास्तव्याला असतात. धापेवाड्यातील निवासी नागरिकांसह स्वयंसेवी संस्था या भाविकांच्या सेवेत असतात. 'माउली' हा एक महिमा या सर्वांना जोडून ठेवतो, हे महत्त्वाचे. दहीकाल्याचे कीर्तन, विठूनामाचा गजर, जागोजागी होणारे भजन या सर्वांनी आषाढीच्या यात्रेच्या निमित्ताने धापेवाड्याला पंढरपूरचे स्वरूप आले असते. संत कोलबास्वामींनी ज्या श्रद्धेने या मंदिराची स्थापना केली, त्याची प्रचिती दरवर्षी आषाढी यात्रेच्या निमित्ताने येत असते. यात्रेच्या दिवशी भाविक स्नान करून मंदिरात पोहोचतात. एकादशी, द्वादशी व त्रयोदशीला पालखी सोहळा आयोजित करण्यात येतो. महापूजा झाल्यानंतर मध्यरात्री कोलबास्वामी मठ, रघुसंत महाराज मठ, मकरंदपुरी महाराज मठ या ठिकाणांहून दिंड्या दाखल होतात. त्यानंतर स्वयंभू विठ्ठल-रुक्मिणी मंदिरापुढील चंद्रभागेच्या तीरावर गोपालकाला होतो. वर्षोनुवर्षे ही परंपरा जपली जात आहे. भाविकांची व दिंड्यांची संख्याही सातत्याने वाढत असल्याचे, या भागातील जुनी जाणकार मंडळी सांगतात. महाराष्ट्रातील छोटे पंढरपूर अशी एक ओळख धापेवाड्यातील देवस्थानाची आहे. आषाढी एकादशीच्या दिवशी पंढरपुरात आणि धापेवाड्यात असलेल्या वारकऱ्यांना माउलीचे दर्शन होत असते, अशी मान्यता आहे.

## स्वयंभू रथयात्रा

आषाढी एकादशीप्रमाणे कार्तिकीच्या निमित्ताने निघणाऱ्या स्वयंभू रथयात्रेचा मोठा उत्सव धापेवाड्यात होतो. रथयात्रेला ११३ वर्षांची परंपरा आहे. काकड आरती व दिंडीने सुरू झालेला हा उत्सव जवळपास सव्वा महिना चालतो. त्रयोदशीला मारुतीच्या रथावर व चतुर्दशीला गरूड रथावर गावात यात्रा निघते. पौर्णिमेला सायंकाळी चंद्रभागेच्या तीरावर गोपालकाल्याने या यात्रेचा समारोप होतो. भागेरथाबाई तोमर यांनी १९०६ला तयार केलेला हा रथ आजही या यात्रेत वापरला जातो. अर्थात हा रथच या यात्रेचे विशेष आकर्षण ठरते. साडेबारा फूट उंचीच्या या रथावर पाच फुटांचे लोखंडी टोप आहेत. बारा खांब आणि बारा चाके असलेल्या या रथाच्या डावीकडे मारुतीची रेखीव मूर्ती व उजवीकडे गरूड आहे. दिवाळीला पंचमीच्या निमित्ताने हा रथ बाहेर निघतो. डागडुजी, साफसफाई करून रथासाठी नवी कापडं शिवली जातात. भागेरथाबाईंचे वारस कृष्णप्रतापसिंह पवार या रथयात्रेची परंपरा पुढे नेत आहेत.

## कोलबास्वामींच्या नंतर...

संत कोलबास्वामींच्या नंतर अनेक भाविकांनी कळमेश्वर ते पंढरपूरच्या वारीची परंपरा कायम ठेवली. अगदी आज या काळातसुद्धा असे भाविक आहेत. तालुक्यातील कोहळी गावातील ८५ वर्षांचे ह.भ.प. तुकाराम लंगोटे महाराज गेल्या ३५ वर्षांपासून पंढरीची वारी करीत आहेत. श्रीक्षेत्र धापेवाडा ते पंढरपूर असा एक हजार किलोमीटरचा प्रवास ते शंभर वारकऱ्यांना सोबत घेऊन करतात. आषाढी एकादशीपर्यंत ५७ दिवसांमध्ये जवळपास १४४ गावांमध्ये त्यांचा मुक्काम असतो. संगीतकार, रायफल प्लेअर, दांडपट्टा मास्टर, कीर्तनकार, उत्कृष्ट नाडीतज्ज्ञ असे अष्टपैलू व्यक्तिमत्व म्हणजे लंगोटे महाराज होय. १३ वर्षे ग्रामसेवक राहीलेले लंगोटे महाराज यांचा वारीतील उत्साह तरुणांना लाजवणारा आहे.

**वरिष्ठ वार्ताहर, दै.'सकाळ', नागपूर**
**संपर्क: ०८३८००९२१३६**

नोंदी

## आषाढी यात्रेसाठी एसटीच्या सेवा



**श्रीक्षेत्र** पंढरपूर येथे, २३ जुलै (सोमवार) रोजी भरणाऱ्या आषाढी एकादशीच्या यात्रेसाठी एस.टी. महामंडळातर्फे राज्याच्या विविध भागातून ३७८१ बसेस सोडण्यात येणार आहेत. यात्रे नंतर परतीच्या प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन, स्त्रिया व आबालवृद्धांचा प्रवास सुखकर व्हावा म्हणून एकूण जादा बसेसपैकी १० टक्के बसेस आगाऊ आरक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

२१ ते २८ जुलै या यात्रा काळामध्ये एस.टी.चे सुमारे ८ हजार कर्मचारी अहोरात्र सेवा देणार आहेत. प्रवासांच्या सोयीसाठी पंढरपूर येथे ३ तात्पुरत्या बसस्थानकांची निर्मिती करण्यात येत आहे. मराठवाड्यांच्या प्रवाशांसाठी भीमा बसस्थानक, पुणे-मुंबई येथे जाणाऱ्या प्रवाशांसाठी चंद्रभागानगर बसस्थानक व जळगाव-नाशिक येथे जाणाऱ्या प्रवाशांसाठी पंढरपूरजवळील विठ्ठल सहकारी साखर कारखाना येथे बसस्थानक उभारण्यात येत आहे.

### रिंगणसोहळ्यासाठी जादा बसेसची सोय

२१ जुलै (शनिवार) रोजी बाजीराव विहीर येथे होणाऱ्या रिंगणसोहळ्याला भाविक-प्रवाशांना जाण्यासाठी एस.टी.ने पंढरपूरहून १०० जादा बसेसची सोय केली आहे. या बसेस दिवसभर या मार्गावर प्रवाशांची ने-आण करतील. तसेच पंढरपूरहून ७ कि.मी. अंतरावर असणाऱ्या विठ्ठल सहकारी साखर कारखाना येथील बसस्थानकावर जाण्यासाठी जादा बसेस सोडण्यात येणार आहेत.

### प्रवाशांसाठी सोयीसुविधा

वरील तिन्ही बसस्थानकांवर प्रवाशांच्या सोयीसाठी पिण्याचे पाणी, विद्युत सेवा, फिरती स्वच्छतागृहे, उपहारगृह, रुग्णवाहिका, प्रत्येक विभाग निहाय चौकशी कक्ष, संगणकीय उद्घोषणा इ. सुविधा देण्यात येणार आहेत. तसेच तिन्ही बसस्थानकांवरील यात्रा काळातील हालचाली टिपण्यासाठी सी. सी.टी. व्ही कॅमेरे लावण्यात येत आहे. एस. टी. महामंडळाच्या www.msrtc.gov.in या संकेतस्थळावरून ऑनलाइन आरक्षण करता येते. त्याचबरोबर msrtc reservation mobile app चा वापर करता येईल. या वर्षी अभिनव प्रयोग म्हणून पंढरपूर येथील ज्या ठिकाणी वारकऱ्यांचा निवास असतो (मठ, यात्री निवास, धर्मशाळा) अशा ठिकाणी एस.टी.चे कर्मचारी स्वतः जाऊन प्रवाशांच्या मागणीनुसार आगाऊ आरक्षण करून देणार आहेत.

## 'आषाढी वारी-२०१८' मोबाइल ॲप वारकऱ्यांचा सारथी!

**आषाढी** वारीतील पालखी सोहळा म्हणजे वारकरी संप्रदायाच्या उत्कृष्ट नियोजनाचे प्रतिक असतो. हा सोहळा आणखी नियोजनबद्ध, निर्विघ्न पार पडावा, यासाठी पुणे जिल्हा प्रशासनाने आषाढी वारी-२०१८ हे मोबाइल ॲप विकसित केले आहे. हे ॲप वारकऱ्यांसाठी सारथ्याची भूमिका पार पाडणार आहे.






**वैशिष्ट्ये** - ● संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराज पालखीचे पूर्ण मार्गक्रमण. ● पालखी सोहळा प्रमुखांचे, प्रशासकीय व पोलीस अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक. ● वैद्यकीय सुविधा, अन्नधान्य पुरवठा कक्ष, जलसुविधा जीपीएसद्वारे जोडल्याने एका क्षणात संपर्क. ● महानगरपालिका, नगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांसह समन्वय कक्षाची माहिती. ● आपत्कालीन व्यवस्था, विद्युत सेवा, पशुधन सेवेची संपर्कासह सविस्तर माहिती. ● पंढरपूरच्या पांडुरंगाचे व रुक्मिणीच्या लाईव्ह दर्शनाची सोय. ● फोटो गॅलरी व व्हिडीओ गॅलरी. ● वाहतूक व्यवस्था तपशील. ● 'सेल्फी वुईथ पालखी' फेसबूक पेजची लिंक. ● हरवलेल्या व्यक्तींना शोधण्यासाठी 'आपण यांना पाहिलेत का?' फिचर. ● गुगल स्टोअरवर ५ पैकी ४.८ इतके रेटिंग. ● परदेशातील भाविकही ॲपचा वापर करतात. ● ॲपचे तिसरे वर्ष, गत वर्षी १५ हजार जणांनी लाभ घेतला.
● गुगलवरील प्ले स्टोअरवर 'आषाढी वारी २०१८' या नावाने डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध.

# ॥ होऊ या, माहिती दूत ॥

**शासन** अनुदानित वैयक्तिक लाभाच्या योजना प्रस्तावित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याकरिता, त्यांच्याशी थेट संपर्क साधण्याची आवश्यकता असते. ग्रामीण वा दुर्गम भागातील अशिक्षित व अर्धशिक्षित लाभार्थ्यांपर्यंत त्यांच्यासाठी असलेल्या योजनांची माहिती पोहोचवण्यासाठी, प्रत्यक्ष भेटून संवाद साधणे; हा एक प्रभावी मार्ग आहे.

प्रस्तावित लाभार्थ्यांपर्यंत शासकीय योजना दुहेरी संवादातून त्यांच्यापर्यत पोहोचवण्यासाठी, राज्यातील समाजकार्याची आवड असलेल्या उत्साही तरुणांचे साहाय्य घेण्यासाठी 'युवा माहिती दूत' हा उपक्रम राबवण्यात येत आहे. युनिसेफच्या सहकार्याने व राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) यांच्या प्रत्यक्ष सहभागाने ही योजना मूर्त स्वरूपात येत आहे. राज्यात ६ हजारपेक्षा जास्त महाविद्यालये आहेत. या महाविद्यालयांमध्ये एकूण सुमारे २३ लाखांवर विद्यार्थी शिकत आहेत. त्यापैकी किमान ५ ते ७ टक्के विद्यार्थी म्हणजे किमान १ लाख युवक या उपक्रमात सहभागी होतील अशी अपेक्षा आहे.

उच्च शिक्षण विभाग आणि तंत्र शिक्षण विभाग यांच्या सहकार्याने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने, 'युवा माहिती दूत' हा उपक्रम हाती घेतला आहे. विविध शाखांमध्ये पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या महाविद्यालयातील युवकांमार्फत, शासकीय योजनांची माहिती प्रस्तावित लाभार्थ्यांपर्यंत थेटपणे पोहोचवणे हे 'युवा माहिती दूत' उपक्रमाचे वैशिष्ट्य आहे.

सहभाग

## योजनेची अंमलबजावणी

■ या योजनेच्या अंमलबजावणीसाठी विशेष मोबाइल ॲप्लिकेशन तयार करण्यात आले आहे. या मोबाइल ॲप्लिकेशनमध्ये प्रत्येक महाविद्यालयातील मार्गदर्शक, समन्वयक आणि सहभागी युवक यांचे अकाऊंट असेल. त्याचबरोबर युवकांनी लाभार्थ्यांना द्यावयाची माहिती भरण्याची सोय असेल. ■ महाविद्यालयातील विद्यार्थी या ॲप्लिकेशनवर स्वत:च्या नावाची नोंदणी करू शकतात. ■ युवकांनी लाभार्थ्यांना कोणत्या योजनांची माहिती द्यावी याकरीता तपशील सांगणारा मजकूर/ व्हिडीओ/ एफएक्यू देण्यात आलेला असेल. त्याशिवाय योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे, अर्जाचे नमुने संबंधित शासकीय कार्यालयाचा संपर्क, तपशील व माहिती दिलेली असेल. ■ प्रत्येक महाविद्यालयातील एक 'मार्गदर्शक' नेमण्यात येईल.

प्रस्तावित लाभार्थ्याची भेट घेतल्यानंतर 'युवा माहिती दूत' हे त्या लाभार्थ्यांचा तपशील आपल्या मोबाइलमधील ॲप्लिकेशनमध्ये नोंदवतील. या तपशिलानुसार संबंधित योजनांची माहिती ॲप्लिकेशनमधून घेऊन, लाभार्थ्यांना समजावून सांगतील. ■ लाभार्थ्यांना हे ॲप्लिकेशन डाऊनलोड करण्यासाठी माहिती दूत प्रेरित करतील. तसेच या ॲप्लिकेशनच्या माध्यमातून शासनाच्या सर्व योजना, उपक्रमांची माहिती लाभार्थ्यांना एकाच ठिकाणी मिळणे शक्य होणार आहे. ■ माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि माहिती दूत यांच्यात संदेशांची देवाणघेवाण, प्रशिक्षण, पुनर्विलोकन या ॲप्लिकेशनमार्फत होईल.■ मार्गदर्शक, समन्वयक, माहिती दूत, प्रस्तावित लाभार्थी या सर्वांची नोंदणी मोबाइल क्रमांकाशी निगडित असेल. ■ विविध समाज घटकातील (शेतकरी, महिला, आदिवासी, अल्पसंख्यांक, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ज्येष्ठ नागरिक आदी.) असलेल्या वैयक्तिक लाभाच्या योजनांचा समावेश या उपक्रमासाठी केलेला असेल.

## युवा माहिती दूत

■ या उपक्रमासाठी स्वेच्छेने तयार असलेल्या/ निवडण्यात आलेल्या सुमारे १ लाख विद्यार्थ्यांना ६ महिन्याच्या कालावधीसाठी 'युवा माहिती दूत' म्हणून संबोधण्यात येईल. ■ या कालावधीत किमान ५० प्रस्तावित लाभार्थ्यांच्या घरी जाऊन, त्यांच्याशी संपर्क साधून त्यांच्यासाठी लागू असणाऱ्या योजनांची माहिती देतील. ■ लाभार्थ्यांशी अथवा त्यांच्या परिसराशी निगडित विकास कामांची माहिती देऊन संबंधितांच्या प्रतिक्रियेची नोंद करतील. ■ 'युवा माहिती दूत' म्हणून काम केल्यामुळे राज्य शासनाकरिता तळागाळाच्या पातळीवर काम करण्याची महत्त्वाची संधी युवकांना मिळेल. ■ 'युवा माहिती दूत' अशी ओळख राज्य शासनाच्या वतीने त्यांना देण्यात येईल. ■ ठरवून दिलेले काम केल्यानंतर त्यांना शासनाचे डिजिटल प्रमाणपत्र देण्यात येईल.

संपर्क : mahitidoot@gmail.com

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा.लि. प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई - ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह